



# माणूस

शनिवार । २६ फेब्रुवारी १९७२

पन्नास पैसे

माणूस वर्ष अकरा | शनिवार अंक एकूणचाळीस | २६ फेब्रुवारी १९७२ वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये | पन्नास पैसे परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

सप्रेम नमस्कार....

¤ १२ फेब्रुवारीचा अंक वाचनीय आहे हे सांगणे नको. 'चिमूरचा उठाव आणि मी' हा लेख विशेष आवडला. प्रा. शंकर वैद्यांची प्रा. केशव मेश्राम यांनी घेतलेली मुलाखत लक्ष वेधून घेते. 'डेझर्ट फॉक्स' व 'ॲबॉरशन' रंजक व खूपसे काही देणारे.

१२ फेब्रुवारी, ७२ — प्रसाद पाठक, जामनेर

¤ १२ फेब्रुवारी अंकातील 'सखी' ही छोटी कविता व समीक्षण उत्कृष्ट. 'चिमूरचा उठाव आणि मी' हा लेख सुरेख. त्या लेखाचे शब्दांकन सुंदर झाले आहे.

१५ फेब्रुवारी, ७२ — म. ना. पाठक, वसमतनगर

¤ कै. प्र. श्री. कोल्हटकर यांच्या उदास आठवणींनी भरलेली रवींद्र पिंगे यांची

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

शतपावली आत्ताच वाचली. अनेक वर्षे मनात बाळगलेले कुतुहल शमले. प्र. श्री. कोल्हटकर यांच्या विनोदबुद्धीच्या संबंधात श्री. पिंगे यांनी जे म्हटले आहे, ते अगदी खरे आहे. चिं. वि. जोशी, आचार्य अत्रे, पु. ल. देशपांडे यांच्या परंपरेतले प्र. श्री. होते. तीस वर्षांपूर्वीची आठवण सांगतो–

## मथळ्यात हरवलेले यश

मी मॅट्रिकच्या वर्गात होतो. तास चालू असताना नेहमीप्रमाणे मी मांडीवर ठेवलेले पुस्तक चोरून वाचत होतो. प्र. श्री. कोल्हटकरांच्या लेखांचा तो संग्रह होता. या संग्रहात ' न झालेले विनोद ' टिपणारा प्र. श्रीं. चा लेख होता. लोकमान्य टिळकांनी कसल्यातरी महत्त्वाच्या प्रश्नावर अतिशय दिरंगाईनंतर आपले मत दिले होते. या संबंधात कै. अच्युत बळवत कोल्हटकरांनी आपल्या ' संदेश ' पत्रात ' टिळक बाळंत झाले ' असा मोठा मथळा दिला होता. यावर प्र. श्री. कोल्हटकरांनी लिहिले होते–' विनोदाची केवढी जागा अच्युत बळवतांनी हुकवली ! मथळा द्यायचाच होता तर तो ' बाळ बाळंतीण झाले ' असा देता आला असता... ' मी हे वाचले आणि अगदी थरारून गेलो. क्षणभर वाटले, असे छान छान सुचणारा हा प्रभाकर श्रीपाद किती सुखी प्राणी असला पाहिजे. मथळ्यात हरवलेले यश अचूक शोधणाऱ्या या लेखकाची केव्हातरी ओळख करून घ्यायची. क्षणभरातच माझ्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून मास्तरांनी मला तत्परतेने वर्गाबाहेर हाकलल्यामुळे इतकी वर्षे झाली तरी ती आठवण अगदी ताजी राहिली आहे.

प्र. श्रीं. ना मी प्रत्यक्ष पाहिले ते २५–२६ वर्षांनंतर. संध्याकाळची वेळ होती. लक्ष्मी रोडवरील एका चौकात एका ओळखीच्या गृहस्थांनी मला थांबवले. धुवट धोतर नेसलेली, सर्व केस पांढरे झालेली आणि डोळ्यांतले दिवे पार विझलेली एक व्यक्ती त्यांच्याबरोबर होती. त्यांची मला ओळख सांगितली गेली–

' हे प्र. श्री. कोल्हटकर... '

जुजबी बोलणे झाले. त्यांना सावकाशीने भेटण्यासाठी मी पत्ता विचारला. ते म्हणाले–

' मी आता पुणे कायमचे सोडतो आहे. उद्या परवाच. '

आज पिंग्यांचा लेख वाचताना प्र. श्रीं. चा तो एकदाच काळवंडलेल्या प्रकाशात पाहिलेला चेहरा अस्पष्टपणे पुन्हा नजरेसमोर आला–सगळ्या प्राक्तनासह

' शतपावली ' सदरात श्री. पिंगे अगदी मनापासून रमलेले दिसतात. ' कोल्हटकरांचा मुलगा ' या सुंदर लेखनाबद्दल श्री. पिंगे यांना मनःपूर्वक धन्यवाद.

१७ फेब्रुवारी, १९७२ वि. ग. कानिटकर, पुणे

# वीज !

पहिली तुकडी सलसाडीच्या शिवारात पोचलेली आहे.
सूर्य ऐन माथ्यावर असूनही वातावरणात जळजळ नाही.
दुपारझोपेच्या गुंगीत पहुडलेला समोरचा निळासावळा सातपुडा !

सातपुड्याचा एक सुपुत्र लिहितो –
हा सुपुत्रही सलसाडीचा.

तशी सारी सलसाडीच सुपुत्रवती आहे. व्यसनमुक्त आहे. गरीब असला तरी स्वावलंबी आहे. सुसंस्कृत आहे.

अशा सलसाडी नामक अडीचशे वस्तीच्या एका लहान टुमदार आदिवासी गावाचा सरपंच लिहितो–

अर्जदार : गनसिंग जंगू ठाकरे (सरपंच, सलसाडी, ता. तळोदे, जि. धुळे.)
विषय : तळोदे पो. चौकीतील पो. स्टाफच्या गैरवाजवी वर्तनाबद्दल.
मा. मॅजिस्ट्रेट साहेब तळोदे.

मे. साहेब, वरील अर्जदार अर्ज करतो, की ता. ३१ जानेवारी १९७२ च्या मध्यरात्री नंतर साधारण ३। ते ३।। च्या सुमारास मी माझ्या घरी (मु. सलसाडी) झोपलो असता श्री. भामटचा सखा ठाकरे (पो. पा. सलसाडी) व जंगल सोसायटीचे वॉचमन श्री. मोहनसिंग सोन्या भिल व श्री. करणसिंग हरिराम ठाकरे हे माझ्याकडे आले व त्यांनी मला सांगितले, की श्री. करणसिंग हरिराम ठाकरे यांच्या शतावर (स. नं. १३ सलसाडी) प्रतापपूर येथील सुमारे ४०–५० लोक, १५ गाड्या, छकडे व ४ पोलीस (नं. १९२, १७३, २८२) (आले आहेत !) त्या सांगण्याप्रमाणे मी व पोलीस पाटील श्री. भामटचा सखा ठाकरे व श्री. मोहनसिंग

सोना भिल सकाळी चार वाजताच्या सुमारास त्या शेतावर गेलो. तिथे गेल्यावर श्री. दौलतसिंग तोडरसिंग रजपूत यांच्याजवळ चौकशी केली असता त्यांनी आम्हास या भानगडीत न पडण्याची ताकीद दिली. श्री. दौलतसिंग याच्याबरोबर त्याचा भाऊ श्री. गुलजार तोडरसिंग रजपूत, श्री. रामसिंग खंडा रजपूत व श्री. नारायण नवलसिंग रजपूत हेही होते. मग आम्ही चौघे परत आलो.

ता. १ फेब्रुवारीला आम्ही सकाळी ६ च्या सुमारास शेतावर गेलो. शेतावर. लोक आणि पोलीस होते. आम्ही परत गावात आलो आणि श्री करणसिंग हरिराम ठाकरे यांनी श्री. सुपड्या बापू ठाकरे यास सरळ ग्रामशांति सेनेच्या शिबिरात (पाठविले !) तेथे बरेच कार्यकर्ते होते व श्री. गोविंदराव शिंदेशी सर्व बोलणी केली

सुमारे १० च्या (११–११॥ च्या) सुमारास खालील व्यक्ती १, २ ३, ४, ५, ६, ७, जीपने गावात आल्या. (गोविंदराव शिंदे, अंबरसिंग, श्री. ग. मा. इत्यादी) आम्ही तिघे व आलेले कार्यकर्ते गेलो. तेव्हा प्रतापपूरचे मजूर कापणी करत होते व पाच गाड्यांमध्ये कापलेली कणसे भरलेली होती बाकी गाड्या खाली होत्या.

त्यानंतर सर्व सर्वोदय कार्यकर्त्यांच्या सांगण्याप्रमाणे आम्ही लोक व प्रतापपूरचे सर्व लोक आणि पोलीस यांनी एकत्र बसून समझोत्याची बोलणी केली व समझोता झाल्यानंतर लिखापडीस सुरुवात करणार असता पीक संरक्षण सोसायटीचे प्रमुख श्री. नरोत्तम भबुता गुजर (रा. तळोदे) हे आपल्या स्वतःच्या जीपमध्ये पो. इ. देशमुख (नंदुरबार) पो. स. इ. जहागिरदार व से. पो. स. ई. कोळी यांना घेऊन (आले ! ) तेथे जीप वेगाने आली व आमच्या अगदी जवळ येऊन उभी राहिली. जीप थांबल्याबरोबर काहीही प्राथमिक चौकशी न करता वरील पो. अधिकाऱ्यांनी व श्री. नरोत्तम गुजर यांनी सर्व लोकांवर लाठ्यांनी एकदम मारहाण सुरू केली. या धामधुमीत पो. स. इ. जहागिरदार यांनी काहीही चौकशी न करता मला हातातील वेत फेकून मारली. याच वेळी पो. पा. (पोलीस पाटील) श्री. भामट्या सखाराम ठाकरे यांच्या पाठीवरही श्री. नरोत्तम यांच्या हातातील वेताचा निसटता वार बसला. मारहाण करीत असता स. इ. जहागिरदार, सलसाडी गावातील कोणीही येथे थांबू नये नाहीतर मी गोळ्या चालवीन, असे ओरडत होते. कित्येक मजूर या लाठीहल्याला घाबरून पळून जात असता पो. अधिकाऱ्यांनी थोड्या अंतरापर्यंत मारत पाठलाग केला. आम्हीही बाजूला सरून दूर उभे राहिलो.

त्यानंतर पो. अधिकाऱ्यांनी शहाद्याहून आलेल्या श्री. माजगावकर व त्यांच्या बरोबरच्या इतर लोकांना अभद्र बोलून, जीपमध्ये बसवून नेले व प्रतापपूरचे लोक भरलेल्या व रिकाम्या गाड्या जुंपून घेऊन गेले.

त्या भीतीच्या वातावरणामुळे मी कुठेच जाऊ शकलो नाही म्हणून मी मे. साहेबांना आज फिर्याद देत आहे.

हा माझा जबाब बरोबर आहे.

पोलीस आम्हा मंडळींच्या संरक्षणासाठी शेतात आले, पोलिसांनी लाठीमार केलाच नाही, पोलीस केवळ दिसताच शेतात जमलेले शेसव्वाशे आदिवासी पळून गेले, प्रतापपूरच्या ग्रामपंचायतीत आम्ही जबरदस्तीने नरोत्तम यांच्या जीपमधून पोलिसांची विनंती पटल्यामुळे स्वखुषीने गेलो, पोलिसांना कळवून यापुढे कुठल्याही शेतात जाण्याचे आम्ही मान्य केलेले आहे व तसे लिहूनही दिलेले आहे, वगैरे अर्थाचा सलसाडी-प्रतापपूर प्रकरणाबाबतचा सरकारी खुलासा किती बनावट आहे, खोटा आहे हे वरील फिर्यादीवरून आता चांगलेच स्पष्ट होत आहे.

फिर्याद करणारे गृहस्थ सलसाडी गावचे सरपंच आहेत. पोलिसांचा लाठीहल्ला त्यांनी आमच्याप्रमाणे केवळ डोळयांनी पाहिलेलाच नाही, प्रत्यक्ष भोगलेलाही आहे. या हाणामारीतून गावचे पोलीस पाटीलही सुटलेले नाहीत. अशा जबाबदार व्यक्तींनी, लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारींची तरी सरकार दखल घेणार आहे की नाही ?

' महाराष्ट्र टाइम्स'ने आपल्या अग्रलेखात (दिनांक १७ फेब्रुवारी १९७२) या सर्व प्रकरणाची नि:पक्षपाती चौकशी झाली पाहिजे अशी जाहीर मागणी केलेली आहे. एका जबाबदार व वजनदार वृत्तपत्राच्या या मागणीचा तरी शासन विचार करणार आहे की नाही ?

कठीण वाटते. कारण सरपंच स्वत: तळोद्याला दुसऱ्या दिवशी वरील फिर्याद दाखल करण्यासाठी गेलेले असता त्यांना अनुभव वेगळा आला. ओळखीच्या वकिलांनी मदत करण्यास नकार दिला. अवश्य ती डॉक्टरी सर्टिफिकेट्स मिळाली नाहीत. सरपंच असला तरी आदिवासी माणूस पडला तो. आदिवासी पोलिसां-विरुद्ध फिर्याद करतो म्हणजे काय !

फिर्याद आजतागायत नोंदली गेलेली नाही.

कायदा कुणाचे संरक्षण करतो, न्याय कुणाच्या बाजूला झुकलेला असतो हे उघड करून दाखविणारी ही सलसाडी-प्रतापपूर घटना आहे. लोकांनी परस्पर जरी काही समझोता केला, शांततामय मार्गाने आपले प्रश्न सोडवले, तरी बडे जमीनदार हे प्रयत्न हाणून पाडतील. पोलिसांची त्यांना मदत होईल. कोर्टकचेऱ्यांपर्यंत गोर-गरिबांचे हात पोचूच शकणार नाहीत अशी व्यवस्था केली जाईल. नाइलाजाने, निरुपाय म्हणून गोरगरीब जनतेने मग इतर मार्ग हाताळले, की आहेतच कपाळावर मारण्यासाठी शिक्के तयार ! नक्षलवादी, हिंसाचारी, लोकशाहीविरोधी, शांतता आणि सुव्यवस्था धोक्यात आणणारे .... इत्यादी इत्यादी.

सलसाडीला निदान भूमुक्ती मेळाव्यात संमत झालेल्या ठरावांची व कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी हा काहीसा आक्रमक व आव्हानात्मक पवित्रा तरी होता. पण तसा काही पवित्रा नसतानादेखील पोलीस जमीनदारांनाच कशी साथ देतात,

गोरगरीब जनता कशी नाहक छळवादाला बळी पडते, कायदा कसा विनदिक्कत पोलिसांकडूनच पायदळी तुडविला जातो, कायदेशीर उपाययोजनांची वाट गरीबांसाठी कशी बंद झालेली असते हे अनेक दैनंदिन घटनांवरून या भागापुरते तरी सहज सिद्ध करणे शक्य आहे–सलसाडीनंतर चारच दिवसांनी घडलेली ही एक घटना नमुना म्हणून पाहण्यासारखी आहे–

रात्री आठचा सुमार होता. शहाद्याच्या ग्रामस्वराज्य समितीच्या कचेरीत एक पन्नाशीच्या जवळपासचा आदिवासी आला. काही वेळ बसून, काही वेळ निजून आणि काही वेळ चक्क जमिनीवर गडबडा लोळून त्याने आपली कर्मकहाणी तेथे असलेल्या कार्यकर्त्यांना सांगितली. कार्यकर्त्यांनी ती सलगपणे लिहून काढली. माणूसकडे पाठवून दिली. दोन वकील, दोन पत्रकार, एक डॉक्टर असा ताफा तडक शहादे मुक्कामी पोचला. कहाणीची सत्यासत्यता पुन्हा एकदा पडताळून पाहण्यात आली. सर्वांची अशी खात्री पटली, की आदिवासी सांगतो आहे ते खरे आहे. पोलिसांनी केलेला छळवाद भयंकरच अमानुष आहे. कायद्याचा त्याला कुठलाही आधार नाही. पण कायद्याच्या चौकटीत राहून या अन्यायाचे निराकरणही होऊ शकत नाही. पुरावा कुठून, कसा आणायचा ?

कहाणी अशी आहे –

ग्रामस्वराज्य समिती शहादा, जिल्हा धुळे.

अर्जदार : आवल्या पवल्या (माळचे) भिल, राहणार मनरद, ता. शहादा, जिल्हा धुळे.

मी मनरद शिवारातील शिरूडकडील मनरद व शिरूड या विभागातील पीक संरक्षण सोसायटीचा वॉचमन आहे. पाच वर्षांपासून वॉचमनचे काम करीत आहे. माझ्या शिवारातील श्री. त्रिंबक हरी पाटील, राहणार मनरद यांचे शेतातील S 4 कंबोडिया कपासाचे पीक चोरी गेल्याचे आरोपावरून मला पोलीस स्टेशन शहादा येथे आणण्यात आले. तुम्ही गुन्हा कबल करून घ्या असे पी. एस. आय. म्हणत होता. मी म्हणालो, मला माहीत नाही. मी स्वत: रखवालदार असून मी चोरी कशी करणार. एवढे ऐकून पोलीस सब्-इन्स्पेक्टर याने वीज लावली. वीज लावल्यामुळे मला खूप शारीरिक त्रास झाला. खूप वेदना झाल्या. तोंडाला कोरड आली. अंगाला आग सुटली. त्या आगीमुळे शरीर जळू लागले. मी मोठमोठ्याने ओरडून रडू लागलो. पाया पडू लागलो. तेव्हा त्यांना दया आली. वीज काढली. परत शिवीगाळ करून विचारपूस केली. खरे सांगून दे. मी म्हणालो, मला माहीत नाही. परत पी. एस्. आय्. ला राग आला. त्याने पोलिसांना मला पकडायला लावले. परत माझ्या हातांना वीज लावली. माझ्या अंगातील अग्नी भडकला. शरीर जळू लागले.

सर्व अंगात आग भडकू लागली. तोंडाला परत खूप कोरड पडली. दाह वाढत होता. शरीरातील अग्नी एके ठिकाणी बसू देत नसे. सारखी ऊठबस, लोळणे करावे लागत होते. स्थिरता नाही. नंतर मी ओरडलो. परत वीज काढली. नंतर पी. एस्. आय्.ने विचारले, खरे सांग, कपाशी कोणी चोरली. मला माहीत नाही साहेब. परत साहेब शिव्या देऊ लागला. नंतर तो तपासासाठी निघून गेला. मग पोलिसाला विचारून इंजेक्शन घेण्यासाठी अंगातील अग्नी व तोंडातील कोरड कमी करण्यासाठी डॉक्टर-कडे जाण्यास निघालो. प्रथम डॉ. सुरेश पटेलकडे गेलो. त्यांनी वेळ नसल्याचे सांगितले. नंतर मी ग्रामस्वराज्य समिती शहादा यांचेकडे आलो. तेथे वरील प्रकार सर्व सांगितला. नंतर त्यांनी म्हणजे अमरसिंग सुरतवंती यांनी लढ्ढा डॉक्टरचे नावे चिठ्ठी दिली. नंतर चिठ्ठीप्रमाणे डॉक्टरने मला तपासणी करून अग्निशामक दाह कमी करण्यासाठी एक इंजेक्शन व चार गोळ्या देऊन परत केले. नंतर मी ग्राम-स्वराज्य समिती, शहादा यांच्या ऑफिसात जाऊन हा विनंती अर्ज करीत आहे. कृपया मला निरपराधीस न्याय मिळवून देणेस नम्र विनंती. वरील अन्यायास वाचा फोडणेस विनंती. परत पी. एस्. आय.ने बोलविले आहे. तो परत मला मारण्याची व वीज लावण्याची शक्यता आहे. कृपया वीज लावणे व मारणे थांबवणेस विनंती.

टीप :

१ : तिरसिंग मुरा भिल.

२ : गुल्या मिल्या भिल.

३ : दामू आवल्या भिल.

वरील तिघांनाही माझेसमोर वीज लावली. वीज लावल्याबरोबर त्यांनी तोंडात येईल त्यांची नावे सांगितली. त्यामुळे त्यांचा त्रास कमी झाला. रात्रीतून परत होईल असे वाटते.

| | |
|---|---|
| तारीख ५।२।७२ | आपला |
| जबाबाची वेळ | आवल्या पवल्या भिल |
| सायंकाळी ८–३० वाजता | मु. मनरद. यांचा निशाणी आंगठा |

पचवीस वर्षे लोकशाही नांदत असलेल्या स्वतंत्र देशातील ही कहाणी आहे.

समाजवादी घडण होत असलेल्या देशात अशा घटना राजरोस, दिवसाढवळ्या घडत आहेत.

एक किंवा दोन नाहीत. शेकडोंनी.

कसे लक्ष वेधायचे याकडे लोकशाही आणि समाजवाद मिरवणाऱ्यांचे ?

सांगून झाले. लिहून झाले. मोर्चे निघाले. मेळावेही भरले.

पृष्ठ ६४ वर

## निवडणूक प्रचार :

# असे वक्तृत्व अशा सभा....

थंडी मी म्हणते आहे. मुंबईत प्रथमच एवढी थंडी गेल्या बावीस वर्षांत पडलेली. त्यामुळे मौज वाटते आहे. रंगी-बेरंगी लोकरी कपडे मुंबईकरांच्या अंगावर दिसताहेत. एवढीच एक-दोन दिवसांची संधी. नंतर हे कपडे पेटीतच राहणार. अर्थात हे नखरे पैसेवाल्यांचे. साधारण तुमच्या-आमच्यासारखे लोक मुंबईतल्या हवेसाठी लोकरी कपडे घेतच नाहीत. कारण इथली थंडी सुसह्य असते. रोमांचकारी असते. अचानक येते आणि लगेच निघून जाते. पण तेवढ्यात गुलाबी मौज आणते. सतत घामट दर्पांनी आणि दूषित हवेनं कोंदटलेल्या मुंबईत हा अल्पकाळ टिकणारा हिवाळा जरा उल्हास आणतो.

तेव्हा अशी नाजूक झिरझिरीत थंडी पडलेली आहे. आणि घरी येऊन बघावे तो समोर निवडणूक प्रचाराच्या सभेचा एक कर्णा कानठळ्या फोडणाऱ्या आवाजात सिनेमाची घासलेली गाणी ओकतो आहे. अशा वेळी काय करावे? कर्णा खरं म्हणजे खूप दूर आहे. पण इथेच तो आवाज पोटात घुमतो आहे तर व्यासपीठा-जवळ काय होत असणार. आणि करणार काय? कान मिटून गप्प बसावे. चाळी-तली यच्चयावत मंडळी वैतागली आहेत. लहान पोरंसोरंदेखील आता कानांवर बोटे ठेवीत आहेत.

गॅलरीतून पटांगणात बघावे तो व्यासपीठाभोवती चिटपाखरूही दिसत नाही. थंडी कोण आहे! एक-दोन कार्यकर्ते माईकशी खटपट करताहेत. बाकीचे कार्यकर्ते बहुधा श्रोते आणायला गेले असावेत. माईकवर पुन्हा पुन्हा जाहीर दमबाजी केल्या-सारख्या आवाजात सांगताहेत, 'सभेला आत्ता सुरुवात होत आहै. कॉलनीच्या रहिवाश्यांनी ताबडतोब खाली उतरून सभास्थानी यावे ..' वगैरे वगैरे. परंतु या धमक्यांना कोणी भीक घालताना दिसत नाही.

अखेर काही कार्यकर्ते चार ते आठ वर्षांच्या आठ-दहा मुलामुलींना तिथे खेचून आणण्यात यशस्वी झालेले दिसतात. ती बहुधा त्या कार्यकर्त्यांचीच मुलं असावीत. सभेची वेळ केव्हाच टळून गेलेली. कर्ण्यावर सिनेमाची हीट गाणी, कॉलनीतल्या रहिवाश्यांना सभास्थानी निघून येण्याच्या आज्ञा आणि अधूनमधून घोषणा,

'आपले मुख्य पाहुणे सभास्थानी येत आहेत. सभेला लवकरच सुरुवात होईल.'

बऱ्याच वेळाने एकदम गडबड ऐकू येते. 'काय झालं, झालं,' म्हणून लोक आपापल्या गॅलऱ्यांमध्ये येऊन बघतात तो दूर कोपऱ्यावर एक मिरवणूक दिसते आहे. लेझीम, ढोल यांचा नाच. शे-सव्वाशे तरुण आणि एक मोटार. मोटारीत उमेदवार, एक-दोन पाहुणे आणि मुख्य पाहुणे–महाराष्ट्र विधानसभेचे स्पीकर नामदार बाळासाहेब तथा त्र्यं. शि. भारदे. उमेदवार म्हणजे लोकप्रिय कामगार नेते प्रभाकर कुंटे आणि इतर पाहुण्यांमध्ये श्री. रामराव आदिक, एक पट्टीचे वक्ते.

मंडळी व्यासपीठावर येऊन बसतात. पण ढोल-ताशे बडविणे चालूच. कर्ण्यावरून चार-पाच वेळा सांगितले जाते, 'ढोलवाल्यांनी नाच बंद करावा, आता सभेला सुरुवात होत आहे. नाच बंद करावा' तेव्हा कुठे ढोल ताशे थांबतात. मग पुन्हा कॉलनीतल्या रहिवाश्यांना एक शेवटचे आवाहन. कॉलनीतले रहिवासी काही ढीम हलत नाहीत. ते आपापली दारे बंद करून झोपण्याच्या तयारीत आहेत. कर्ण्याच्या आवाजाने झोपता येत नाही, जबरदस्तीने ऐकावे लागते, म्हणून शिव्या घालत आहेत.

शेवटी सभेला सुरुवात होते. दलितांचे एक नेते दोन मिनिटांत आपल्या भाबड्या गोड भाषेत बोलणं आटोपतात. पण त्यांचं बोलणं सभेला पटतं. राजा कुलकर्णींच्या वेळी जशी भरघोस मतं काँग्रेसला पडली तशीच मतं याहीवेळीं पडतील अशी खात्री देऊन ते टाळ्यांच्या गजरात खाली बसतात.

नंतर शब्दांच्या फैरी झाडत उठतात रामराव आदिक. त्या कॉलनीत आदिक बहुधा प्रथमच आलेले. त्यामुळे त्यांना ऐकण्यासाठी लोक आपापल्या गॅलऱ्यांमध्ये किंवा खिडक्यांशी येऊन उभे राहातात. अधूनमधून कोट्यांची पखरण करीत, कुणा-कुणाला नाजूक चिमटे काढीत आणि छोट्या छोट्या गोष्टी सांगत आदिक छान बोलतात. स्वावलंबनावर बोलताना ते एक छोटा किस्सा सांगतात. अमेरिकेत ते गेले असताना त्यांनी एका मोठ्या शंभर एकरी शेताला भेट दिली. शेत-मालकाने सगळे हिंडून दाखवले. पन्नास एकरात दुभत्या गायी आणि त्यांची कुरणे आणि पन्नास एकरांत गहू. आदिकांनी विचारले, 'हा गहू तुम्ही विकता काहो?' मालक म्हणाले, 'छे! चांगल्या प्रतीचा नाही तो. आम्ही तो आमच्याच गुरांना खाऊ घालतो आणि त्यातून उरला तर इंडियात पाठवतो...' ...वगैरे वगैरे.

आणखी एक वक्ते उठतात. त्यांच्या नावावरून आणि बोलण्याच्या ढबीवरून ते एक अयशस्वी कीर्तनकार असल्यासारखे वाटतात. ते म्हणतात, 'काय विचारता महाराज, इंदिराजी म्हणजे एक चमत्कार, एक ईश्वरी अवतार. असा चमत्कार कुणी केला नव्हता. खुद्द इंदिराजी नाही म्हणतात. पण मी सांगतो महाराज, इंदिरा गांधी म्हणजे परमेश्वरी अवतार...' वगैरे वगैरे.

आणि मग भारदेबुवा उठतात. टाळ्यांच्या गजरात. त्या श्रोतृवृंदाला लीनतेने

नम्र अभिवादन करतात आणि सुहास्य वदनाने भाषण करू लागतात. हात एक-मेकात जुळलेले आणि मुखावर स्मित--

–लोक खिडक्या, दारे लावून घेतात. आयाबाया मुलांना थोपटून थोपटून निजवू लागतात. पण कर्ण्यातून नामदार भारदे यांचा मधुर आलाप कानी येतोच आहे–

'–आऽऽणि म्हणूऽऽऽन, पैसेवाल्यांचे राजकारण हाणन पाडण्यासाठी, भांडवलदारांचे हाणून पाडण्यासाठी, गरीबांच्या कल्याणासाठी... '

अर्धा तास झाला. भारदेबुवांचे गोड इंदिरा नामसंकीर्तन चालूच आहे. लोक वैतागले आहेत. श्रोतृवृंददेखील अधूनमधून जोरदार टाळ्या पिटून आपण वैतगल्याची खात्री पटवीत आहे. काही गुडघ्यात मान खुपसून डुलक्या घेत आहेत.

भारदेबुवा मात्र आता रंगात आले आहेत. एक हात पाठीमागे. आणि एका हाताची पल्लेदार हालचाल. एखाद्या कुशल दांडपट्टा योद्धयाने आपले शस्त्र विजेप्रमाणे चारी बाजूला लवलवीत फिरवीत राहून शत्रूला दूर ठेवावे तशी तडफदार परज नामदार भारद्यांच्या हाताला आली आहे. वक्तृत्वाप्रमाणेच दांडपट्टयाच्या फेकीच्या बाबतीतही त्यांचा हात धरण्यास कुणी धजावणार नाही हे आता त्यांच्या थकलेल्या नाईलाज श्रोत्यांना पटायला लागले आहे.

–आऽऽऽणि म्हणूऽऽऽऽन, पददलितांच्या कल्याणासाठी, गोरगरिब्रांच्या सेवेसाठी, राष्ट्राच्या संरक्षणासाठी, आर्थिक प्रगतीसाठी–

किती वेळ झाला बरं? घरोघरी लोक झोपू लागले आहेत. पण मधूनच कर्ण्याचा आवाज वाढला की पोरं-सोरं दचकून उठताहेत. उठल्या उठल्या त्यांच्या कानी भारदेबुवांची मधुर वाणी कानी पडते आहे,

'म्हणूऽऽऽन, जाता जाता एकच सांगून ठेवतो की ज्यांना ज्यांना म्हणून सत्तेच्या खुर्चीचा मोह सुटत नसेल त्यांना त्यांना...'

जाता जाता सांगता सांगता भारदेबुवांचे भाषण मारुतीच्या शेपटासारखे लांबत चालले आहे. सव्वा तास त्यांच्या अमोघ वक्तृत्वाचा अखंड झरा वाहतो आहे. आणि त्या झऱ्याचे मधुर अमृत प्राशन करून झालेल्या अजीर्णामुळे समस्त कॉलनीनिवासी करपट ढेकरा देताहेत.

–आऽऽऽणि, म्हणूऽऽऽऽन, शेवटी मला एकच सांगायचं आहे, की जर या देशाला काही भवितव्य असेल तर ते फक्त–

श्रोतृवृंदाच्या पोटात गोळे उठतात. कारण शेवट करण्याच्या आविर्भावात दरवेळी नामदार भारदे कुठल्यातरी नव्या, मसालेदार मद्द्याला हात घालताहेत.

शेवटी खरोखरच दीड तासानंतर श्री. भारदे यांनी अखेरचे स्टेशन गाठले. त्यांचा हात दुखून आला असावा. आणि टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात ते खाली बसले. टाळ्यांचा तो प्रचंड गजर, म्हणजे त्यांच्या लोकप्रियतेची व अतुलनीय वक्तृत्वाच्या यशाची पावतीच होय असे म्हणतात. मात्र काही लोक मिस्किलपणे

खोच मारतात की त्या टाळ्या म्हणजे भारदे यांचे भाषण संपले म्हणून कंटाळलेल्या श्रोतृवर्गाने केलेले हर्षप्रदर्शन! असो. लोक टाळ्या कशासाठी वाजवितात हा अभ्यासाचा विषय आहे. निदान त्यादिवशी भारदेबुवांच्या कीर्तनानंतर त्या छोट्याशा श्रोतृवर्गाने कशासाठी टाळ्या वाजविल्या हा विषय तर नक्कीच वादास्पद आहे. अनेक मुद्दे व विविध स्पष्टीकरणे संभवतात. त्यांच्या खोलात जाण्यापेक्षा श्रोतृवर्गाने श्री. भारदे यांच्या भाषणाच्या शेवटी टाळ्यांचा गडगडाट केला असे वस्तुनिष्ठ निवेदन केलेले बरे.

अशा रीतीने श्री. भारदे यांचे ते ऐतिहासिक वक्तृत्व प्रदर्शन समाप्त झाले. दुःखाची गोष्ट ही की एवढी अमोघ वाणी स्रवत असताना फक्त शे-सव्वाशे श्रोत्यांनी समोर गुडघ्यात मान घालून डुलक्या घ्याव्यात आणि समस्त कॉलनीवासीयांनी आपापल्या घरांची दारे-खिडक्या बंद करावीत! नाहीतरी या समाजात गुणांची कदरच नाही. परंतु त्यातल्या त्यात आनंदाची गोष्ट ही की श्री. भारदे यांनी त्या कॉलनीवासीयांच्या या उद्दाम, उदासीन आणि बेजबाबदार वागणुकीकडे दुर्लक्ष केले आणि आपल्या शैलीदार वक्तृत्वाच्या अनेकविध पैलूंचा रोमांचकारी अविष्कार घडविला. भगवान श्रीकृष्ण म्हणाले,

'कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।'

फळ मिळो वा न मिळो. कर्म करीत राहणे हे आपले कर्तव्य आहे.

कोणी ऐको वा न ऐको. बोलत राहणे हे आपले कर्तव्य आहे. गीतेच्या उपदेशानुसार चालणारे असे भारद्यांसारखे महान कर्मयोगी आजकाल फक्त राजकारणातच आढळतात. असो.

बिचारे कुंटे! भारद्यांचे भाषण ऐकून तृप्त झालेल्या श्रोत्यांना तर आता शब्दाचा एक थेंबही रिचवणे जड झाले होते. पण कुंटे निधडेपणे बोलले. प्रत्येक वाक्यात प्रधान मंत्र्यांचा उल्लेख करून टाळ्या घेतल्या. प्रधानमंत्री जवळच्याच एका पटांगणात भाषण करणार आहेत असे सांगून प्रधानमंत्र्यांना कॉलनीच्या एवढ्या जवळ आणण्यात आपण कॉलनीवासीयांवर केवढे प्रचंड उपकार केले आहेत हे पटवून दिले. आणि पुन्हा बसताना टाळ्या घेतल्या.

आभार प्रदर्शन होण्याच्या वेळीच सभा विसर्जित झाली. नंतर राष्ट्रगीत झाले. आणि सभा संपली. मोटरी निघून गेल्या. पटांगणाभोवती दूर दूर अंतरावर पोलिसांचे ताफेच्या ताफे डुलक्या देत आतापर्यंत नाईलाजाने उभे होते. तेही आळस देत निघून गेले. आणि सारे शांत झाले.

तेव्हापासून त्या कॉलनीतल्या स्त्रिया आपापल्या बंडखोर मुलांना धाक घालतात, 'ऐकतोस की नाही आँ? की बोलवू भारदेंना!'

आणि मुले ऐकतात.

□ □ □

रवींद्र पिंगे

# शब्दपालवी

# परमेश्वरी योजना म्हणून काही असते... वगैरे वगैरे !

ती एक बाळबोध, संसारी गृहिणी होती. चारचौघींसारखंच तिचं रूप होतं. पाहणाऱ्याची नजर खिळवून ठेवेल असं तिच्यापाशी जवळजवळ काहीच नव्हतं. पदरी पडलेल्या मनस्वी लेखकाचा पांढरपेशी संसार ती पैन् पैचा हिशेब ठऊन मोठ्या दक्षतेने सांभाळीत होती. वाङ्मयातलं तर तिला ओ म्हणता ठो कळत नव्हतं. संसारकृत्यातली मुळाक्षरं मात्र तिने मान मोडून गिरवलेली होती. आले–गेले भलं म्हणतील, इतपत आपला प्रपंच नेटका करावा एवढंच तिला कळत होतं. मापून घेतलेलं माजघरातलं धोपटमार्गी राज्य तिने मोठ्या कौशल्याने चालवलेलं होतं. एकदा पाळणा हालवला होता. गोपाळगाणी म्हटली होती. चिऊकाऊच्या गोष्टी बाळाला सांगितल्या होत्या. पाटीदप्तर देऊन त्याला शाळेला पाठवलं होतं. अधून मधून जत्रेला नेलं होतं. मालकांना भरपूर जेवू खावू घातलं होतं. बाहेरच्या दिवाणखान्यात त्याची बैठक होती. तिथे मेजापाशी बत्ती लावून तो विलक्षण वेगाने तावच्या ताव खरडून काढायचा. तो काय लिहितो, कशासाठी लिहितो, वगैरे बाबी जाणून घेण्याच्या भानगडीत ती कधीही पडली नव्हती. तो लिहितो, लिहिलेले कागद संपादकांकडे पाठवतो आणि संपादक जे पैसे पाठवतात त्यावर आपली चूल पेटते, इतकंच तिला माहीत होतं. कुणाचे मालक चाकरमाने असतात, डॉक्टर इंजिनियर असतात, दुकानदार असतात, सावकार असतात, तसे आपले धनी लेखक आहेत आणि त्यांच्या लेखनातून जे द्रव्य सुटेल त्यावर आपला संसार धकायचा आहे, इतकीच मर्माची गोष्ट तिने ओळखली होती. नवऱ्याच्या कारभारात गृहिणीने यापेक्षा थोडं अधिक डोकावलं पाहिजे असं तिला कधीही वाटलं नव्हतं. आपल्या परीने ती तृप्त होती. त्यांचा सरळसोट संसार असा दहा बारा वर्षं रहाटासारखा थोडासा कुरकुरत, थोडासा मागेपुढे करत, पण निकाला आलेले मळे शिपत, रीतीने चालला होता. शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या दृष्टीनेही त्यांचा गृहस्थाश्रम धन्य होत होता.

संसार—साफल्य म्हणून जे म्हणतात ते तिला लाभलं होतं. ती तसं चारचौघीना सांगतही होती.

तो चारचौघासारखा तर अजिबातच नव्हता. चव्वेचाळीस वर्षांच्या पायऱ्या चढून वर आल्यावर त्याला जिंदगीचा व्यापक अर्थ जाणवला होता. आपल्या परसंवाच्या बाहेरच्या सृष्टीचं आपण काही देणं लागतो, ध्येयवादाची टिंगल-टवाळी करून प्रश्न सुटत नाहीत, वेळ येईल तेव्हा नव्हे तर प्रत्यही प्रत्येक क्षणाला जागरूक राहून तीळ तीळ खर्ची पडावं लागतं, अशी त्याची अनुभवसिद्ध श्रद्धा होती. फ्रेंच राज्यक्रांतीची विजयशाली वर्णनं वाचून त्याच्या मनःशांतीला चूड लागली होती. समता, बंधुभाव आणि स्वातंत्र्य यांचा जरीपटका सिंहाच्या ताठ मानेसारखा मानवी व्यवहारावर झुळझुळला पाहिजे, हा एकच धोषा त्याने चालवला होता. राजबिंडेपणाचा टिपूसही त्याच्या वाट्याला आला नव्हता. शरीरयष्टीने तो यथातथाच होता. रूपसंपदेच्या बळावर कुणावर छाप टाकणं त्याच्या पल्ल्याबाहेरचं कर्म होतं. ही सर्व कसर तो ज्वलंत विचार लेखनात मांडून भरून काढी. अन्याय्य राजवटीमुळे जिच्या भाळी क्लेश सदाचेच वज्रलेप केले जातात त्या गांजलेल्या रयतेच्या वेदनेशी आपली लेखणी समरस व्हावी, आपल्या खांद्यावरलं सत्यव्रताचं निशाण कधी उतरू नये आणि समाजाची न्यायबुद्धी अकलंकित राहण्यातच मानवी कल्याणाची बीजं कशी साठवलेली असतात हे आपण अहोरात्र सांगत राहावं, हाच त्याचा त्रैलोक्य होता. अमाप लेखनवेगात तो साक्षात वाघ होता. आठ आठ तासांच्या बैठका करून तो निबंधांचा पाऊस पाडे. विषय एकच : स्वातंत्र्य. पण त्याचे शंभर पापुद्रे तो लीलया सोलून दाखवी. ध्येय एकच: न्यायाधिष्ठित मानवी कल्याण. त्याचे शंभर पैलू तो विनासायास विशद करी. एकदा तर त्याने एका महिन्यात चाळीस—बेचाळीस दर्जेदार वैचारिक निबंधांचा ग्रंथ सिद्ध करून वाङ्मयकोविदाकडून वाहवा मिळवून दाखवली. त्याची लेखणी अशी चौखूर उधळे. या पेटलेल्या माणसाची झपाटलेली अक्षरं म्हणजे मूलभूत स्वातंत्र्याकांक्षेचा दैदिप्यमान चिद्घोषच आहे असं शिफारसपत्र जाणकारांकडून त्याने मिळवलं होतं. तो कृतार्थ झाला होता. साहित्यसेवेतलं साफल्य त्याला लाभलं होतं.

मात्र, सामाजिक न्यायापरत्या अन्य कृतार्थतेची अभिलाषा न धरणाऱ्या त्या शीघ्रवेगी निबंधकाराला आपण आपल्या चिमुकल्या संसारात एकनिष्ठ गृहिणीला किमान न्याय दिला पाहिजे असं काही वाटेना! तो चव्वेचाळीस वर्षांचा होता. ती पस्तीशीची होती. त्यांचा एकुलता एक शाळकरी मुलगा सात वर्षांचा होता. त्यांच्या संसाराचं एक तप उलटत होतं. नवा, उदयोन्मुख स्वातंत्र्याकांक्षी लेखक म्हणून त्याचा बोलबालाही झाला होता. ही सारी पुण्याईच म्हणायची. पण एक दिवस त्याला लहर आली आणि गौतम बुद्धासारखं त्याने आपल्या संसारावर तुळशीपत्र ठेवलं! कसलंही कारण न सांगता! तिच्या पायाखालची धरणी दुभंगली. सर्वांनी

खोदून खोदून विचारलं, गळ घातली, समाजातल्या त्याच्या भीषण भवितव्याची त्याला कल्पना दिली. बहिष्काराचीही भीती घातली. त्याने ढीम केलं नाही. काखेला मारलेला बाडबिस्तारा त्याने वाटेवरल्या एका खानावळीत सोडून ठेवला. खानावळीतली रोटी खावी, तिथेच लिहावं, येतील त्या पैशांतून खानावळवालीचं बील भागवावं नि चिल्लर काही उरलीच तर बायकोला पाठवून द्यावी, नाहीतर त्यांचा ठणाणा शांत चित्ताने ऐकून घ्यावा, असा खाक्या त्याने सतत दोन वर्षं चालवला. मग खानावळीच्या भकास बेफिकीरीला आणि वेचव अन्नाला तो कंटाळला. त्याच्या सग्यासोयऱ्यांना हायसं वाटलं. त्याला पश्चाताप होऊन तो पुनरपि आपल्या अंगणात परतेल, चिऊकाऊचा संसार पुन्हा सुरू होईल, झालं गेलं गंगेला मिळून तो नवं पान उघडेल, अशी अटकळ सर्वांनी बांधली. त्या सर्व सुखचित्रावरून त्याने बोळा फिरवला. एका शिप्याला खाणावळचे हवे आहेत असं कळलं. त्याने त्याच्या घराचा रस्ता पकडला.

शिपीदादा कुशल होता. त्याच्या उफाड्याच्या लेकी सवाई कुशल होत्या. त्यातल्या एकीने आल्या आल्याच नव्या पाहुण्यांवर मंत्र टाकला. पाहुण्यांचं चित्त चहाचा पहिला घोट पोटात जायच्या आतच मोहरून गेलं.

'आपण काय करता?' तिने विचारलं.

'मी एक भटक्या आहे.' तो म्हणाला.

'शक्य नाही. तुमची काहीतरी गमाडीगंमत आहे नि ती तुम्ही लपवून ठेवताय.'

'खरच नाही.'

'मी ओळखू?'

'ओळख.'

'ओळखलं तर काय द्याल?'

'मी काय देणार बुवा?'

'तुम्ही दिलं नाहीत तर माझं मीच वसूल करीन. चालेल नं?'

'अगोदर तू ओळख तर खरं.'

'तुम्ही फार मोठे कलावंत आहात. सुंदर सुंदर चित्र काढणारे. तुमचे डोळेच सांगताहेत, की तुम्ही नंबर एकचे चित्रकार आहा.'

'नाही.'

'नाही–बिही काही म्हणू नका. मी बरोबर ओळखलंय की नाही ते निमुटपणी सांगा.'

'छे ग. मला फक्त चित्रकलेची आवड आहे.'

'आता हळूहळू कबूल करायला लागणार तुम्ही! काही काही पुरुष नंबर एकचे लबाड असतात. ते सरळपणे काही कबूल करणार नाहीत. आज हे कबूल कर, उद्या ते कबूल कर, असा ते कशिदा विणत जातात. तुम्ही त्यातलेच आहात.'

‘ नाही बये, मी एक लेखक आहे. ’

‘ हे तुमचं शुद्ध ढोंग आहे. मी सांगत्ये, तुम्ही नंबर एकचे चित्रकार आहात. मस्तपैकी पोर्ट्रेटस् काढणारे फिरते चित्रकार ! ’

‘ आता काय म्हणावं ? माझं लेखनसाहित्य दाखवू का तुला ? ’

‘ तुमचं लेखनसाहित्य घाला चुलीत ! तुमचे ब्रश आणि रंगाच्या टय़ूबा कुठे आहेत त्या बाहेर काढा अगोदर. ’

‘ तू झडती घेऊ शकतेस. ’

तिने रापाराप केली. कागदाचे चतकोर, लेखण्या, वाळूच्या पुडचा, शाईच्या दौती, हाताला लागल्या. त्यांच्याशी तिला काहीही कर्तव्य नव्हतं. ब्रश, रंगाच्या टय़ूबा नव्हत्याच.

‘ आता माझ्या लक्षात आलं तुमचं चित्रकलेचं साहित्य तुम्ही प्रवासात कुठेतरी गहाळ केलंय. पण तुम्ही काळजी करू नका. मी मंडईत गेले, की येताना ड्रग स्टोअरमधून रंगबिंग सगळं काही आणते. वरच्या पोटमाळ्यावर तुम्ही तुमचा स्टुडिओ थाटा. तिथे तुम्हाला त्रास द्यायला कुणीही येणार नाही. नि मी आलेच तर त्याचा तुम्हाला त्रास होणार नाही ह्याचीही खात्री देते. ’

सॅली मंडईला गेली. परतताना तिने चित्रकार पाहुण्यांसाठी कॅनव्हास, ब्रश, रंग, रबर, पेन्सिली, सारं काही लटांबर आणलं. वर पोटमाळ्यावर स्टुडिओ थाटला गेला.

चक्रावलेले लेखक पाहुणे कोऱ्या कॅनव्हाससमोर सुन्न चित्ताने बसले ! उठले. आर्ट गॅलरीत गेले. तिथून चित्रकार मित्रांच्या स्टुडिओत गेले. फार पूर्वी आपण चित्र काढली होती, ह्याची त्यांना याद आली. बोट शिवशिवू लागली. ते तडक शिपींदादाच्या खानावळीतल्या स्टुडिओत परतले. हुकूम सोडला,

‘ वर एक चहाचं पॉट पाठवून द्या. मला कामाला बसायचंय. ’

सॅली चहाचं पॉट, बिस्किटं आणि चिजची काप घेऊन पोटमाळ्यावर आली. हातात सुका ब्रश घेऊन तो रिकाम्या कॅनव्हाससमोर बसलेला होता.

‘ माझ्या येण्यामुळे एका माणसाचा मूड तर बिघडला तर नाही नं ? ’

एक नाही की दोन नाही !

‘ कायहो महाशय, काय म्हणत्येय मी ? ’

‘ काय म्हणालीस ? ’ भानावर येऊन त्याने विचारलं.

‘ एक गंमत विचारीन म्हणत्ये. ’

‘ कुठली गंमत ? ’

‘ कान इकडे करा. मग सांगत्ये. ’

तो कलला. ती काही तरी कुजबुजली. कुजबुजता कुजबुजता त्याच्या मांडीवर बसली. त्यांच्या कुशीत शिरली. चहा थंड झाला.

त्यांच्या आयुष्यातलं नव पर्व सुरू झालं.

तो पट्टीचा तर लेखक होताच. आता जोडीस सुंदर चित्रंही काढू लागला. चित्रकलेवर टीका टिपणी करू लागला. व्याख्यानं झोडू लागला.

एक दिवस त्याने आपल्या टाकलेल्या बायकोला लिहिलं, 'गेली चार वर्ष आपण वेगळे राहात आहोत. आता मी तुला कायमची सोडचिठ्ठीच द्यायचं ठरवलं आहे. हिशोबाचा काही आकडा निघत असेल तर सांग. मी तुझी रक्कम चुकती करेन.'

चिठ्ठी घेऊन ती तिरमीरीतच घराबाहेर पडली. त्याला भेटली.

'हे सोडचिठ्ठीचं कुठलं नवं प्रकरण काढलंत तुम्ही ?'

'मला वाटलं की आपण कायदेशीर विभक्त व्हावं.'

'पण का ? लोक थुंकतील की तुमच्यावर !'

'ते पुढचं पुढे पाहू. तू मला सोडचिठ्ठीच्या कागदावर सही दे म्हणजे झालं.'

'सोडचिठ्ठी देऊन तुम्ही काय करणार ?'

'दुसरं लग्न.'

'कोण मुलगी देणाराय तुम्हाला दुसरेपणावर ?'

'ते आमचं सर्व काही शिस्तवार ठरलंय. तू फक्त कागदपत्रांवर सह्या कर म्हणजे झालं'

'पण मुलगी कोण ते तर कळू दे.'

'आहे एका शिंप्याची मुलगी'

'महाशय, लेखक आहात तुम्ही—एक सामान्य शिंपीण काय सुख देणार तुम्हांला ?'

'लेखक अशा वरपांगी गोष्टी पहात नसतात. माझी प्रिया शिंपीण असली तरी गुणी आहे. मला तिने पराकाष्ठेचं सुखं दिलं आहे. तेव्हा बऱ्या बोलाने तू सोड-चिठ्ठीच्या कागदपत्रांवर सह्या दे. आणि जर तू सह्या दिल्या नाहीस तर मी इंग्लंड सोडेन नि जीवाचं बरंवाईट करून घेईन.'

'पण तुमच्या ह्या गुप्त प्रेमप्रकरणाची तुम्ही मला साधी कल्पनाही दिली नाहीत ! धर्मपत्नीपासून प्रकरणं लपवणं धर्मात बसतं ?'

'ते पुढचं पुढे पाहू. तू मला सही दे.'

'माझं एक वेळ मरो म्हणत्ये मी. पण तुमच्या मुलाच्या भविष्याचा विचार केलाय तुम्ही ?'

'ते पुढचं पुढे पाहू. जरी मी कायदेशीर विभक्त झालो तरी तुझी नि तुझ्या मुलाची मी यथाशक्ती सोय करीन पैशाअडक्याकडून. तेव्हा निःशंकपणे तू कागदा-वर सही कर पाहू.

पृष्ठ ५७ वर

# शे. का. पक्षाचा प्रभाव कमी

वा. दा. रानडे

अविरोध निवड हे एक यशाचे गमक मानले तर काँग्रेसने ३० जागा बिनविरोध जिंकून १९७२ च्या विधानसभा निवडणुकीतील आपल्या यशाला चांगली सुरवात केली आहे असेच म्हटले पाहिजे. अविरोध निवडीचा उच्चांक आंध्र प्रदेशने केला. तेथे काँग्रेसचे १७ उमेदवार अविरोध निवडून आले. या सतरा जणांमध्ये दोघे १९६७ च्या निवडणुकीत पराभूत झाले होते. गेल्यावेळी पराभूत झालेले दोघे यावेळी बिनविरोध निवडून येतात याचा अर्थ विजयाचे वारे निश्चितपणे काँग्रेसच्या बाजूने वहात असून गेल्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीसारखेच मोठे यश विधान सभा निवडणुकीतही काँग्रेस मिळवणार.

लोकशाहीच्या दृष्टीने अविरोध निवड चांगली की वाईट ? उमेदवारांमध्ये लढत होणं हेच वास्तविक जिवंत लोकशाहीचे लक्षण. आपल्या कार्यामुळे जनतेच्या सर्व थरांचा विश्वास संपादन केलेल्या व्यक्ती अविरोध निवडून आल्या तर हरकत नाही, पण काँग्रेसतर्फे बिनविरोध निवडून आलेले सर्व उमेदवार अशा तोलाचे निश्चितच नाहीत. अर्ज मागे घेण्यासाठी प्रतिस्पर्ध्यांवर अनेकदा दडपण आणले जाते. आमिषे दाखविली जातात. आपल्या विरुद्ध कोणी उभेच राहू नये येथपासून या दडपणाला सुरूवात होते. हे दडपण सिद्ध करण्याइतका पुरावा लोकांजवळ असला तरी त्यासाठी कोर्टापुढे येण्याची त्यांची तयारी नसते, खर्चाच्या दृष्टीनेही ते शक्य नसते. तेव्हा अविरोध निवड हे निकोप लोकशाहीचे प्रतीक मानता येणार नाही.

महाराष्ट्र काँग्रेसने यावेळी तीस जागा बिनविरोध जिंकून आपल्या यशाची मुहूर्तमेढ रोवली. या विजयी उमेदवारांत महसूल खात्याचे राज्यमंत्री सोळंके आहेत. गेवराई मतदारसंघात ते बिनविरोध निवडून आले. गेवराईची जागा १९६७ साली

पृष्ठ ४४ वर

# चाकावरचे विचार

श्री. मा. भावे

## नवीन गणित

महाराष्ट्र सरकारने १९७२ च्या जूनपासून नवी शिक्षण योजना अंमलात आणण्याचे ठरविले आहे. ही योजना येत्या जूनमध्ये आठव्या इयत्तेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू होणार आहे. या योजनेनुसार आठवीच्या अभ्यासक्रमात नवीन गणित हा विषय अनिवार्य केला आहे. थोडक्यात येत्या जूनमध्ये आठवीतील सर्व विद्यार्थ्यांना नवीन गणित हा विषय शिकविला जाणार.

नवीन गणिताचे हे प्रकरण इतक्या निकरावर आल्यानंतर वृत्तपत्रे जागी झाली. श्री. वि. कृ. देवधर यांनी प्रथम 'महाराष्ट्र टाइम्स' व नंतर 'केसरी' या पत्रांतून लेख लिहून नवीन गणित सक्तीचे करण्यास विरोध दर्शविला. त्यानंतर श्री. द. न. गोखले, वैद्य इत्यादी शिक्षणपेशातील व्यक्तींनीही नवीन गणित अनिवार्य करण्याच्या शासकीय धोरणावर कडक टीका केली. मुख्याध्यापक संघातील अधिकारी व्यक्तींनीही शिक्षणमंत्र्यांची भेट घेऊन नवीन गणिताविषयीची नापसंती त्यांच्या कानांवर घातली. शिक्षणमंत्र्यांनी शिक्षणयोजना पूर्णपणे अंमलात आणण्याचा निर्धार बोलून दाखविला. सारांश, येत्या चार महिन्यांत काही बदल घडून येतील अशी आशा नाही.

असा वादविषय झालेले हे नवे गणित आहे तरी कसे ?

गणित विषयाच्या शास्त्रशुद्ध अभ्यासाला युक्लिडच्या भूमितीपासून सुरुवात झाली. युक्लिडने काही आदिसिद्धान्त (Axioms) सिद्धतेशिवाय मान्य केले आहेत. उदा. दिलेल्या बिंदूतून दिलेल्या रेषेला समांतर अशी एकच रेषा काढता येते, हे विधान तो आदिसिद्धान्त मानून सिद्धतेखेरीज स्वीकारतो या आदिसिद्धान्तांशिवाय इतर जे सिद्धान्त आहेत त्यांच्या सिद्धता मात्र द्याव्या लागतात आणि त्या सिद्धता वर उल्लेखिलेल्या आदिसिद्धान्तांवर अवलंबून असतात. म्हणून आदिसिद्धान्त हे युक्लिडच्या भूमितीला पायाभूत आहेत.

युक्लिडच्या भूमितीतील दुसरा महत्त्वाचा भाग व्याख्यांचा. बिंदू, रेषा, कोन इत्यादी संज्ञांच्या काटेकोर व्याख्या देण्याचा प्रयत्न भूमितीत केला आहे आणि या व्याख्याही महत्त्वाच्या आहेत, कारण त्यांचा उपयोग प्रमेये सिद्ध करताना पदोपदी केला जातो.

या व्याख्या आणि आदिसिद्धान्त कोणत्या आधारावर स्वीकारण्यात आले? त्याबद्दल खुद्द युक्लिडने काहीच म्हटलेले नाही. परंतु असे दिसते, की प्रत्यक्षात अनुभवाने हे आदिसिद्धान्त आणि व्याख्या खऱ्या ठरतात म्हणून त्या मान्य झाल्या. उदा. कागदावर आपण दिलेल्या रेषेला दिलेल्या बिंदूतून समांतर अशा एकाहून अधिक रेषा काढण्याचा कितीही प्रयत्न केला तरी तो सिद्धीस जात नाही. म्हणून समांतर रेषांचा आदिसिद्धान्त मान्य झाला.

ग्रीक संस्कृतीच्या अंतानंतर गणिताचा विकास कुंठित झाला आणि गणिताच्या अभ्यासाला पुन्हा सुरुवात सोळाव्या शतकात झाली. त्या वेळी ग्रीकांची भूमिती ग्राह्य मानली गेली आणि न्यूटनच्या गतिसिद्धान्तासही ग्रीक भूमितीच पायाभूत आहे. अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात कॅल्क्युलसचा शोध लागून गणिताच्या विकासाला नवी गती मिळाली आणि गणिताचा उपयोग विज्ञान, रसायन, ग्रहगणित इत्यादी शास्त्रांत होऊ लागला.

अठराव्या शतकाच्या शेवटी गणिताच्या प्रगतीने शास्त्रज्ञ इतके दिपून गेले होते, की पुरेसा वेळ आणि कागद उपलब्ध झाला तर साऱ्या निसर्गव्यवहाराचे एक गणित मांडता येईल अशी खात्री त्यांना वाटत होती. विश्वाच्या कोड्याची गणित ही गुरुकिल्ली आहे असा त्यांचा विश्वास होता. युक्लिडची भूमिती व त्यावर आधारित अधिक प्रगत असे गणित यांच्या साहाय्याने आपली बुद्धी सर्व ईश्वरी लीलांचे आकलन करू शकेल असा गर्व त्यांना झाला होता.

तथापि या विश्वासाला एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस तडा गेला. युक्लिडचे आदिसिद्धान्त न मानणारी अशी भूमिती त्यावेळी निर्माण झाली. पुढे रीमान या 'गणिती'ने युक्लिडचा समांतर रेषांचा आदिसिद्धान्त न मानणारी नवी भूमिती तयार केली. इतकेच नव्हे तर ही भूमिती वास्तवाला अधिक जवळची आहे असेही आढळून आले. सारांश आजपर्यंतचे गणित वास्तवाची समाधानकारक उकल करू शकेल हा गणितशास्त्राचा अहंकार फोल ठरला.

याचा परिणाम असा झाला, की विश्वाचा उलगडा करण्याची आकांक्षा गणिताने सोडून दिली आणि व्यवहाराशी व वास्तवतेशी फारकत घेतली. गणिताचे आदि-सिद्धान्त व व्याख्या वास्तवाशी मिळत्याजुळत्या असल्याच पाहिजेत हा आग्रह सोडून देण्यात आला. आपल्या प्रमेयांचा व्यवहारात उपयोग झाला पाहिजे ही इच्छाही राहिली नाही. यातूनच गणिताला नवीन स्वातंत्र्याचा लाभ झाला. नव्या गणिताचा जन्म या स्वातंत्र्यातूनच झाला आहे.

नव्या गणितात कोणतेही आदिसिद्धान्त मानता येतात, फक्त ते परस्परांशी सुसंगत असावे लागतात. त्या आदिसिद्धान्तापासून शक्य तितकी प्रमेये तर्काच्या साहाय्याने सिद्ध करतात व अशा रीतीने नवगणिताची शाखा तयार होते. त्या शाखेचा व्यवहारात काही उपयोग होईलही, पण तो व्हावा या हेतूने ती शाखा


तयार केलेली नसते. याबद्दलचे एक उदाहरण असे. आजवर आपण बीजगणितात क्ष × य = य × क्ष हे मानत आलो. पण बीजगणिताची अशीही एक शाखा आहे, की तीत क्ष × य आणि य × क्ष या दोन संख्या समान नाहीत.

थोडक्यात म्हणजे नवीन गणित हे बुद्धिबळासारखे आहे. बुद्धिबळात मोहोरी व प्यादी यांच्या हालचालींचे काही नियम असतात आणि त्या नियमांना धरून मोहोऱ्यांच्या हालचाली कौशल्याने केल्या असता खेळ आकर्षक होतो. नवीन गणितातही काही मूलभूत नियम मान्य करून विचारांचा खेळ खेळला जातो. नवीन गणिताची प्रत्येक शाखा हा विचाराचा एक खेळ आहे.

## सक्तीचे नवीन गणित

नवीन गणिताचे स्वरूप जर असे आहे, तर ते सर्व विद्यार्थ्यांना सक्तीचे कशासाठी करावयाचे असा प्रश्न साहजिकच पडतो. आजपर्यंच्या शालेय गणितात युक्लिडची भूमिती, त्रैराशिक व पंचराशिक यांवर आधारलेले अंकगणित, गुणक, समीकरणे यांचा समावेश असलेले बीजगणित इतक्या गोष्टी होत्या. व्यवहारात हे ज्ञान पुरेसे होते. हे गणितही शालान्त परीक्षेत अनिवार्य नव्हते. असे असता नवीन गणित सक्तीचे करणे योग्य नाही, या श्री. देवधर, गोखले आदी मंडळींच्या म्हणण्यात तथ्य आहे, हे मान्य केलेच पाहिजे.

पण या मुद्याला उत्तर दोन बाजूंनी देता येईल. पहिले असे, की आजपर्यंत शालेय अभ्यासक्रमात अंतर्भूत असलेले गणित, नवीन अभ्याक्रमातून कमी केले आहे असे नाही. गुणक, समीकरणे व युक्लिडची काही प्रमेये नवीन अभ्यासक्रमांत आहेतच. फक्त त्याचे महत्त्व इतर गोष्टींचा समावेश करून कमी करण्यात आले आहे. दुसरे असे, की नवीन गणित हा विचारांचा खेळ आहे, हे खरे. पण म्हणूनच त्याचे ज्ञान

असणे महत्त्वाचे आहे. ती एक समृद्ध अशी विचारसरणी आहे. आजपर्यंतचे गणित वह्या-पुस्तकातून बंद राहू शकत होते. हे नवे गणित विचाराचा कायमचा भाग व्हावे अशा योग्यतेचे आहे. शालेय शिक्षणाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना माहिती पुरविणे इतके मर्यादित राहून चालणार नाही तर विचारांच्या रचना तपासण्याची सवय त्यांच्या बुद्धीला लावणे हेही त्या शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे. हे ध्येय जर मान्य असेल तर नवीन गणिताचा अभ्यासक्रमात समावेश होणे आवश्यक आहे.

तेव्हा नवीन गणिताचा शालेय अभ्यासक्रमात अनिवार्य म्हणून समावेश करण्यात तत्त्वत: कोणाचा विरोध असू नये.

## नवीन गणिताचे शिक्षण

नवीन गणित शिकवणे आणि शिकणे या सोप्या गोष्टी नाहीत. नवीन गणिताची आवड निर्माण होण्यासाठी विशिष्ट सांस्कृतिक उंची शिक्षकात असली पाहिजे. तसेच शिकवण्याची विविध साधनेही हाताशी असणे आवश्यक आहे. नवीन गणित जर चांगल्याप्रकारे शिकवले जाणार नसेल तर ते न शिकवणे हेच उत्तम. कारण वर म्हटल्याप्रमाणे नवीन गणित हा आपल्या विचाराचा कायमचा भाग होणार आहे. इतिहास-भूगोल या विषयांच्या पुस्तकात चुका झाल्या तरी एक वेळ चालतात, कारण त्या माहितीच्या चुका असतात. पण चुकीचे गणित शिकविणे म्हणजे विचाराला चुकीचे वळण देणे होय.

असे असता महिन्याभराच्या अभ्यासवर्गातून नवीन गणित शिकविणारे शिक्षक तयार होतील अशी समजूत करून घेणे व्यर्थ आहे. जोपर्यंत नवीन गणितात अभिप्रेत असलेली विचारसरणी शिक्षकाच्या दैनंदिन जीवनातील विचाराचे अविभाज्य अंग होत नाही तोपर्यंत तो खऱ्या अर्थाने गणित शिक्षक होऊ शकणार नाही. तसा गणित-शिक्षक होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीत निराळी प्रगल्भता व सांस्कृतिक पातळी असणे जरूर आहे. असे शिक्षक मिळण्यासाठी निरनिराळ्या शाळांतून शिक्षक निवडून त्यांना वर्षभर शिकवून तयार करावे लागेल.

पण महाराष्ट्र सरकारने असे काहीही केलेले नाही. सरकारी पाठ्यपुस्तक मंडळाचे गणिताचे पुस्तकही जून ७२ पर्यंत तयार होईल असे दिसत नाही. ते पुस्तक जून ७३ मध्ये बाजारात येईल. खाजगी प्रकाशकांची पुस्तके प्रसिद्ध होतीलही पण त्यांनासुद्धा तज्ज्ञ लेखकांचा तुटवडा भासत आहे. तेव्हा नवीन शिक्षणक्रम, कमीत-कमी गणितापुरता तरी, एक-दोन वर्षे लांबणीवर टाकणे इतकाच पर्याय उरतो. महाराष्ट्राचे नवीन शिक्षणमंत्री याबाबतीत योग्य निर्णय घेतील अशी आशा आहे.

दरम्यान वृत्तपत्रांनी, शिक्षकांनी व पालकांनीही या विषयावर परिसंवाद भरवून, व्याख्याने ठेवून विचारचक्र फिरते ठेवले पाहिजे.

◻ ◻ ◻

सौ. तारा पंडित

# हे कलकत्ता

## शेख आले...शेख आले...!

सहा फेब्रुवारीच्या दुपारी ब्रिगेड परेड ग्राऊंड लक्षावधी लोकांच्या जमावाने खच्चून भरलं होतं. बांगला देश या नव्या राष्ट्राचे पहिले वहिले प्रधानमंत्री या नात्याने शेख मुजीब यांनी कलकत्त्यात पाऊल ठेवलं. त्यांनी दिलेलं अवघं २०–२५ मिनिटांचं भाषण ऐकण्यासाठी तासन्तास ताटकळत बसलेल्या जनतेच्या डोळ्याचं पारणं फिटलं त्यांना बघून !

एवढ्या सन्मानपूर्वक आयोजित केलेला हा स्वागत समारंभ पाहून ते सद्गदित झाले. विद्यार्थिदशेत याच कलकत्त्यात आपण राहात होतो, याचं त्यांना स्मरण झालं. कलकत्ता शहर नि तेथील रहिवासी यांच्याविषयीचं प्रेम त्यांच्या नजरेतून ओसंडत होतं. आपल्या भरदार आवाजात सुंदर काव्यमय भाषेत ते बोलत होते. शब्द जणू अंतःकरणाच्या तळापासून उसळत होते. बोलता बोलता ते म्हणाले–

'खरंच, तुमच्या या अमाप प्रेमाबद्दल काय देऊ मी तुम्हाला ?' आणि लागलीच गुरुदेव टागोरांच्या ओळी त्यांनी उच्चारल्या–

रिक्त आमी, निश्व आमी, देबार किच्छु नाइ ।
आछे शुधु भालोबाशा, दिये गेलाम ताइ ।।

(मी दरिद्री आहे, रिक्तहस्त आहे. तुम्हाला देण्यासाठी अथांग प्रेमाखेरीच माझ्याजवळ दुसरं काहीही नाही. म्हणून तेच मी तुम्हाला आज अर्पण करीत आहे.)

वंगबंधूसमवेत आलेल्या पाहुणे मंडळीत दोन उल्लेखनीय व्यक्ती होत्या. मुक्ति-संग्रामात गुरिल्लांचे नेतृत्व करणारे हे दोघे म्हणजे तोफेल अहमद आणि शेख मुजीब यांचे ज्येष्ठ पुत्र शेख कमल. पंतप्रधान इंदिरा गांधींसमवेत त्या दोघांचा परिचय करून देण्यात आला. तोफेल अहमद यांना त्या म्हणाल्या–'आपण आज इथे आलात म्हणून मला विशेष आनंद झाला आहे.' तोफेल शेख मुजीब यांचे राजकीय चिटणीस म्हणून काम पाहातात. शेख कमलशी बोलताना इंदिराजी म्हणाल्या– 'तुमचे वडील परत येऊ शकले ही केवढी आनंदाची घटना आहे ! आज तुम्हाला

त्यांच्याबरोबर इथे पाहून मला आनंद होत आहे.' शेख कमल सध्या बांगला देशच्या सैन्यातील एक लेफ्टनंट आहेत.

## विमानतळावर काय घडलं ?

शेख मुजीब यांनी विमानतळावर पाय ठेवला मात्र आणि एकच हलकल्लोळ माजला. विमानतळावर वास्तविक अगोदरच सुरक्षितता इत्यादीच्या बाबतीत व्यवस्था केलेली होती. तरीदेखील गोंधळ माजलाच. इकडे गार्ड ऑफ ऑनर होतोय नि पलीकडे जोरदार मारामारी. दोन्ही देशांचे फोटोग्राफर आणि वार्ताहरांना पोलिसांनी चांगलीच मारहाण केली. टेलिव्हिजनवालेही त्यात सापडले. कुणाच्या कॅमेऱ्याची तोडमोड झाली. काही निमंत्रित पाहुण्यांनाही आत शिरण्यास मनाई करण्यात आली. पार्लमेंटच्या एका सभासदावर शिवीगाळ ऐकण्याचा प्रसंग आला. हा सर्व गोंधळ माजण्यास एकच कारण, पोलिसांचा जादा उत्साह व त्यामुळे त्यांनी आपल्या अधिकाराच्या मर्यादांचे केलेले उल्लंघन !

तशातच एक प्रेस फोटोग्राफर श्रीमती इंदिरा गांधींपर्यंत येऊन पोचला, व त्यांचा फोटो काढू लागला. तोंच त्या म्हणाल्या–'अरे, आज तर वंगबंधूंचा दिवस आहे फोटो काढून घेण्याचा.' आणि मग हळूच त्याला विचारलं–'त्या तिकडे धक्काबुक्की कशासाठी चालली आहे ?' फोटोग्राफर म्हणाला– 'पोलीस लोक वार्ताहरांना मारहाण करून आपल्या शक्तीचे आणि अधिकाराचे प्रदर्शन करीत असावेत.'

अति व्यवस्थेचे हे परिणाम; आणखी काय ! बांगला देश मिशनचे मुख्य अधिकारी हुमायून रशीद चौधरी यांना फाटकाजवळच अडवून ठेवण्यात आलं. बांगला देशच्या पंतप्रधानांचे व्यक्तिगत P. R. O. श्री. अब्दुल हाशेम यांनासुद्धा आत प्रवेश मिळू शकला नाही. आपण कोणावर हल्ला करतो आहोत याचा जराही विचार न करता पोलिसांनी लाठीमार सुरूच ठेवला. या मारामारीत कमीत कमी दहा पत्रकार तरी जखमी झाले. काहींना जबरदस्त जखमा झाल्या.

मागाहून मात्र झाल्या प्रकाराबद्दल पोलीस अधिकाऱ्यांनी सर्वांची क्षमा मागितली. श्री. सिद्धार्थ शंकर रे यांना या विपरीत घटनेबद्दल फार वाईट वाटल्याचं कळलं. ते म्हणाले, की ते या प्रकरणी लक्ष घालतील. अर्थात त्यांनी एवढं मात्र जाणून असायला हवं, की असले प्रसंग घडून येण्याची ही काही पहिलीच वेळ नव्हे !

□ □ □

२६ फेब्रुवारी १९७२

सावरकरांचा सहावा आत्मार्पणदिन

एकूण
सुसंस्कृत कवी आणि
रांगडा शाहीर
अस्खलित वक्ता आणि
सूक्ष्म नट
अर्पणोत्सुक क्रांतिकारक आणि
दीर्घायुषी झालेला चिवट वृद्ध
राष्ट्रवादी नेता आणि
बुद्धिवादी विचारवंत
कर्मशूर सुधारक आणि
झुंजार पण धूर्त प्रचारक
असे सावरकर या नावाचे
एक अपूर्व व्यक्तित्व
भारतात होऊन गेले....



# सावरकरांचे सामाजिक विचार

डॉ. विद्याधर पुंडलिक

राष्ट्रीय आणि सामाजिक जीवनाच्या ज्या ज्या प्रवाहात सावरकर शिरले तो तो प्रवाह त्यांनी खालीवर उसळवून त्यात खळबळ उडवून दिली यात शंका नाही. आचारविचाराच्या प्रत्येक क्षेत्रांत आपल्या स्वतंत्र व्यक्तित्वाची आणि प्रतिभेची लखलखीत मुद्रा त्यांनी मागे ठेवली. तरुण वयात सावरकरांनी दहशतवादी क्रांतिकारकाचा वनवासी मार्ग पत्करला. पण त्यामागे नुसती देशभक्ती वा हुतात्म्याची अर्पणोत्सुकता नव्हती. मॅझिनीचा काव्यात्म राष्ट्रवाद आणि किमान हिंसेच्या अपरिहार्यतेतून स्वीकारलेली सशस्त्रता आणि सैनिकी क्रांती यांचे इतिहाससिद्ध आणि बौद्धिक अधिष्ठान त्यांनी उभे केले. निदान राजकीय नेत्यांत तरी भारताच्या राष्ट्रवादाच्या आशयाची चिकित्सा अशी त्यांनीच प्रथम–१९२५ च्या सुमारास–केली आणि हा आशय त्यांनी जरी हिंदुत्वात पाहिला असला तरी त्यात हिंदुधर्म आणि राष्ट्रवाद यांची फारकत त्यांनी तेव्हाही केली होती, हे लक्षात ठेवण्याजोगे आहे. हिंदु-मुसलमानांसारख्या मूलभूत राष्ट्रीय ऐक्याच्या पण राजनीतीच्या बाजू असलेल्या प्रश्नात, मुस्लीम जातीयतेचा उगम मुस्लीम धर्म–विचारात आणि भारतातील त्यांच्या आक्रमक आणि असहिष्णु जेतेपणाच्या इतिहासात आहे, याचे तीक्ष्ण आणि शिकारी भान, त्यांच्याइतके फारच थोड्या नेत्यांनी दाखविलेले दिसते. साहित्यांत भाषा आणि लिपी यांच्या शुद्धीचा त्यांनी सावेश पुरस्कार केला, झेप आणि झडप ध्वनित करणारे स्वतःचे एक स्वतंत्र, 'वैनतेय' वृत्त रचले आणि महाकाव्याचे भव्य संकल्प सोडून त्यातील लहानसे सर्ग लिहिले. सामाजिक सुधारणांचे पुरोगामी तत्त्वज्ञान सांगतासांगताच सर्व हिंदूसाठी पतितपावन मंदीर आणि अस्पृश्यांबरोबर झुणकाभाकर भोजनासारखे कार्यक्रम प्रत्यक्षात आणून कृतिशूर सुधारकांचे खरे ब्रीद त्यांनी दाखविले. (या सर्वच क्षेत्रांतील सावरकरांचे विचार, दृष्टिकोण, त्यामागील शास्त्रीयता आणि अंतिम विधायकता मान्य होण्याजोगी आहेत असे नाही. पण त्यात त्यांचे असे खास सावरकरी वेगळेपण आहे, हे नाकारता येणार नाही.)

सावरकरांच्या सामाजिक विचारांमागेही अशीच एक वेगळी कृतबुद्धी, खणखणीतपणा आणि अचूक भेदकपणा दिसून येतो.

आपली दीर्घ ऐतिहासिक परंपरा आणि ब्रिटिशांच्या आगमनाबरोबर आलेली पाश्चात्य संस्कृति यांच्या परस्पर आघातातून भारतात समाज-विचारांचे खरे आंदोलन सुरू झाले. त्यापूर्वीही ख्रिश्चन आणि इस्लाम या धर्मांनीही हिंदुसमाजावर आघात केले होते. पण तत्त्वज्ञान, विचार आणि सामाजिक संस्था या तिन्ही बाबतीत या दोन धर्मांनी हिंदुसमाज वा संस्कृतीमध्ये कोणत्याही मूलभूत स्वरूपाची उलथापालथ केली नाही. ब्रिटिशांनी आणलेली पाश्चात्य संस्कृति–म्हणजे तिची मूल्ये, जगण्याच्या प्रेरणा व श्रद्धा, शिक्षण, कायदा, चालीरिती, राजकीय व सामाजिक संकल्पना व संस्था–ही सर्वस्वी व खऱ्या अर्थाने परकीय होती. त्यामुळे आपली सर्व

अधिष्ठानेच मुळापासून हादरली गेली आणि आधुनिकता आणि परंपरा या केंद्रबिंदूंभोवती आपल्या समाजविचारांची चक्रे फिरू लागली. आजही ती फिरत आहेत.

दीडशे वर्षापूर्वीच्या या सामाजिक विचारांच्या इतिहासात आपल्याला वेगवेगळे पंथ दिसून येतात. आजपर्यंत बऱ्याचशा समीक्षकांनी ते सांगितले आहेत. त्यांचा आढावा घेतल्यास, 'आम्हाला काही झालेच नाही' असे म्हणणारा सनातनी आणि "भारताचे संपूर्ण पश्चिमीकरणच झाले पाहिजे' असे म्हणणारा सुधारक ही दोन कडेची टोके आणि त्यामधल्या अवस्था यामधून आपले सामाजिक चिंतन व्यक्त होत राहिले आहे, असे दिसून येईल. धर्म ही सनातन श्रद्धा आहे. (म.शि.गोळे).प्रागतिक, बुद्धिप्रमाणवादी पाश्चात्य विचार स्वीकारून पण परंपरेचा विध्वंस न करता धर्म आणि शुद्ध ज्ञान यांच्या सहाय्याने भारतीय समाजाची पुनर्रचना केली पाहिजे (राजा राम मोहन रॉय, लोकहितवादी आणि न्या. रानडे). निखळ बुद्धिवाद आणि उदारमतवाद यांची कास धरून 'आमच्या स्मृति आम्हीच करणार' या पीळाने भारतीय परंपरेत शुद्ध नवता आणली पाहिजे (आगरकर) समाजशास्त्राची प्रत्यक्ष प्रमाणे व निरीक्षणे यातून सिद्ध होणाऱ्या समाजविज्ञानाच्या सहाय्याने भारतीय समाजाचा विचार व्हावयास हवा (राजवाडे–केतकर). वर्णाश्रम आणि जातिधर्म या ब्राह्मणी कल्पना आणि संस्था हाच हिंदुसमाज आणि संस्कृति यांचा पाया आहे, तो नष्ट करून समताप्रधान समाजाची नवीन उभारणी केली पाहिजे. (लोकहितवादी फुले व आंबेडकर) समाजकारण हे अंतिमतः एका समर्थ राष्ट्राचे अंग आहे. (विवेकानंद), असे दिसून येईल की हे सर्व विचार आणि त्यांचे ते ते प्रवक्ते हे गेल्या दीडशे वर्षांच्या भारताच्या आणि महाराष्ट्राच्या सामाजिक प्रवासातील महत्त्वाचे टप्पे आहेत.

## संपूर्ण नास्तिकवादी भूमिका

वरवर पाहता सावरकरांना शेवटच्या वर्गात–राष्ट्रवादी प्रज्ञावंतात आणि समाजसुधारकात–घालता येईल. पण ते पूर्णपणे बरोबर ठरणार नाही. विवेकानंद रूढ अर्थाने धर्मवादी नाहीत हे खरे आहे. धर्म म्हणजे रसरसत्या ऐहिक अभ्युदयाचाच मार्ग, धर्म म्हणजे स्वबांधवांविषयीची एक विशाल करुणा. धर्म, म्हणजे लौकिक मानवी आणि सामाजिक जीवन सामावून घेऊन पण त्याला छेदून जाणारे एक उच्चतम मूल्य आणि श्रद्धा–अशी विविध सूत्रे विवेकानंदांच्या तत्त्वज्ञानात आहेत, हेही बरोबर आहे. पण त्याचबरोबर ईश्वराचे अस्तित्व, आत्मा, परमात्मा, कर्म, पुनर्जन्म या कल्पनाही विवेकानंदांना मान्य होत्या. हिंदुधर्माची खरी शक्तिस्थाने वैदिक परंपरेत आहेत, वेदांमध्ये हिंदुधर्माचा मूळ पुरुषार्थ आहे, आपण फक्त त्यावर बसलेली जुन्या सनातनी आणि प्रतिगामी अर्थांची शतशतकांची राख झाडावयाची आहे, हा तर विवेकानंदाच्या विचारांचा प्रमुख ध्वनि आहे.

सावरकर अशा विवेकानंदी परंपरेतील नाहीत. ते राष्ट्रवादी असले तरी धर्मा-

तील अध्यात्म, ईश्वर, आत्मा, परमात्मा आणि कर्म पुनर्जन्म याबद्दलच्या कल्पना त्यांनी अजिबात मानलेल्या दिसत नाहीत. ' अनादि, अनंत आणि अवध्य ' असा आत्मा त्यांनी आपल्या काव्यात काही ठिकाणी गौरविला आहे. अध्यात्माच्या आणि योगविद्येच्या इतर छटाही त्यांच्या काव्यात आणि आत्मचरित्रात कुठेकुठे विखुरलेल्या आहेत. पण याचे प्रमाण सावरकरांच्या एकंदर विचारसरणींत फार कमी आहे. शिवाय त्यांच्या सामाजिक निबंधात या छटांचा मागमूसही दिसत नाही. वेद, उपनिषदे, गीता, निरनिराळ्या आचार्यांची दर्शने, भारतीय संतपरंपरा—या सर्वांतून निर्माण होणारे जे खोल संस्कार प्रातिनिधिक अशा भारतीय मनावर दिसतात, त्यांच्या अस्पष्टही खाणाखुणा सावरकरांच्या मनावर दिसत नाहीत. अध्यात्म आणि धार्मिक तत्त्वज्ञान यांचे दोर त्यांनी पुन: न परतण्याच्या निर्वाणीने आणि निर्णायकपणे कापले आहेत त्यामुळे हिंदूराष्ट्रवादाचा हा कडवा प्रवर्तक तसा प्रतिनिधिक भारतीय परंपरेत बसतच नाही.

या दृष्टीने ' मनुष्याचा देव आणि विश्वाचा देव, ' ' दोन शब्दात दोन संस्कृति ' ' ईश्वराचे अधिष्ठान म्हणजे काय ?' ' खरा सनातन धर्म कोणता ?' ' आजच्या सामाजिक क्रांतिचे सूत्र, ' ' आमच्या धर्मभावना दुखवू नका अं ! ' हे सर्व निबंध पाहण्याजोगे आहेत, या लिखाणावरून असे दिसते, की विश्वाची—आदिशक्ती अशी सावरकर मानतात. पण तिच्यामध्ये मनुष्याला अभिप्रेत असलेले शुभंकर असे देवत्व वगैरे काही त्याना दिसत नाही. या शक्तीचा आणि मनुष्य—जीवनाचा वा अस्तित्वाचा काहीही संबंध वा नाते नाही असे त्यांचे रोकडे म्हणणे आहे. साकल्याने पाहता त्यांची भूमिका एका विशिष्ट प्रकारच्या नास्तिकवाद्याची आहे. ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट अशी की आपली ही भूमिका मांडताना एरवी मनस्वी आणि भावनोत्कट असलेला हा कवि विचारवंताला साजेसा असा सापेक्षतेचा तोल आणि नम्रपणाही त्या त्या ठिकाणी नीट राखून आहे !

आपली ही भूमिका सावरकरांनी अशी मांडली आहे:—

" कोणत्या हेतूने वा हेतूवाचून हे जगड्व्याळ विश्व प्रेरित झाले ते मनुष्याला तर्किता देखील येणे शक्य नाही. जाणता येणे शक्य आहे ते इतकेच की, काही झाले तरी मनुष्य हा ह्या विश्वाच्या देवाच्या खिजगणतीतही नाही. जशी कीड, मुंगी, माशी तसाच ह्या अनादि अनंत कालाच्या असंख्य उलाढालीतील हा मनुष्यही एक अत्यंत तात्पुरता आणि अत्यंत तुच्छ परिणाम होय.

तरीदेखील ज्या कोणत्या हेतूने वा हेतूवाचून ही विश्वाची प्रचंड जगड्व्याळ उलाढाल चालू आहे तीत एक अत्यंत तात्पुरता आणि अत्यंत तुच्छ परिणाम म्हणून का होईना, पण मनुष्याला, त्याच्या लांबी-रूंदीच्या गजाने मापता यावे असे, त्याच्या संख्येत मोजता यावे असे, इतके सुख नि इतक्या सोयी उपभोगिता येतात हा मात्र आणि एवढाच काय तो ह्या विश्वाच्या देवाचा मनुष्यावर झालेला उपकार होय !

परंतु त्या पलीकडे ह्या विश्वाच्या देवाशी, वाटेच्या भिकारड्याने सम्राटाशी जोडू पहावा तसा कोणताही बादरायणसंबंध जोडण्याची लचाळ हाव मनुष्याने आमूलात् सोडून द्यावी हेच इष्ट ! ...

' ईश्वराचे अधिष्ठान ' म्हणजे काय ह्याचा प्रथम स्पष्ट उलगडा झाला पाहिजे. जर भगवंताच्या अधिष्ठानाचा इतकाच अर्थ असेल की ऐहिक आणि मानवी उपायांच्या हातीच यशाची किल्ली नसून मनुष्याच्या ज्ञानाच्या नि शक्तीच्या पलीकडे ज्या अनेक अज्ञात, अज्ञेय, प्रचंड अशा अमानुष विश्वशक्ती आहेत, त्यांच्या आघाताप्रत्याघातांच्या टकरीतही त्या यशाचा वा अपयशाचा संभव असतो, तर तो अर्थ बरोबरच आहे ! अत्यंत क्षुद्र अशा गवताच्या काडीच्या हलण्यापासून तो भूकंपाच्या सूर्यमालांच्या प्रलयंकर उत्पातापर्यंत ज्या विश्वशक्तीच्या उलाढाली नि टकराटकरी चाललेल्या आहेत, त्या साऱ्या बलाबलांचे त्यापुरते फलित (Resultant) म्हणजेच कोणतीही घटना होय. ह्या तात्त्विक अर्थी कोणत्याही चळवळीचे यशापयश हेही एक फलितच असल्यामुळे मानवी उपायांच्या पलिकडील त्या अमानुष शक्तींचा व्यापार हेच त्यांचे महाकारण होय. त्यास जर ईश्वराचे अधिष्ठान म्हणावयाचे असेल तर मानवी उपाय नि साधने ही प्रत्यक्ष कारणेच कोणत्याही यशाची अशेष कारणे नसून ती अमानुष विश्वशक्तीची गुंतागुंत, ते ' दैवं चैवात्र पचमम्, ' तो योगायोग, हे त्यांचे महत्कारणही अनुकूल असले पाहिजे, हे म्हणणे यथार्थ आहे. मानवी चळवळ कितीही सामर्थ्यसंपन्न असली आणि ती कितीही यशस्वी झाली तरी त्या यशाचे सर्व यश मनुष्यकृत प्रयत्नांसच नसून अतिमानुष शक्तीचा व्यापारही त्यास अनुकूल असाच घडत गेला; दैवाचा फासाही तेच दान देणारा पडत गेला, आणि त्या दैवास देवाची इच्छा म्हटले तर देवाचे, ईश्वराचे अधिष्ठान त्यास लाभले म्हणून ते यश आले, ही जाणीव व्यक्तविण्याचाच जर ह्या ओवीचा उपदेश असेल तर तिच्यातील ते तत्त्व अगदी यथातथ्य आहे यात शंका नाही. किंबहुना ज्याला आपण आपल्या मानवी समजुतीसाठी मानवी यत्न वा मानवी उपाय म्हणतो, तेही वास्तविक पाहता त्या अतिमानवी शक्तीचाच एक प्रादुर्भाव आहे. "

## विज्ञान हाच सनातन धर्म !

लोकहितवादींपासून सावरकरांपर्यंतच्या प्रत्येक विचारवंतांच्या व्यक्तित्वात ग्रंथप्रामाण्यनिषेध आणि बुद्धिवाद याबरोबरच आणखीही काही प्रेरणा दिसून येतात. लोकहितवादींना शुद्ध धर्माची आणि शास्त्रीय विद्येची उपासना आणि लोकशाही संस्था हव्या होत्या. रानड्यांना उदार, प्रागतिक धर्मशीलता आणि सर्वंकष सांस्कृतिक आणि संस्थात्मक परिवर्तन हवे होते. आगरकरांना समाजजीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणाऱ्या सामाजिक सुधारणा हव्या होत्या. फुले-आंबेडकरांना भटशाहीचे समूळ उच्चाटन आणि अस्पृश्यादी दलित वर्ग ज्यात वर येईल असा समता-

धिष्ठीत समाज हवा होता. राजवाडे-केतकरांना समाजविज्ञान हवे होते.

या सर्वांपेक्षा सावरकरांच्या प्रेरणा दोन बाबतीत, वेगळ्या होत्या.

सावरकरांच्या विचारसृष्टीत विज्ञानाला अनन्यसाधारण महत्व होते. किंबहुना विज्ञान हाच एकमेव धर्म आणि त्याहिपेक्षा महत्त्वाचे म्हणजे तोच त्यांना सनातन धर्म वाटत होता! सर्वच मोठे वैज्ञानिक विज्ञानाला नवा धर्म मानीत नाहीत. उलट त्यातील एक मोठा वर्ग ईश्वराचे अस्तित्व मानतो. विज्ञान सिद्ध करीत असलेली विश्वरचना हीही एका पारलौकिक शक्तीचाच आविष्कार आहे असेही त्यातले काहीजण म्हणतात. विज्ञान आणि धर्म सर्वस्वी स्वतंत्र किंवा सुसंवादी क्षेत्रे आहेत, असे प्रतिपादणाऱ्या वैज्ञानिकांचाही वर्ग उपेक्षणीय नाही. या पार्श्वभूमीवर आणि समकालीन धर्मनिष्ठ पिढी ध्यानात घेता, सावरकरांची ही ज्वलंत विज्ञाननिष्ठा मोठी लक्षणीय वाटते. या संदर्भात सावरकरांचे हे उद्गार पहा—

'प्रत्यक्ष, अनुमान वा शब्द यापैकी कोणच्याही प्रमाणाने पारलौकिक वस्तुस्थितीचे आज उपलब्ध असलेले वर्णन हे सिद्ध होत नसल्याने त्यास सनातन धर्म त्रिकालाबाधित नि अपरिवर्तनीय सत्य, असे म्हणता येत नाही.

प्रत्यक्ष अनुमान आणि त्यांना सर्वस्वी विरुद्ध न जाणारे आप्तवाक्य ज्या प्रमाणांच्या आधारे सिद्ध होऊ शकणारे आणि ज्याविषयी कोणीही यथाशास्त्र प्रयोग केला असता त्या त्या कार्यकारणभावाच्या कसोटीस जे पूर्णपणे केव्हाही उतरू शकतात असे मनुष्याच्या ज्ञानाच्या आटोक्यात जे जे सृष्टिनियम आणि जी जी वैज्ञानिक सत्ये आज आलेली आहेत त्यास त्यासच आम्ही आमचा सनातन धर्म समजतो...निःशेष परिगणनास्तव नव्हे तर दिग्दर्शनार्थ म्हणून खालील नामोल्लेख पुरे आहेत. प्रकाश उष्णता, गती, गणित, गणितज्योतिष, ध्वनी, विद्युतचुंबक रेडियम, भूगर्भ, शरीर, वैद्यक, यंत्र, शिल्प, वानस्पत्य, जैव आणि तत्सम जी प्रयोगक्षम शास्त्रे (सायन्सेस). या सर्वांचे जे प्रात्यक्षनिष्ठ आणि प्रयोग सिद्ध नियम आज मनुष्यजातीस ज्ञात झालेले आहेत तोच आमचा खरा सनातन धर्म होय.'

(आगरकरांचाही असाच काहीसा सूर आहे. पण १९ व्या शतकांतील युरोप मधील उत्क्रांतीवाद, अज्ञेयवाद या बरोबर तो येतो. निसर्ग, सृष्टी या बद्दलचे एकं कुतूहलहि आगरकराच्या मनोव्यापारात दिसते.)

अशा प्रकारच्या विज्ञाननिष्ठेतून अर्थातच सावरकर एक अपरिहार्य तर्कसंगति म्हणून यंत्राचे आणि तंत्रज्ञानाचे (Technology) पूर्ण स्वागत करतात. यंत्र हा शाप नसून ते उच्चप्रतीचे वरदान आहे, प्रत्येक यंत्र म्हणजे माणसाचे वाढलेले इंद्रिय आणि त्यातील शक्तीचा विस्तारच आहे, यंत्राने बेकारी वाढते हे थोतांड आहे, असे त्यांचे ठाम आग्रह आहेत. यंत्राचे स्वागत आणि त्याचा स्वीकार यांचे अप्रूप आज आपल्याला काय आहे? आपण यंत्रयुगातच जन्मलो आहोत. आणि त्यांचे काही भयावह असे दुष्परिणामही पाहत आहोत. पण त्यांचा काल आणि

अजूनही यंत्रपूर्व संस्कृतीच्या शांत व स्थिर रूपाविषयी बऱ्याचशा विचारवंतांना असलेले भावनात्मक आकर्षण ध्यानात घेता, सावरकरांचे हे यंत्रपूजन आणि त्यामागचा आधुनिकत्वाचा वेध सूचक आहे, यात शंका नाही.

धर्म आणि अध्यात्म हे वैयक्तिक श्रद्धेचे विषय आहेत, विज्ञान मात्र सनातन आणि सामूहिक धर्म आहे, अशी घेतलेली ठाम भूमिका सावरकर सुसंगतपणे शेवटपर्यंत रेटत नेतात. त्यात मग हिंदू आणि मुसलमान, असा फरक ते करत नाहीत. गाय हा सर्व हिंदूंचा एकमेव सांस्कृतिक मानबिंदू आहे असे आजही मानणाऱ्या हिंदु धर्मनिष्ठांना धक्का बसेल इतक्या जोराने ते या गायखुळचा सिद्धांताचे खंडन करतात. पण त्याचवेळी गाईला मारणे हे पुण्य आहे असे सांगणाऱ्या मुसलमान धर्माज्ञेचाही ते तितक्याच परखडपणे समाचार घेतात. मसलमान धर्म कडवे असल्यामुळेच त्या समाजात एकजीवपणा, एकजूटपणा नि बळकटी आलेली आहे म्हणून हिंदुंनीही तसेच आपल्या धर्माबाबत कडवे राहिले पाहिजे हा विचार आजही बऱ्याचशा हिंदुंना प्रिय आहे. सावरकर बजावतात "धर्मभोळेपणापायी, कट्टर पोथीनिष्ठेपायी आणि धर्मवेडेपणामुळे मुसलमानांची भयंकर दुर्दशा झाली आहे. ते हिंदूहून मागासलेले आहेत. जेव्हा त्यांच्याकहून ऐहिकदृष्टया अधिक संघटित अशा समाजाशी मुसलमानांची गाठ पडली, तेव्हा मुसलमानांची पारंपारिक पोथीनिष्ठा मुळीच उपयोगी पडली नाही." म्हणून हिंदू आणि मुसलमान या दोघांनाही सावरकरांचा संदेश आहे "धर्मवेडाची नांगी ठेचू शकेल असे एकच बळ आहे आणि ते म्हणजे विज्ञानबळ! या विज्ञानयुगात समाज संस्थेची जी संघटना करावयाची ती प्रत्यक्ष ऐहिक नि विज्ञाननिष्ठ अशाच तत्त्वांवर केली पाहिजे." आजही या संदेशाचे केवढे मोल आहे!

बुद्धिप्रामाण्य, ऐहिकता, विज्ञान आणि यंत्र-तंत्र यावरची निष्ठा स्वीकारण्याची सावरकरांची प्रेरणा पूर्व सूरींच्या प्रेरणांहून आणखी एका बाबतीत वेगळी आहे, ती म्हणजे सर्वंकष व निरपवाद राष्ट्रसापेक्षता होय. परंपरेच्या डबक्यात राहून साचलेल्या शेवाळचासारख्या झालेल्या भारतीय समाजाचे उत्थान होण्यासाठी वरील मूल्ये रानडयांपासून आगरकरांपर्यंत सगळयांनाच हवी होती. पण त्यामागे व्यक्तित्व. व्यक्तिविकास, व्यक्तिस्वातंत्र्य, ही मूलभूत मूल्ये या विचारवंतांना निरपवादपणे हवी होती. सावरकरांनाही लोकशाही आणि व्यक्तीवादाची ही मूल्ये अप्रत्यक्षपणे अभिप्रेत असावीत असे वाटते. पण प्रत्यक्षपणे किंवा त्यांच्या खास अभिनिवेशाने किंवा तळमळीने ती त्यांनी कधी मांडलेली दिसत नाहीत. किंबहुना विचारांची किंवा मूल्यांची अमूर्त पातळीवरून सावरकर कधी मीमांसा करतच नाहीत, तेवढी त्यांची बौद्धिक ताकद नव्हती असे कोण म्हणेल? म्हटले तर ते किती तर्ककर्कश होऊ शकत याचे अनेक पुरावे देता येतील (वर काही आलेलेही आहेत.) पण अशी गरजच त्यांना कधी भासली नाही

याचे कारण त्यांच्या ध्यानीमनी राष्ट्रापेक्षा दुसरे काही नव्हतेच. राष्ट्र हेच त्यांनी अंतिम नैतिक मूल्य मानले असल्यामुळें कोणत्याही विचारांचा कस ते नेहमी राष्ट्रहिताच्या कसोटीवर पाहतात. विज्ञान, तंत्रविद्या आणि अद्यावतपणाही त्यांना पाहिजे आहे, तो भारतीय राष्ट्राने 'त्रिखंडविजयी' व्हावे म्हणून! "श्रुतिस्मृतिप्रभृती सारे पुरातन ग्रंथ आम्ही अत्यंत आदराने आणि ममत्वाने सन्मानतो, पण ऐतिहासिक ग्रंथ म्हणून अनुल्लघ्य धर्मग्रंथ म्हणून नव्हे. त्यातील सारे ज्ञान, अज्ञान आजच्या विज्ञानाच्या कसोटीस आम्ही लावणार आणि त्यानंतर आज राष्ट्रधारणास, आणि उद्धारणास जे अवश्य वाटेल ते बेधडक आचरणार!"

या सूत्रामुळे सावरकरांचे विचार एका क्रिया-प्रतिक्रियेच्या निश्चित वर्तुळात फिरत असतात. राष्ट्र म्हणूनच हिंदुंनी जगावयाचे, त्यांनी तसेच जगले पाहिजे, दुसरे सर्व पर्याय या स्पर्धिष्णु जगात आत्मघातक आहेत, हे त्यांचे प्रधान मूल्य असल्यामुळे कोणत्याही प्रकारची उच्च नैतिक मानवतावादी मूल्ये ते अडगळ म्हणून सरळ बाजूला फेकून देतात. मुसलमान किंवा ख्रिश्चन हे जोपर्यंत आपला आक्रमक पवित्रा सोडत नाहीत तोपर्यंत संख्याबळ हेही एक आवश्यक बळच आहे, असे सावरकर गर्जत रहाणार. बंड आणि निषेध धर्माचाच करा, त्यांत खरी बौद्धिक सुसंगति आहे. पण एकदा धर्म स्वीकारलात की मग हिंदू काय, ख्रिश्चन काय, बौद्ध काय, सर्व धर्मांतील न्यायअन्यायाचे प्रमाण सारखेच अशी चोख भूमिका ते आंबेडकरांच्या धर्मांतराबद्दल घेणार. जोपर्यंत चर्चमध्ये आणि मशिदीमध्ये समानधर्मीय व्यक्ती म्हणून, हिंदूंना निःशंकपणे आणि समभावाने प्रवेश दिला जात नाही, तोपर्यंत हिंदूंच्या मंदिरात अहिंदूंना निर्बंध प्रवेश दिला जाणार नाही, असे ते कणखरपणे बजावणार. याचा अर्थ व्यापक मूल्यांचे भान सावरकरांना अजिबात नाही, किंवा ती त्यांना अमान्य आहेत असे नाही. वारंवार त्यांनी ती आवर्जून सांगितली आहेत. पण वास्तव व व्यवहारी जग हेच त्यांना प्रखर आणि अंतिम सत्य वाटते. आणि या प्रखर सत्याला भिडू शकेल अशीच विचाराची आणि आचारांची प्रणाली त्यांना हवी आहे. त्यांना "राष्ट्रभोळे" म्हणता येणार नाही फार तर "एकाक्ष राष्ट्रवादी" म्हणता यईल!

सावरकरांचा काही क्षेत्रातला व्यासंग स्पष्ट आहे. हिंदूंचे धर्मशास्त्र आणि जैन, बुद्ध, मुसलमान या धर्मांच्या ग्रंथांचा आणि मूलतत्त्वांचा त्यांनी तुलनात्मक अभ्यास केला होता. 'वज्रसूची', 'यज्ञ संस्थेचा इतिहास', 'मनुस्मृतीतील महिला' या सारख्या काही लेखात त्यांची काही प्रमाणांत संशोधन बुद्धिही दिसून येतें. पण हा अभ्यास आणि व्यासंगही राष्ट्रधारणेच्या संदर्भांत आहे.

पृष्ठ ५१ वर

गोंदियास्न पान भरून आलो हुतो. बिडी फ्याक्टरीफुडं ट्रक खाली करायचं चाललं हुतं. तेवढ्यात जग्गा मेस्त्री जवळ आला नि म्हणाला,

"आलास, बरं झालं. तुझीच वाट वघत हुताव् आम्ही ..."

"का काय झालं आनी?"

"जाहीदी घरात शिरलीया ..."

"कुणाच्या ?" न समजून मी इच्यारलं, "आनी का ?"

"म्हंमद्याच्या. त्या बेन्यानं टॉकगुडगुडटूम्म् केलंय् !"

म्हंमद्या माझ्या काकाचा थोरला ल्योक. सत्रा-अठराच्या उमरीचा, काकाच्या दोन टयाक्सी. पैलं मी त्येच्याकडंच हुतो. कीन्नरकीपास्नं डायवर हूस्तोंवर. मग वांदा आला. तवापास्नं त्येचं-माजं फाटल्यालं. अशा ह्या काकाच्या पोरानं लफडं केल्याचं ऐकून मनातनं मला खुशीच झाल्याली. ल नाक उडवायचा त्यो. ते पोरानंच कापलं, बेस्ट झालं ! खरं मी त्वांड मातर दफनाला जाऊन आल्यागत केलं नि म्हटलं,

---

# धक्का

**महादेव मोरे**

---

"इसकी माँकी; अजाप् झालं म्हणायचं ! जाहीदा तर 'तशी' दिसत नव्हती !"

"आनी म्हंमद्या तर 'तसा' कुटं वाटत हुता !"

"बरं तर, ह्या लफड्यात माझी वाट बघायची काय कारण ?"

"जाहीदी तर पार जेवाण घरात जाऊन ठिय्या मारून बसलीया. ती म्हणती, 'म्हंमद्यानं मला फसी पाडलंय्; त्येचा काय त्यो फैसला करा; त्याबिगार हालणार नाही...' सारा मोहल्ला जमलाना भाहीर ! तुझ्या काका-काकीच्या तोंडाचं तर पानीच पळालंय् !"

ऐकून खुशीची आणीक् एक लाट उठली. म्हणालो,

"आनी म्हंमद्या ? त्ये हाय का न्याई ?"

"ती गरवार असल्याचं समजल्यापेट्टाला त्येनं आईचं गाव गाठलं—मिरज !"

रात्सारी गाडी चालवून मी आंबून गेलोतो. घरात जावं नि निर्मळवानी आंघुळ

करून ताणून द्यावी, असा मनात ताळा घाटल्याला; तंवर ही पनोती ? म्हणून मूळ मुद्याला हात घालण्यासाठी वहातच मी इचारलं,

"वरं, ते सगळं न्हावूंदे; माज्याकडं तुला कोणी लावून दिलंय् ?"

"आनी कोण लावून देणार ? तुजा काकाच की !"

मदतीला मला हांक मारायची पाळी काकावर यावी... सगळ्या जगावर सत्ता असल्यावानी कैफ आला मला. म्हणालो,

"काकाचं एवढं काय तटलं बा माझ्यापास्नं...?"

"जाहीदी ऐकली तर तुझंच ऐकणार; बाकी कुणाचंच न्हाई. तवा तू तिला तितनं कायबी समजूत घालून भाहीर काढावीस; असं त्येचं म्हन्नं हाय. मग, चलतोस न्हवं ?"

काकावर उपकार करून त्येला मिंधं करायची अशी चालून आल्याली संधी दवडण्याइतका मी मूर्ख नव्हतो. म्हणून जगाच्या पाठीवर थाप मारीत म्हटलं,

"चल तर, बघूंया, काय काय हुतंय् !"

काकाच्या घराजवळ आलो. एक सुतक पाळावं, तसं घर नि माणसबी सारी काचबारवाचबारहून भाहीरल्या सोप्यात बसल्याली. त्या साऱ्यास्नी



भाहीर उस्कलून मी जाहीदाजवळ गेलो; नि जवळच चवड्यावर बसत म्हणालो,

"जाहीदा, क्या तमाशा लगा रख्खा है ये ?"

तशी ती ढसाढसा रडूच लागली. भित्तीला टेकून ती मुरून हुती, नि किती थोराड दिसत हुती ! हुंदक्यानं तिचं सारं आंग गदगदल्यालं. तसाच तिचा कढ ओसरू दिला. मग इचारलं,

" सच सच बता जाहीदा, इसमे तेरी गलती है, क्या उसकी ?"

" मेरा नशीबही फुटका है भैया, दोष किसको देनेका..." आणि ती मेलमुश्या आवाजात सांगू लागली ...

जाहीदा बोलत हुती...मधनं मधनं रडत हुती...टाईम असाच कटत हुता. मारी, मला तर आता कट्टाळाच याय् लागला. हिची भंकस कवा संपती, नि मग आपुन काय बोलायचं, ह्याच एका गोष्टीचा मी ईचार कराय् लागलो.

आखरीला ती म्हणाली,

" भैया, तुमने कामसे क्यों निकाला मुझे ? मैं तुम्हारे यहाँ रहती तो मेरा ऐसा न होता भैया, मेरा ऐसा न होता .."

तिनं असा शेवटी माझ्यावर धब्बा घ्यावा, हयेचा मला वैताग आला. ही जाहीदा माझ्या घरात घरकामाला हुती. अशाच एका दिवशी बायको म्हणाली हुती, 'जाहीदा अब बडी हो गयी है...उसका सब होना जाना है; क्याबी हुआ तो अपने माथेपर धब्बा लगेगा...उनकी बला उनकेही घर रहना अच्छा ..' आनी तवापास्नं जाहीदा कामावर यायची बंद झाली हुती...हे सगळं असं हुतं; तरी वैताग आवरून म्हणालो,

" जो होना था, हो गया जाहीदा, आगे क्या सोचना चाहिये इन्साननें. म्हंमद्याभी इधर नही; वो होता तो खुल्लमखुल्ला पुछके कुछबी वाटाघाट होती ... अब इधर बैठनेसे क्या फायदा, जाहीदा ?"

" देखती हूँ मैं, वो कित्ते दिन बाहरच रहता है..."

" तो अभी उठोगी ना ?"

" ऐसी उठनेवाली नहो मैं भैया, ऐसी उठनेवाली नही ! उसे आने दे; मैं यहीच बैठूंगी. ऐसीभी मेरी इज्जत गयी है, वैसीभी गयी है; अब मुझे डर किस बातकी ?"

" अगर वो जल्दी आयाच नही तो ?"

" उधरच तो वो बुड्ढा न होगा; कभी ना कभी आयेगाही..."

" तो उस वक्ततक तू इधरच बैठनेवाली ?"

" हां. यह तो कोई औरोंका घर नही; उसकाही तो है !"

समजुतीच्या चार गोष्टी सांगून तिला तियनं हलविणं कठीण हाय, हे समजताच मी माझं ठेवणीतलं हत्यार भाहीर काढलं,

" जाहीदा, मेरी बात तो सुनेगी ना ?"

" कहो भैया; तुम जो कहोगे तो मेरे भलेके लिएही होगा !"

माझ्यावर तिनं एवढा ईश्वास दावावा...वाटलं, तिचंच वागणं बरोबर हाय. तिला इथनं भाहीर काढण्यातच आपल्या हातान कायतरी पाप घडतंय्... मग काकाचा ईचार मनांत आला. काकावर उपकार केलं असतं तर त्यो मॅव मांजरागत माझा सिधा झाला असता. म्हणून म्हणालो,

" तो उठो इधरसे जाहीदा, चलो – अपने घर चलो !"
" और... और क्या भैया ?"
" और क्या आगेकी बात बादमें सोचेंगे. इधर बैठकर खुदही तमाशा बनना अच्छा नही. खुदापर भरोसा रखकर खुदही खुदको संभलना चाहिये; उसपर भरोसा रखो जाहीदा; अभीभी कुछ बिघडा नही..." आणि कावेबाजपणानं तिच्याकडं नजर टाकून म्हंटलं, " तो उठेगी ना जाहीदा ?"
आणि जाहीदा उठली; माझ्या मागोमाग चालू लागली.
तिला तिच्या घरात नेऊन पोहचविलं, मग काकाला भेटलो. म्हणालो,
" तुम्हारा काम करके अभ्भी आया ... अब आगे क्या ...? कैसा ?"
" देखेंगे आगे ." मनाशी ठरवून बोलल्यागत काका म्हणाला.
" ऐसा 'देतो – दिलातो' की बात करू नको. खुल्लम् खुल्ला बोलो !"
" ऐसी बातको गडबड करना अच्छा नही. मामला थोडा गर्म हुवा है, ये सब थंडा होने देव्; बादमें उसे ले जायेंगे किसी डॉक्टरके पास, और..."
" ठीक है; तुम्हारी बातपर भरोसा रखता है..."
तिथनं मग घराकडं आलो. हुश्श करून टेकतोय् तोवर बायकुनं फैलावर घेटलं,
" तुम्हे इत्ताभी कैसा समझता नही जी ! क्या तुम्हारी अक्लपर पानी पड गया; क्या समझनेका क्या ?" आणि आपल्याच अक्कलेवर पाणी पडल्यागत ती आपल्या कपाळाला हात लावून बसली ..
मी चक्रावलो. चार चार गाल्या देणार तोच म्हणाली,
" मैंने उसे क्यों घरमेसे निकाल्या था ?"
" क्यो निकाल्या था, किसके वास्ते निकाल्या था – वो कैसा मुझे समझने का ! मुझे दुसरा कुछ कामधंदा नही क्या ?"
" अजी, जरा आँख खोलकर देखते तो उस वख्तच तुम्हें पत्ता चलता की; उसका चालचलन बदलने लग्या है; अगर वो कही फस गयी तो अपने माथेपर धब्बा लगनेवाला ! ये सब सोचकर मैंने उसे घरसे निकाल्या था...और तो अभ्भी तुम्हे उनके मामलेमें दखल देनेकी क्या जरूरत थी – बिचमे मेरा चाँद करके गयेच !"
आता ह्या बयेला काय सांगायचं ? गप्प बसलो. बेंगलोरची डिलीव्हरी हुती. गेलो. चार दिवसानं तिकडनं येतोय् तो जाहीदाची आई व भन माझीच वाट बघत बसल्याल्या...
मलाबी आता वाटाय् लागलं – ही नको ती झिगझिग आपुन मागं लावून घेटली, बायकुचंच म्हणणं खरं हुतं !
जाहीदाचा बुढ्ढाबी वटावटा करत आला नि मलाच पराणी द्याय् लागला – तू तिथनं पोरीला भाहीर का काढलीस ? न्हाईतर त्येंची काय टाप हुती ? तुझ्या

शब्दाखातर पोरगी भाहीर पडली, आता पुढली काय अवस्था ? तुला आसं आंग झाडून भागायचं नाही, आम्ही सांगून ठेवतो आताच...वगैरे.

पोर माझ्याही घरात न्हायलीया-वाढलीया, माझ्या घरातली कामं केल्यात तिनं तवा मी असा-कसा आंग झाडीन ? माझ्यावर भरोसा हाय न्हवं ? मग वीनघोरी असा ! अशी समजूत काढत मलाच बसावं लागलं...

मग काकाकडं गेलो...त्या लोकांच्या दाढंत मला दिऊन तू मोकळा झालास व्हय्; आता फुडं काय ते सांगतोस, काय कसं !—आसं बरंच त्येला तडातडा बोलून घेतलं

"फिर लेके जाव किसी डाक्टरके पास !" आखीर काका म्हणाला.

"वो सब ठीक है, मगर पैसेका क्या ?"

"पैसा मैं दूंगा, तुम यत्ते घबराते क्यो हो ?" आणि खिशातनं पिवळा हत्ती काढून तो पेटवित काका म्हणाला, "और किधरभी एक लडका देखकर उसकी सादी तै करो ! शादीको मेरी तरफसेभी कुछ न् कुछ दे दूंगा...क्यों ?"

काकाला सून म्हणून जाहीदा घरात नको हुती; तिची बला पैसपरभारी तो कटवू पहात हुता.. वेळ आली की काका खाका वर करायला नामांकीत. त्येचं बोलणंच तेवढं दांडगं, हे मला पक्कं माहीत हुतं; म्हणून म्हणालो,

"काका मुझसे चालबाजी करोगे तो अच्छा न होगा ! तुम्हारी इस बातपर भरोसा रखू ना ?"

"बेशक !"

तिथनं जाहीदाच्या घरात गेलो. झाल्यालं सारं सांगितलं. त्यात पदरचबी मिसळलं...घरची कबूल झाली. उद्या जायचं ठरलं – अशाच एखांद्या डाक्टरकडं...



नि अशा डाक्टरलोकांचा तपास काढायला तरासबी पडला नाही...

रात्री जेवून निःचित्तानं ताणून दिली...

सकाळी वायकुनंच लडालडा हलवून जागं केलं.

"अजी उठो जी, उठो!"

'क्या मुसीबत है, सोनेभी नही देती!"

"अजी, मुसीबतच आ पडी है!"

"क्या...?"

"अजी, जाहीदाने जहर खा कर..."

जाहीदाची जिंदगानी हितच खल्लास झाली. आज डाक्टरकडं जायचं हाय हे समजताच तिनं हे आसं करून घेटलं का? आपली म्हंमद्या बरोबर शादी हुईल नि त्येची जोरू म्हणून आपुन त्येच्या घरात न्हावू-नांदू, अशी तिची सपनं हुती का? नि त्येंचा चुराडा झाल्यावर तिनं हे आसं करून घेटलं? काय समजूत करून घेटली त्या खुळचा पोरीनं नि ऐन बहरीच्या जिंदगानीतच अशी झडून गेली.

जाहीदा मेली, खरं सगळा मोहल्ला घुमू लागला...तिच्या मरणाबद्दलच सगळीकडं...

तिचं आईवा तर माझ्या नावानंच बोटं मोडू लागली...ह्येनं आमच्या पोरीला त्या घरातनं भाहीर काढली नसती तर तिचं हे का झालं असतं? ती घरात घुसली हुती, झक्कत त्येंनी तिची म्हंमद्याशी शादी करून दिली असती; खरं ह्यो मदी पडला आनी...

तर खुद्द माझा काकाच बोंबडी मारू लागला – माझं नाव घिऊन धडधडीत त्यो सांगाय् लागला अहो, त्येचा नि तिचा आगुधरपास्नंच संबंध हुता. ती त्येच्यात घरकामाला हुती तवापास्नंच. त्येच्या बायकुला हे समजताच तिनं तिला कामावरनं कमी केलं, तरी त्येंच्या भाहीर गाठीभेटी व्हायच्याच; नि तिला दिवस जाताच ह्येनं माझ्या पोरावर ठपका घ्यावा? काय दुनिया हाय बघा की! माझा म्हंमद्या तसा हाय तर का? घरात घुसून बसलीती तवा त्यो पिऊन सांगताच कशी चाट्-शिरी भाहीर पडली हुती! आम्हास्नी तशी बघली असती का? शहो, पैलपास्नच ह्येंचा तसा डाव; खरं मी काय कच्च्या गुरूचा चेला न्हाई त्यात फसाय्...

आनी जाहीदाबी म्हणाली नव्हती का – भैया तुमने कामसे क्यों निकाला मुझे? मैं तुम्हारे यहाँ रहती तो मेरा ऐसा न होता भैया...

म्हणजे ह्या साऱ्या खेकटयात धब्बा लागला त्यो मलाच. दोषी मीच ठरलो. जाहीदा न्हवं, म्हंमद्या नव्हं की दुसरं कुणीबी न्हवं, तर मीच केवळ...

खुद्द माझी वायकुही एका दिवशी म्हणाली, लोक म्हंत्यात त्ये खरंच का? खरंच तुम्चं नि तिचं...

ह्यावर आणीक काय उरलं? □ □ □

# इन्साफ! जज्जसाऽऽब इन्साऽऽफ!



पंजाबमधला
एक गाजलेला
खून खटला

अनुवाद
ॲडव्होकेट
माधव कानिटकर

१ फेब्रुवारी १९५७ चा दिवस! रात्रीचे पावणेदहा वाजले असतील. मोहिंदरसिंग, धर्मवीरसिंग आणि त्याचा दोस्त रामकिशन " पंजाब हॉटेल " या अलिशान हॉटेलात शिरले. हे हॉटेल गरिबांसाठी नव्हतं, गरिबी हटवण्यासाठी होतं! उंची विदेशी मद्य, चमचमीत मटन, आणि बरोबर एखादी मदिराक्षी !

वेषावरून तरी तिघे श्रीमंत वाटत होते. हॉटेलातल्या नोकरांनी त्यांना अदबीने सलाम करून म्हटलं " साहेब! मधल्या हॉलमधे जागा नाही. "

" मग स्पेशल रूम द्या ! "

...हॉटेलच्या नोकरानी त्याना अदबीने स्पेशल रूम उघडून दिली. नियमाप्रमाणे ५–१० मिनिटं बड्या पाहुण्यांना जरा आराम करू द्यावा म्हणून मुद्दामच तो बाहेर थांबला.

...थोड्या वेळाने आत येऊन अदबीनं कमरेत वाकून त्याने तिघांकडे पाहात विचारले " यस् सर ! काय आणू ? बिअर, ब्रँडी, रम, व्हिस्की...?"

" तीन क्वार्टर ब्रँडी आण सुरवातीला ! आणि नंतर तीन चिकन–राईस, परोठा. "

२–३ मिनिटातच " ऑर्डर " टेबलावर आली ! चिकन मधून वाफारे निघत होते. तिघेही खूष झाले; आता मजा येणार ! तिघांनीही प्यायला सुरवात केली. मोहिंदरसिंगाचा ग्लास अर्धा-अधिक संपला असेल नसेल, त्याला निसर्गाचं बोलावणं आलं ! डाव्या हाताची करंगळी वर करून तो म्हणाला, "मी आलोच हं जरा ! " आणि तो बाथरूममधे शिरला. थोड्याच वेळात तो हात धुवून बाहेर आला. मंडळींनी दारू संपवून चिकनवर ताव मारायला सुरुवात केली असेल, आणि पुढच्या २–३ मिनिटात एक चमत्कार घडला ! मोहिंदरसिंगाच्या पोटात एकदम कळा यायला लागल्या, तोंडातून फेस आला, अंगाला घाम फुटला, डोळे पांढरे झाले ! ... तो खुर्चीवरून खाली कोलमडला ! धर्मवीरसिंग आणि रामकिशन दोघेही घाबरले. त्यांनी मोहिंदरसिंगला उचलून कॉटवर झोपवला. धर्मवीरसिंगने रामकिशनला हुकूम केला. " अरे याला एकाएकी काय झालं ? जा मॅनेजरला बोलावं ! मी इथे थांबतो. "

...मॅनेजर स्पेशल रुममधे येईपर्यंत सगळा कारभार आटोपला होता. मोहिंदरसिंगाला आता खऱ्या अर्थाने निसर्गाचं बोलावण आलं होतं.

...घाबरलेला मॅनेजर आणि रामकिशन स्पेशलरुममधे घुसले. " काय झालं ?" –मॅनेजर.

" काय झालं काय ? हा मोहिंदरसिंग, आत्ता आमच्याबरोबर आला. तुम्ही पाह्यलत ना ? जेवायला म्हणून आला आणि खलास ! "

" अरे मग बोलत काय बसलात पोलिसांना बोलवा. "

" तिकडेच चाललोय मी. अहो माझा पुतण्या आहे तो ! आत्ता येतील पोलीस ! "

...पंजाबमधले यमुनानगर पोलीस स्टेशन. ड्युटीवर असलेले सब इन्स्पेक्टर जसवंतसिंग आज भलतेच वैतागले होते. चहा प्यायला वेळ नाही इतक्या तक्रारी. ते कामात असतानाच धर्मवीरसिंग पोलीस स्टेशनमधे घुसला. साहेबांना सलाम करून तो म्हणाला, " साहेब ! माझा पुतण्या अचानक मेला ! "

" मेला तर ' पोचवा ' त्याला ! इथे माझं डोकं खायला कशाला आलात. "

" साहेब तो आत्ता अर्ध्या तासापूर्वी हॉटेलमधे माझ्याबरोबर बसला होता आणि आत्ता १५–२० मिनिटापूर्वी खलास. मला शंका आहे, काहीतरी दगाफटका आहे, म्हणून तक्रार देण्याकरता आलोय."

सब इन्स्पेक्टरने वैतागाने पेन टेबलावर आपटले... नको ही पोलीस खात्यातली नोकरी ! भानावर येत ते त्यांच्या समोरच्या बाईला म्हणाले,

" बाई जरा बसा. तुमच्या नवऱ्याला तुमच्या दिराने चाकू मारला. मी तुमची तक्रार घेतोय पण आत्ता मला बाहेर जायला पाहिजे मी आलोच...आणि मी परत येईपर्यंत जायचं नाही. ड्रायव्हर जीप काढा ! १५०३.

" यस् सर्."

" ३७४९ ! "

" यस् सर् !" " चला काठया घ्या. धर्मवीरसिंगला पण त्यांनी आपल्याबरोबर यायला फर्माविले, अक्षरशः एका मिनिटात."

त्यांनी कॅप डोक्यावर ठेवली. हातात नेहमीचा जाडजूड दंडुका घेतला आणि ड्रायव्हरच्या बाजूला बसत ते ओरडले, " चलो जल्दी ! हॉटेल पंजाब !"

ड्रायव्हरनी जीप हाणली; १० मिनिटात ब्रेकचा कर्कश्य आवाज करीत जीप हॉटेल पंजाबपुढे उभी राहिली. पुढून साहेब आणि मागून हवालदार आणि धर्मवीर-सिंग उड्या मारून उतरले. आणि हॉटेलमधे घुसले.

मधल्या हॉलमधला सीन " प्रेक्षणीय " होता ! सगळेच झिंगलेले ! (बायका सुद्धा !) पोलीस बघून सगळे हादरले. उजव्या हातातला जाडजूड काळा शिसवी दंडुका डाव्या हाताच्या पंजावर आपटत ते ओरडले, " हवालदार ! कुणाला बाहेर जाऊ देऊ नका ! मॅनेजर कुठाय ? ...पहिल्या मजल्यावरच्या बालकनीतून मॅनेजर घाईघाईने उतरले.

' आहे साहेब ! मी इथे आहे !'

' डेड बॉडी कुठे आहे !'

' याच रुममधे आहे. वर या साहेब.'

... डोक्यावरची कॅप हातात काढून घेत सब-इन्स्पेक्टर जयवंतसिंग चपळाईने वर गेले.

वरच्या खोलीतल्या कॉटवर तडफडून मेलेला मोहिंदरसिंग अस्ताव्यस्त पडला होता. पोटावर हात, डोळे उघडे आणि तोंडात फेस ! सब-इन्स्पेक्टरनी त्याच्या अंगाला हात न लावता त्याला आपादमस्तक न्याहाळले. अंगावर कुठेही जखम नव्हती, रक्त आलेल नव्हतं. त्यांची पोलीसी नजर कॉटवरून कॉटच्या खाली आणि नंतर सगळ्या स्पेशल रूममधे फिरली. कुठेही संशयास्पद काहीही वस्तू नव्हती. कॉटच्या बाजूला थरथरत उभ्या असलेल्या रामकिशनला त्यांनी दरडावून विचारले.

'तू काय करतोयस इथे!'

'हा मेला तेव्हा मी इथेच होतो साहेब!'

'एकटाच?'

'नाही – नाही हा धर्मवीरसिंगसुद्धा होता!'

'आणखी कोण होतं?'

'कुणी नाही, आम्ही दोघंच होतो'

...सब इन्स्पेक्टर जसवंतसिंगानी धर्मवीरसिंग, रामकिशन आणि मॅनेजर या तिघांकडे करड्या नजरेने पाहात हुकूम दिला 'तुम्ही तिघं खाली चला. पोलीस स्टेशनवर यावं लागेल तुम्हाला. खोली लॉक करा आणि चावी माझ्याकडे द्या!'

...आता स्पेशल रूम मधे फक्त मोहिंदरसिंगचं प्रेत उरलं. सगळं लटांबर खाली आलं. सब-इन्स्पेक्टर जसवंतसिंगानी हॉटेलमधूनच भराभर फोन केले! अवघ्या १५-२० मिनिटांत पोलीस-सर्जनकडून 'शववाहिनी' येऊन हॉटेलसमोर उभी राहिली. प्रेताचं पोस्ट मार्टेम व्हायचं होतं. पोलीस फोटोग्राफरने 'प्रेताचे' सगळ्या अँगल्सनी फोटो घेतले; फिंगर प्रिंट एक्सपर्ट खोलीत जाऊन आवश्यक ते ठसे घेऊन गेला. दोन पंचासमक्ष सब-इन्स्पेक्टर जसवंतसिंगानी मोहिंदरसिंगाच्या प्रेताची झडती घेतली. त्याच्या अंगावर काहीही मिळालं नाही. अवघ्या तासा-दीडतासा पूर्वी चालत्या बोलत्या असलेल्या मोहिंदरसिंगाचे प्रेत शववाहिनीतून सरकारी-हॉस्पिटलच्या दिशेने रवाना झाले!

...जिना उतरता उतरता सब-इन्स्पेक्टर जसवंतसिंगांनी खालच्या गर्दीकडे पहात विचारले,

'तुम्ही थोड्यावेळा पूर्वी, कुणा किंचाळणाऱ्या माणसाचा आवाज ऐकला?'

'नाही साहेब! आम्ही खाली होतो!'

'हूँ ऽऽऽ! मॅनेजर, यांची नावे आणि पत्ते तुमच्याकडे आहेत?'

'आहेत साहेब, आमचे नेहमीचे कस्टमर्स आहेत ते!'

'ठीक आहे! हवालदार, यांना जाऊं द्या. मला वाटलं, तर बोलावीन मी त्यांना.'

...सगळे 'कस्टमर्स' धडपडत जीव घेऊन आधी हॉटेल बाहेर पळाले.

...धर्मवीरसिंग, रामकिशन, मॅनेजर, (वेटरसह) सब इन्स्पेक्टर जसवंतसिंगाच्या बरोबर जीपमध्ये बसले.

...पोलीस स्टेशनवर आल्याबरोबर साहेबांनी आधी पूर्वीच्या तक्रारी हातावेगळ्या केल्या; आणि मग धर्मवीरसिंगाला एकट्याला आत बोलावीत त्यानी हवालदाराला हुकूम दिला 'हवालदार! बाकीच्या तिघांना बाहेरच थांबवा. फक्त धर्मवीरसिंगला आत येऊ दे.'

'साहेब! बाहेर आणखी दोन माणसं आली आहेत.'

'कोण आहेत ते ? बोलाव त्याना आंत !'

दोन व्यक्ती आत आल्या एकाने स्वतःची ओळख करून दिली, 'साहेब ! मी या धर्मवीरसिंगाचा सासरा; आणि हे त्या मेलेल्या मोहिंदरसिंगाचे थोरले बंधू.'

'तो मेला तेव्हा तुम्ही दोघं हॉटेलमधे होता ?'

'नाही साहेब ! मॅनेजरचा फोन आला आम्हाला, की त्याचं प्रेत पोस्ट मार्टेमला गेलंय. – असं असं घडलंय– तुम्ही डायरेक्ट पोलीस स्टेशनला या म्हणून आम्ही आलो.'

'असं ! मग जरा बाहेर बसा, मी बोलावीन तेव्हा आत या. तुमच्या जावयांची तक्रार मी आधी लिहून घेतो !'

आता साहेबांसमोर फक्त धर्मवीरसिंग होता. टेबलाच्या खणात हात घालून सब इन्स्पेक्टर जसवंतसिंगानी प्रथम सरकारी पिवळे फॉर्मस बाहेर काढले.

तक्रार करणाऱ्या इसमाचे नाव, वय, पत्ता, वगैरे नेहमीची माहिती भरून झाल्यावर त्यानी विचारले 'बोला, धर्मवीरसिंग ? काय तक्रार आहे ?'

धर्मवीरसिंग बोलू लागला ......

"साहेब आम्ही सगळी नात्यातलीच माणसं आहोत. मयत मोहिंदरसिंग माझा पुतण्या. आज दुपारी तो, माझा मित्र–रामकिशन, रामप्रसाद आणि कृष्णा माझ्या घरी आले. मला माझी जमीन विकून टाकायची होती. आणि त्याला ती खरेदी करायची होती. साहेब, हा मोहिंदरसिंग म्हणजे दारू, गांजा आणि अफीम ही व्यसनं असलेला माणूस. .. पण माझ्याकडे आला तेव्हा 'ठीक' कंडिशनमधे होता. जमीन नात्यातच रहावी म्हणून आमचा सौदा पटला. रामप्रसाद आणि कृष्णा त्यानंतर निघून गेले. उरलो आम्ही तिघं. मी, रामकिशन आणि मोहिंदरसिंग. मोहिंदरसिंग म्हणाला 'काका, आज आपण आता मजा करू या, नंतर आम्ही सिनेमाला गेलो. सिनेमा रात्री साडेनऊला सुटला. त्यानंतर आम्ही 'हॉटेल पजाब' मधे गेलो. तिथे ब्रँडी मागवली, चिकन-राईस खाऊन आम्ही टॅक्सीनं घरी जाणार होतो. इतक्यात मोहिंदरसिंगला × × × ला लागली. तो जाऊन' आला. जेवायला सुरुवात केली असेल मात्र, तो खुर्चीतून खाली कोसळला आणि हे असं झालं."

"तुमचा कुणावर सशय आहे ?"

"नाही साहेब ! अहो गांजा, अफीम आणि दारू ! ही सगळी व्यसनं त्याला. केव्हातरी हे होणारचं होतं. पण इतक्या लवकर होईल अशी कल्पना नव्हती. नंतर भानगड नको म्हणून मी तुम्हाला कळवलं."

...आपल्या तक्रारीच्या खाली धर्मवीरसिंगाने सही केली. रामकिशनने देखील धर्मवीरसिंग जे बोलला तसंच स्टेटमेंट सब इन्स्पेक्टर जसवंतसिंगांना दिलं. मोहिंदरसिंगाच्या मोठ्या भावानं आणि धर्मवीरसिंगाच्या सासऱ्यानंसुद्धा मयत मोहिंदरसिंग जाम दारू प्यायचा, गांजा, अफीम ओढायचा, आमचा कुणावर संशय नाही असंच

स्टेटमेंट दिलं. मोहिंदरसिंग मेला तेव्हा ते दोघं तिथे नव्हतेच. तीच परिस्थिती मॅनेजरची आणि वेटरची. मॅनेजर होता गल्ल्यावर आणि वेटर स्पेशल रूमच्या बाहेर.

असली व्यसनी माणसं अचानक हृदयक्रिया बंद पडून मरू शकतात हे इतकी वर्षं पोलीस खात्यात नोकरी केल्यामुळे जसवंतसिंगाना अनुभवाने ठाऊक होतं. मोहिंदरसिंग अचानक मेला याबद्दल कुणालाच संशय नव्हता ! पुरावा तर नव्हताच ! खुर्चीच्या पाठीवर रेलून बसत त्यांनी सिगारेट पेटवली. आणि धुराचा लोट सोडत ते म्हणाले, "तुम्ही जा सगळे घरी, मी बघतो काय करायच ते "

"...आणि डेडबॉडी आमच्या ताब्यात केव्हा मिळणार साहेब ?"

"पोस्ट मार्टम होईल तेव्हा ! ...पण त्यात विशेष काय आहे ? रूटीनप्रमाणे काम होणार तें ! तुम्ही सरकारी हॉस्पिटलमधे जा, काही लागलं तर मला फोन करा !

...सब इन्स्पेक्टर जसवंतसिंगानी Accidental death due to heart failure असं त्यांचं मत स्वतःच्या हातानं सरकारी कागदपत्रावर लिहिलं. आणि त्यांच्या पुरती ती केस संपली ! बिचारे जसवंतसिंग ! त्याना काय ठाऊक की नियती आपल्याला हसते आहे ! –

...हॉस्पिटलमधे मोहिंदरसिंगाचं प्रेत चिरफाड होण्यासाठी आपला नंबर किती वाजता लागतो याची वाट पाहात शांतपणे स्ट्रेचरवर पहुडलं होतं आणि तिथे आता पुढच्या अवघ्या पाच–दहा मिनिटांत वेगळाच भीषण प्रकार घडणार होता......

□

(क्रमशः)

[पंजाब हायकोर्टाचे माजी मुख्य न्यायाधीश श्री. जी. डी. खोसला यांच्या A Judge's Note Book या पुस्तकातील A Case Of Poisoning या प्रकरणाचा स्वैर अनुवाद]

 पृष्ठ १७ वरून

कम्युनिस्टांनी जिकली होती व कम्युनिस्ट उमेदवारास त्यावेळचे काँग्रेस उमेदवार एस्. टी. पंडित यांच्यापेक्षा ६४०० मते जास्त पडली होती. कम्युनिस्ट २३,६७६ व काँग्रेस १६,९६० असे त्यावेळचे मतदान होते. त्यानंतर गेल्यावर्षी लोकसभा निवडणुकीत जालना मतदारसंघातील काँग्रेसचे विजयी उमेदवार बाबूराव काळे यांनी गेवराई विधानसभा मतदारसंघात २८,२७७ मते मिळविली. म्हणजे १९६७ च्या निवडणुकीपेक्षा त्यांनी बाराहजारावर मते जास्त मिळविली. विरोधकांत यावेळी कम्युनिस्ट उमेदवार नव्हता. संयुक्त समाजवादी उमेदवारास अवघी १९६८ च मते मिळाली. कम्युनिस्ट उमेदवार नसल्याने आणि बड्या आघाडीत सामील होण्याचे संयुक्त समाजवाद्यांचे धोरण कम्युनिस्टांना मान्य नसल्याने कम्युनिस्ट मतदारांची मते सत्तारूढ काँग्रेसला मिळाली असली पाहिजेत व त्यामुळेच या मतदार संघात काँग्रेसची मतसंख्या बाराहजारांनी वाढली असावी असे दिसते.

गेवराई मतदारसंघाचा आणखी मागे जाऊन आढावा घेतला तर असे दिसते, की १९५७ पासून या मतदारसंघात काँग्रेस आणि कम्युनिस्ट पक्षात तीव्र चुरस आहे. १९५७ व १९६२ या दोन्ही निवडणुका काँग्रेसने जिकल्या, पण त्या फार थोड्या मतांनी. १९५७ मध्ये १९०३ मते व १९६२ मध्ये तर फक्त १०७९ मते काँग्रेस उमेदवारास जास्त मिळाली. गेल्या तीन निवडणुकांतील ही मते पहाता याचवेळी सोळंके यांना बिनविरोध निवडून आणण्याइतका कम्युनिस्टविरोध का ढासळला? काँग्रेस आणि कम्युनिस्ट यांच्यात महाराष्ट्रात निवडणूक समझोता झालेला नसता कम्युनिस्टांनी गेवराईची जागा लढवू नये याचे आश्चर्य वाटणे स्वाभाविकच आहे. पण १९६७ साली या मतदारसंघात निवडून आलेले कम्युनिस्ट आमदार एस्. टी. पवार नंतर काँग्रेसमध्ये सामील झाले त्यामुळे या भागात कम्युनिस्टांचा पूर्वीसारखा प्रभाव राहिला नाही म्हणूनच त्यांनी उमेदवार उभा केला नाही.

सुंदरराव सोळंके १९६७ साली केज मतदार संघातून निवडून आले होते. त्या वेळी त्यांना त्यांचे प्रतिस्पर्धी मार्क्सवादी उमेदवार बुटंडे यांच्यापेक्षा फक्त २८१८ मते जास्त मिळाली होती. यावेळी त्यांनी एवढा सुरक्षित मतदारसंघ निवडला, की त्यांची अविरोध निवड झाली.

महाराष्ट्रात काँग्रेसने बिनविरोध जिकलेली दुसरी जागा माळशिरसची. माळशिरस हा लक्षभोजने शंकरराव मोहिते पाटील यांचा बालेकिल्ला. तेथून अविरोध निवडून आलेले चंगोजीराव देशमुख त्यांच्याच गटाचे आहेत. पण बिनविरोध निवडून येणे मोहिते पाटलांनासुद्धा गेल्यावेळी जमले नव्हते, तो चमत्कार यावेळी देशमुखांच्या बाबतीत कसा घडला? १९६७ च्या निवडणुकीत मोहिते पाटील यांना

३४,१४५ व त्यांचे नजीकचे प्रतिस्पर्धी शे. का. पक्षाचे श्री. जे. एन. जाधव यांना २१,०१९ मते मिळाली होती. आणखी मागच्या निवडणुकांचा आढावा घेतल्यास असे दिसते की १९५७ व १९६२ या दोन्ही निवडणुका शंकरराव मोहिते यांनी जिंकल्या. १९५७ साली ते काँग्रेसविरुद्ध अपक्ष उमेदवार म्हणून निवडून आले तर १९६२ साली काँग्रेसतर्फे निवडणूक लढवून अपक्ष उमेदवाराविरुद्ध निवडून आले. दोन्ही निवडणुकात त्यांनी प्रतिस्पर्ध्यापेक्षा १० ते १२ हजार मते जास्त मिळविली. शे. का. पक्षाचा उमेदवार १९६७ साली त्यांच्याविरुद्ध प्रथमच उभा होता. पण यावेळी उभा राहिला नाही याचा अर्थ या भागात शे. का. पक्षाचे बरेच अनुयायी काँग्रेसने आपल्या पक्षात ओढून घेतले आहेत.

## शे. का. प. चा बालेकिल्ला ढासळला

कुलाबा जिल्हा शे. का. पक्षाचा बालेकिल्ला समजला जाई, पण तेथेही तो पक्ष ढेपाळला आहे. त्या पक्षाचे आमदार पी. आर. सानप काँग्रेसला मिळाल्याने त्यांच्या माणगाव मतदारसंघात शे. का. पक्ष नामशेष झाला. काँग्रेसचे म्हाळुंगे त्यामुळेच बिनविरोध निवडून येऊ शकले. कुलाबा जिल्ह्याच्या सातपैकी पाच जागा शे. का. पक्षाने १९६७ मध्ये जिंकल्या होत्या. यावेळी पाच जागांसाठी त्या पक्षाला उमेदवारसुद्धा मिळेनात त्यामुळे तो फक्त अलिबाग पनवेल व खानापूर या तीनच जागा लढवीत आहे. पनवेलला काँग्रेस व शे. का. पक्षात सरळ लढत आहे. १९६७ साली शे. का. पक्षाचे डी. बी. पाटील यांनी ही जागा काँग्रेसपेक्षा १२,१७१ मते जास्त मिळवून जिंकली होती. पण या मतदारसंघात शे. का. पक्षाचा प्रभाव कमी होऊ लागल्याचे गेल्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीत दिसून आले. शे. का. पक्षाचे उमेदवार दत्ता पाटील यांना पनवेल मतदारसंघात काँग्रेस उमेदवारापेक्षा फक्त ३५११ मते जास्त पडली. म्हणजे १९६७ मधील १२ हजारांची आघाडी १९७१ मध्ये ३५११ पर्यंत खाली आली हे लक्षात घेता शे. का. पक्षाला पनवेलची जागा टिकविणे फार कठीण जाणार आहे.

अलिबाग मतदारसंघात काँग्रेसचे नारायण कान्होबा भगत, शे. का. पक्षाचे वसंतराव राऊत आणि अपक्ष उमेदवार दत्तात्रय खानविलकर यांच्यात तिरंगी लढत आहे. १९६७ च्या निवडणुकीतही या मतदारसंघात तिरंगी सामना होता व शे. का पक्षाने २८८७ मतांनी ही जागा जिंकली होती. दत्तात्रय खानविलकर त्यावेळी काँग्रेसतर्फे उभे होते. यावेळी ते काँग्रेसच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध उभे आहेत. काँग्रेसची काही मते ते खातील. त्याचा फायदा शे. का. पक्षास निश्चित मिळेल. कारण अलिबाग मतदारसंघात शे. का. पक्षाचे वजन घटले नसून वाढले आहे असे १९७१ च्या लोकसभा निवडणुकीवरून दिसते. त्यावेळी शे. का पक्षाच्या उमेदवाराने काँग्रेस उमेदवारापेक्षा ३८०९ मते जास्त मिळविली. तेव्हा ही जागा शे. का. पक्ष जिंकण्याची बरीच शक्यता आहे.

खालापूर मतदारसंघात यावेळी काँग्रेस, शे. का. पक्ष, जनसंघ व संघटना काँग्रेस

अशी चौरंगी लढत आहे. शे. का. पक्षाने ही जागा १९६७ मध्ये ६४७२ मतांनी जिंकली होती. त्यावेळीही चार उमेदवारात लढत होती पण खरी चुरस काँग्रेस आणि शे. का. पक्ष यांच्यातच झाली. पण या भागात गेल्या चार वर्षांत शे. का. पक्षाचे वजन घटले असल्याचे गेल्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीवरून दिसते. त्यावेळी या मतदारसंघात शे. का. पक्षाचे कृष्णराव धुळप यांना काँग्रेसपेक्षा ८९८४ मते कमी पडली. हे लक्षात घेता खालापूरची जागा जिंकणे शे. का. पक्षाला यावेळी कठीण जाणार आहे.

कुलाबा जिल्ह्यात शे. का. पक्षाचे वजन कमी झाले, पण दुसऱ्या कोणत्या विरोधी पक्षाचे वाढलेले नाही. तेव्हा अलिबागची जागा वगळता बाकी सर्व जागा काँग्रेस सहज जिंकील असे दिसत आहे.

## कोल्हापूरचे चित्र

कोल्हापूर हा शे. का. पक्षाचा दुसरा बालेकिल्ला. तेथील आठ जागांपैकी सहा जागा त्या पक्षाने १९६७ साली लढविल्या होत्या व त्यांपैकी शाहूवाडी, राधानगर, कोल्हापूर आणि गडहिंग्लज या चार जागा जिंकल्या होत्या. यावेळी शे. का. पक्ष सर्व आठही जागा लढवीत आहे. त्यांपैकी शाहूवाडी आणि करवीर या मतदारसंघात त्यांचे काँग्रेसशी सरळ सामने आहेत. शाहूवाडी मतदारसंघात गेल्यावेळी तिरंगी लढत होऊन शे. का. पक्षाने ही जागा अवघ्या १२४२ मतांनी जिंकली होती. त्यानंतर गेल्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीत शे. का. पक्षाला या भागात असलेला पाठिंबा बराच कमी झाल्याचे दिसून आले. काँग्रेसपेक्षा शे. का. पक्षास १८,६६९ मते कमी मिळाली. हे बदलते चित्र लक्षात घेता शे. का. पक्षास ही जागा मिळण्याचा संभव बराच कमी आहे.

करवीर मतदारसंघात गेल्या वेळी शे. का. पक्षाचा उमेदवार नव्हता. तिरंगी लढतीत काँग्रेसचे श्रीपतराव बोंद्रे यांना संयुक्त समाजवादी उमेदवार रवींद्र सबनीस यांच्यापेक्षा ५७१७ मते जास्त मिळून ते निवडून आले होते. निवडणुकीत यावेळी शे. का. पक्ष व समाजवादी यांच्यात समझोता आहे. त्यामुळे समाजवाद्यांची मते शे. का. पक्षास मिळतील. पण या दोन्ही पक्षांची मते एकवटली तरी त्याचा फारसा उपयोग होणार नाही, कारण दोन्ही पक्षांचे बळ या मतदार संघात फार कमी झाले आहे हे गेल्या वर्षीच्या लोकसभा मतदानावरून दिसते. काँग्रेसने या भागात शे. का. पक्षापेक्षा २३ हजारावर मते अधिक मिळविली. संयुक्त समाजवादी उमेदवाराला तर अवघी ८२८ मते मिळाली. हे लक्षात घेता करवीरची जागा काँग्रेसलाच मिळण्याचा संभव दिसतो.

पन्हाळ्याची जागा काँग्रेसने १९६७ मध्ये शे. का. विरुद्ध ६४०० पेक्षा अधिक मते मिळवून जिंकली. त्यावेळी तिरंगी लढत होती. यावेळी पचरंगी सामना आहे. काँग्रेस व शे. का. पक्षाशिवाय रिपब्लिकन पक्ष व दोन अपक्ष उमेदवार निवडणूक लढवीत आहेत. गेल्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने या भागात शे. का.

पक्षाविरुद्ध सोळा हजारांपेक्षा अधिक मते मिळविली होती ही परिस्थिती लक्षात घेता काँग्रेसला या मतदारसंघात विजय मिळविणे सहज शक्य होईल.

राधानगरी मतदारसंघात शे. का. पक्षाने १९६७ मध्ये सरळ सामन्यात काँग्रेस-पेक्षा सतरा हजारावर मते अधिक मिळवून विजय मिळविला होता. यावेळी तेथे पंचरंगी सामना आहे. शे. का. पक्षाशिवाय कम्युनिस्ट व मार्क्सवादीही निवडणूक लढवीत आहेत. शे. का. पक्षाचा प्रभाव तेथे आता पूर्वीसारखा राहिलेला नाही हे गेल्या वर्षीच्या लोकसभा मतदानावरून स्पष्ट झाले. काँग्रेसने या भागात शे. का. पक्षापेक्षा १६ हजारावर मते अधिक मिळविली. ही बदलती परिस्थिती आणि विरोधी पक्षांची मते आपसात विभागली जाण्याचा संभव लक्षात घेता शे. का. पक्षास ही जागा टिकविणे कठीण जाणार आहे.

कोल्हापूरची जागा शे. का. पक्षाचे त्र्यं. सी. कारखानीस यांनी गेल्यावर्षी पंचरंगी लढतीत काँग्रेसचा २१ हजारावर मतांनी पराभव करून जिंकली होती. यावेळी कारखानीस पुन्हा उभे आहेत. गेल्या वेळेप्रमाणेच पंचरंगी लढत आहे. पण गेल्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीचे मतदान लक्षात घेता कोल्हापूर मतदारसंघात आता शे. का. पक्षाला पूर्वीसारखा पाठिंबा राहिलेला नाही असे दिसते, काँग्रेसने या भागात शे का. पक्षापेक्षा आठ हजारावर मते अधिक मिळविली. पंचरंगी लढतीत विरोधकांची मते विभागली जाऊन शे. का. पक्षास निवडणूक जिंकणे अधिकच कठीण जाईल.

कागल मतदार संघात १९६७ मध्ये शे. का. पक्षाचा उमेदवार नव्हता. काँग्रेसने ही जागा अपक्ष उमेदवाराविरुद्ध सहा हजारावर मतांनी जिंकली. काँग्रेसचे वजन या भागात आणखी वाढल्याचे गेल्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीत दिसून आले. काँग्रेसने शे. का. पक्षाच्या उमेदवारापेक्षा या भागात ३३ हजारावर मते अधिक मिळविली. यावेळी या मतदारसंघात पंचरंगी लढत आहे. काँग्रेस व शे. का. पक्षा-शिवाय बंडखोर काँग्रेस उमेदवार सदाशिव मंडलीक, आणखी एक अपक्ष उमेदवार व खोब्रागडे गटाचा उमेदवार उभे आहेत. शे. का. पक्षाला ही जागा मिळण्याचा संभव नाही. तेथे खरी चुरस काँग्रेस व बंडखोर काँग्रेस उमेदवार यांच्यातच होणार आहे

गडहिंग्लजची जागा शे. का. पक्षाने १९६७ मध्ये काँग्रेसविरुद्ध ३८०० मतांनी जिंकली. सामना चार उमेदवारात होता. यावेळी तिरंगी लढत आहे. शे. का. पक्षाचे विद्यमान आमदार कोळेकरच पुन्हा उभे आहेत. पण गेल्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने या भागात शे. का. पक्षापेक्षा २१ हजारावर मते अधिक मिळविली हे लक्षात घेता शे. का. पक्षास ही जागा टिकविणे कठीण जाणार आहे.

चंदगड मतदार संघात काँग्रेसचे व्ही. के. चव्हाण पाटील गेल्यावेळी तिरंगी लढतीत शे. का. पक्षाविरुद्ध अवघ्या २५०० मतांनी निवडून आले. यावेळी चौरंगी लढत आहे. व्ही. के. चव्हाण पाटील यांना काँग्रेसने तिकीट नाकारल्याने ते बंडखोरी

" आम्ही विजयी झालो.
आता साऱ्या जगाचा थरकाप उडू दे "

स्वातंत्र्यदिनाच्या आपल्या पहिल्याच भाषणात
विजयोन्मादाने माओ-त्से-तुंग असे म्हणत होता.

आणि खरोखरच सारे जग हादरून गेले.
शतकानुशतकाच्या सुस्तपणानंतर
अत्यंत कर्मठ अशा कम्युनिस्ट चाबकाच्या
फटकाऱ्यामुळे अकाळ-विकाळ शक्तीचा चीन
खडबडून जागा झाला.

या चीनच्या
कम्युनिस्ट क्रांतीची
कथा सांगण्याचा
मराठीतला हा पहिला प्रयत्न.

आणि
ड्रॅगन
जागा
झाला

अरूण साधू

राजहंस प्रकाशन : पुणे
मूल्य : चौदा रुपये

करून अधिकृत काँग्रेस उमेदवाराविरुद्ध उभे आहेत. याशिवाय शे. का. पक्ष व संघटना काँग्रेसचे उमेदवार आहेत. गेल्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने शे. का. पक्षापेक्षा तेरा हजार अधिक मते या भागात मिळविली होती तेव्हा शे. का. पक्षाला यशाची शक्यता असूनही चुरस काँग्रेस व बंडखोर काँग्रेस उमेदवार यांच्यातच होणार आहे.

कोल्हापूर जिल्ह्याच्या सर्व आठ जागांचा विचार करता शे. का. पक्ष सर्व जागा लढवीत असला तरी प्रत्यक्षात त्याला एक जागा जिंकणेसुद्धा कठीण जाणार आहे,

कुलाबा व कोल्हापूर या दोन जिल्ह्यांशिवाय रत्नागिरी जिल्ह्यात कणकवली. ठाणे जिल्ह्यात कल्याण, मुरबाड, भिवंडी व जव्हार, सातारा जिल्ह्यात वाई, पाटण, कऱ्हाड, दक्षिण सांगली जिल्ह्यात शिराळा, काळवा, खानापूर, तासेगाव, सांगली, सोलापूर जिल्ह्यात मोहोळ, बार्शी, सांगोला, नाशिक जिल्ह्यात देवळाली, दिंडोरी, जळगाव जिल्ह्यात चोपडा, पुणे जिल्ह्यात पुण्यातील शिवाजीनगर व दौंड या पश्चिम महाराष्ट्रातील जागा शे. का. पक्ष लढवीत आहे. यापैकी कणकवली, कल्याण, भिवंडी, सांगोला, दिंडोरी आणि पुणे शहरातील शिवाजीनगर एवढ्याच जागा त्या पक्षाने १९६७ मध्ये जिंकल्या होत्या. त्यांपैकी कणकवलीची जागा शे. का. पक्षाने अवघ्या १३८८ मतांनी जिंकली होती. लोकसभा निवडणुकीत तेथे विरोधी पक्षापेक्षा ६८०० मते जास्त मिळवली आहेत. कल्याणमध्ये शे. का. पक्षाचे धुळप १९६७ मध्ये निवडून आले. या मतदार संघात काँग्रेसला त्यावेळी तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली होती. शे. का. पक्षाने ५३४३ व जनसंघाने ४५८ मते काँग्रेसपेक्षा जास्त मिळविली होती पण लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने विरोधी पक्षापेक्षा १२ हजारावर मते अधिक मिळविली आहेत. भिवंडीमध्ये शे. का. पक्षाचा उमेदवार काँग्रेसविरुद्ध ९००० पेक्षा जास्त मते मिळवून विजयी झाला होता. लोकसभा निवडणुकीत अपक्ष उमेदवार राम जेठमलानी यांनी भिवंडीत पहिल्या क्रमांकाची मते मिळविली. काँग्रेसपेक्षा त्यांना ११६८ मते जास्त आहेत. शे. का. पक्षाला तिसऱ्या क्रमांकाची मते असून काँग्रेसपेक्षा ती १२७६ नी कमी आहेत जेठमलानी जनसंघ पुरस्कृत होते. त्यांच्या मतात त्यांच्या व्यक्तिगत प्रभावाचाच भाग जास्त होता. १९६७ च्या निवडणुकीत जनसंघ उमेदवाराची अनामत रक्कम या मतदारसंघात जप्त झाली होती. यावेळी जनसंघाशिवाय, मार्क्सवादी कम्युनिस्ट व शिवसेना आणि एक अपक्ष उमेदवार ही जागा लढवीत आहेत. अशा परिस्थितीत विरोधकांची मते विभागली जाऊन त्याचा फायदा काँग्रेसला मिळण्याचा संभव आहे.

सांगोल्याची जागा शे. का. पक्षाचे गणपतराव देशमुख यांनी १९६७ मध्ये अवघ्या ६६८ मतांनी जिंकली होती. लोकसभा मुदतपूर्व निवडणुकीत काँग्रेसने पाठिंबा दिलेले रिपब्लिकन उमेदवार एस. एस. कांबळे यांना या भागात खोब्रागडे

गटाच्या उमेदवारापेक्षा ७७२४ मते अधिक मिळाली. शे. का. पक्षाचा उमेदवार उभा नव्हता पण हे मताधिकार लक्षात घेता शे. का. पक्षाला यावेळी ही जागा जिंकणे कठीण जाईल.

पुण्यातील शिवाजीनगर जागेवर १९६७ मध्ये शे. का. पक्षाचे किल्लेदार निवडून आले. काँग्रेसचा त्यांनी ७७६२ मतांनी पराभव केला पण लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुकीत काँग्रेसने या भागात विरोधी पक्षापेक्षा १८,००० मते अधिक मिळविली हे लक्षात घेता शे. का. पक्षाला यावेळी ही जागा मिळण्याची शक्यता बरीच कमी आहे. गेल्या वेळी जिंकलेल्या जागा जिंकणेसुद्धा शे. का. पक्षाला जेथे कठीण जाणार आहे तेथे नव्या जागा त्याला मिळण्याचा संभव फारच थोडा आहे.

मराठवाड्यात किनवट, कंधार, जालना उत्तर, पैठण, परभणी, बसमत, जिंतूर पाथरी, रेणापूर, अहमदपूर, कळम, उस्मानाबाद, निलंगा, उमरगाव व तुळजापूर या जागा शे. का. पक्ष लढवीत आहे यांपैकी कंधार परभणी, उस्मानाबाद एवढ्याच जागा शे. का. पक्षाने गेल्या वेळी जिंकल्या होत्या. लोकसभा निवडणुकीत बहुतेक सर्व मतदारसंघात काँग्रेसची मते वाढली असल्याने शे. का. पक्षाला या जागा जिंकणे कठीण जाईल.

विदर्भात शेगावची जागा शे. का. पक्ष लढवीत आहे. गेल्या वेळी काँग्रेसने ५४०० मते अधिक मिळवून ही जागा जिंकली होती. लोकसभा निवडणुकीतही काँग्रेसने या भागात विरोधकांपेक्षा २९ हजाराहून अधिक मते मिळविली हे लक्षात घेता काँग्रेसलाच ही जागा मिळण्याचा संभव आहे.

शे. का. पक्ष हा महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष. त्यामुळे गेल्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्याला कितपत यश मिळण्याची शक्यता आहे याचे एवढ्या विस्ताराने विवेचन केले. त्यावरून असे दिसते, की शे. का. पक्षाचा प्रभाव आता बराच कमी झालेला आहे.

महाराष्ट्रातील इतर पक्ष व काँग्रेस बंडखोर यांना कितपत यश मिळण्याचा संभव आहे, तसेच बंगाल व बिहारच्या निवडणुकांसंबंधी विवेचन पुढील अंकात.

सावरकरांचे सामाजिक विचार...  पृष्ठ ३१ वरून

## झोंबरे, आक्रमक बुद्धिप्रामाण्य

लोकहितवादी आणि आगरकर या दोघांप्रमाणेच सावरकर ग्रंथप्रामाण्याचा कडकडून निषेध करतात आणि बुद्धिप्रामाण्याला समाज-जीवनाचा मूलाधार समजतात. 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' आणि 'अद्यतन' या दोनच शब्दांची बाणांसारखी अर्थवेधी पुनरुक्ती करून त्यांनी पाश्चात्यांच्या व आपल्या संस्कृतिप्रेरणांमधला फरक फार छान दाखवला आहे. आचारप्रेम आणि कर्मकांडाचे प्राबल्य यांमुळे हिंदु धर्माला जादूची अवकळा आली आहे, हे ओळखून लोकहितवादी व आगरकर यांनी ब्राह्मणी विधिनिष्ठेवर कडाडून हल्ले केले होते. यज्ञ, नवससायास, व्रत-वैकल्ये, सत्यनारायण, शंकराचार्य, विटाळ-चांडाळ, गो-पूजा, भटजी, अस्पृश्यता—या सर्वांवर, त्याच परंपरेच्या अनुरोधाने सावरकरांनीही हल्ले केले आहेत. सावरकरांचे हल्ले हे या दोघांपेक्षाही अधिक आक्रमक—अधिक झोंबरे—आणि अधिक भेदक आहेत. विशेष म्हणजे फार थोडया समाज-सुधारकांमध्ये असलेली विधायक कल्पकताही त्यातून अधूनमधून प्रतिबिंबित झालेली आहे. वानगीदाखल ही उदाहरणे पहा—

" जे सूर्य, शनी, मंगळ, प्रभृती ग्रह म्हणजे निव्वळ निर्जीव, निर्मानस, निर्बुद्ध तेजाचे लोळ, म्युनिसिपालिटीच्या कंदिलासारखे ठराविक दराने जळणारे आकाशातील कंदील; त्यांच्या नावाचा म्हणे कोटीवेळा जप केला ! ..."

" गायीत देव आहेत म्हणून पोथ्या सांगतात, तर वराहावतारी देव डुक्कर झाले होते असेही पोथ्या सांगतात ! मग गोरक्षणच का करावे ? डुक्कर-रक्षणसंघ-स्थापून डुक्कर-पूजा का प्रचलवू नये ? ज्याअर्थी गोरक्षण, गोपूजा, गोभक्ती या कल्पनाच मुळी माया-सृष्टीतल्या आहेत, त्याअर्थी त्यांचे स्वीकरण वा धिक्करण हेही त्या व्यावहारिक, प्रापंचिक नि तुलनात्मक विवेकानेच करणे शक्य आहे, उचित आहे. या मायासृष्टीत जोवर मनुष्य मनुष्य आहे आणि गाय वा बैल पशू आहेत, तोवर मनुष्याने त्याच्याहून सर्व गुणांत हीनतर असलेल्या पशूस देव मानणे म्हणजे मनुष्यास पशूहूनही नीच मानण्यासारखे व माणुसकीस कमीपणा आणणारे आहे...'

" पण भटांची खोड मोडायची तर प्रथम यजमानांची खोड मोडली पाहिजे ! कारण वास्तविक पाहता निदान आज तरी भट हा जर समाजाच्या डोक्यावर चढला आहे, असे कोणास वाटत असेल तर त्याने हे लक्षात ठेवावे, की तो त्याच्या घरची, धूर्तपणाची शिडी आणून काही तसा आमच्या डोक्यावर चढलेला नाही, तर आम्हीच आमच्या भाबडेपणाची शिडी त्याला देऊन आपल्या डोक्यावर चढवून घेत आहोत ... (याच सुरात समाजाची कधीकधी अडवणूक करणाऱ्या भंग्यांबद्दलही त्यांनी लिहिले आहे).

"पौराणिक भाषेच्या गोष्टीत बोलावयाचे झाल्यास पारतंत्र्य-राक्षसाचे मरण त्याच्या कायद्याच्या पुस्तकात असते...आपणास मारल्याशिवाय आपल्या कायद्याच्या पुस्तकाचा हा नाश करीत नाही व कायद्याच्या पुस्तकात आपले मरण असल्यामुळे त्यांचा नाश झाल्याशिवाय आपण मरणार नाही असे जाणून पारतंत्र्य-राक्षस मनामध्ये हसत असतो.. याला उपाय एकच—त्या कायद्याच्या पुस्तकालाच आग लावायची !..."

'बापास कळत नव्हते, ठाऊक नव्हते, ते मला कळू लागले; तसे काही नवीन शिकलो तर मग बापाचे बापपण ते काय राहिले ! ही आमची भीती !...श्रुतिस्मृतिपुराणोक्त ही प्रवृत्ती चांगली की वाईट, ती ठेवूनही सुधारणा झाल्या की नाही, तिचे परिणाम हितावह झाले, की अहितावह हे प्रश्न अगदी स्वतंत्र आहेत. ही प्रवृत्ती आपल्या धर्मशास्त्राची आधारस्तंभ होती की नाही हा खरा प्रश्न आहे.'

## एका विशिष्ट परंपरेचेच यशोगान

हे सर्व वाचून असा प्रश्न पडतो, की सावरकर मग भारतीय परंपरा तरी कशाला म्हणतात ? त्याचे उत्तरही सरळ आहे. खरे म्हणजे सावरकरांना धर्माच्या किंवा संस्कृतीच्या परंपरेपेक्षाही भारताची पराक्रमाची, म्हणजे रणांगणावरील शौर्याची परंपरा फार प्रिय आहे. भाषा म्हणून संस्कृतचा त्यांना जाज्वल्य अभिमान आहे. हिंदी त्यांना संस्कृतनिष्ठच पाहिजे. लिपी म्हणून देवनागरीचाच त्यांनी पुरस्कार केला. जिच्या काठी आमच्या पूर्वजांनी वेद गाईले, त्या सिंधूलाही 'हे देवीतमे', हे 'अंबितमे' अशाच त्यांनी हाका दिल्या. पण त्यांच्या दृष्टीने ही संस्कृतीची प्रतीके नाहीतच. ती आहेत लढाऊ राष्ट्रवादाची प्रतीके ! वेद-गीता-उपनिषदे-रामायण-महाभारत, कालिदास, ज्ञानेश्वरी-तुकोबाचे अभंग-शंकराचार्य, मनू. अजंठा-वेरूळ या सांस्कृतिक परंपरेचे गान सावरकरांनी क्वचितच केले आहे. (केले आहे ते लहानपणीच्या निबंधात! ) हूणांचा चक्काचूर करणारी, शकांची शकले करणारी, भारताची परंपरा त्यांना खरी प्रिय. म्हणूनच त्यांच्या कवितेत-साहित्यात-आणि निबंधातही वारंवार येतात ते क्षात्र चंद्रगुप्त, 'यवनांतक' 'पुष्यमित्र', 'हूणांतक', 'यशोधर्मा' विक्रमादित्य, शिवाजी-रामदास-संभाजी-गोविंदसिंग-हरसिंग नलुवा आणि झाशीची राणी ! (ही परंपरा सांगताना सावरकर इतिहासाची सोयीस्कर आणि जाणूनबुजून हिसकाहिसकी करतात त्यांची इतिहासावरील भाष्ये साधार नसतात असे नाही. पण ती हेतुत: एकांगी असतात. व्यापक अशी ऐतिहासिक बैठक त्यांना नसते.)

सावरकरांच्या निबंधाचीही हीच गोष्ट. ती आणखी दोन संदर्भात दिसून येते. पहिली अशी, की गेल्या पिढीतील सर्व सामाजिक प्रज्ञावंतांनी आणि सुधारकांनी भारतीय स्त्रीच्या अवनत स्थानाबद्दल आवेशाने हिरिरीने, सहानुभूतीने किंवा करुणपणे काहीना काही लिहिले आहे. स्त्री-स्वातंत्र्य ही आपल्या गेल्या शंभर-दीडशे वर्षांतील समाज-परिवर्तनाची एक महत्त्वाची आघाडी आहे. पण मनुस्मृतीतील महिला या प्रधानत: माहितीपर लेखमालेचा अपवाद वगळता सावरकरांनी याबद्दल विशेषपणे

आणि प्रत्ययकारी असे फारसे लिहिले नाही. रशियन क्रांतीनंतर घटस्फोट-स्वातंत्र्याचा जो अपूर्व प्रयोग करण्यात आला, त्याबद्दल मात्र सावरकरांनी आवर्जून आणि प्रशंसापर लिहिले आहे. हे अतिशय अर्थपूर्ण आहे. तथापि व्यक्तित्व या मूल्याचा कळवळा किंवा स्त्री-स्वातंत्र्य या मूल्याचे मूलभूत सामाजिक वा सांस्कृतिक महत्त्व म्हणून सावरकर या प्रश्नांकडे बघायला तयार नाहीत.

दुसरा संदर्भ हा सावरकरांच्या जात्युच्छेदक निबंधाचा आहे. या विषयातील सावरकरांची दृष्टी शुद्ध आहे. वर्ण आणि जाती यांचा मोठमोठ्यांनी घातलेला घोळ ते घालीत नाहीत. जातिभेद हा सनातन धर्म नाही, जातिभेद हे जन्मजात नसून पोथीजात आहेत, अनुवंश-शास्त्राची साक्ष जातिभेदाच्या बाजूने नाही, जातींचा हजारो वर्षे चालत असलेला संकर हीच एक स्वयंमेव स्मृती आहे, मानवी उच्चनीचता नि प्रकट गुणांवाचून केवळ जन्मामुळेच मिळणारे विशिष्टाधिकार हे काढून घेतल्यानंतर उरणारा जातिभेद हा विषारी दात पाडून टाकलेल्या सापा-सारखा—या त्यांच्या प्रमेयातून त्यांच्या दृष्टिकोनाच्या स्वच्छपणाचा पुरेपूर पडताळा येतो. जातीभेद हे वर्गभेदाच्या पातळीवर आणून ठेवणे हे याबाबतचे त्यांच्या विचाराचे टोक आहे. पतितपावन मंदीर आणि सहभोजन हा त्यांचा अस्पृश्यता-निवारणाचा कार्यक्रम आहे. जाती शेवटी पोथीजातच आहेत, हा बारकावा आणि अस्पृश्यतानिवारणाच्या कार्यक्रमातील कल्पकता हे याबाबतचे सावरकरी विशेष. हिंदूंच्या अखंड परंपरेचा अभिमान असूनही 'जातिसंस्थेमुळेच आम्ही टिकून राहिलो' हा राजवाडे, केतकर आणि इतर बऱ्याच विचारवंतांचा सिद्धांत सावरकर मानत नाहीत हाही आणखी एक विशेष. पण या सर्व विचारांमागे पुन्हा राष्ट्रवाद हीच प्रमुख प्रेरणा आहे. फुले-आंबेडकरांची जातिभेदाबद्दलची धगधगती चीड, गांधींची करुणा, समता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा नैतिक आणि सांस्कृतिक मोठेपणा, लोकशाहीच्या दृष्टीने या मूल्यांची मातब्बरी—या गोष्टी सावरकरांच्या चिंतनात नाहीत.

खरे म्हणजे जातिधर्म ही आपल्या वैयक्तिक आणि सांस्कृतिक जीवनाची शैली झाली आहे, आपल्या राष्ट्रीय चारित्र्याचा आणि राजकारणाचा तो अजूनही एक अविभाज्य भाग आहे, या अभ्यसनीय बाजूकडेपण सावरकर कानाडोळा करतात. त्यांचे लक्ष आहे ते फक्त युरोपच्या सामर्थ्याकडे. काही 'स्वदेशी बेड्यां'च्या म्हणजे हिंदुसंघटनेच्या संदर्भातच त्यांनी आपले जातीभेदविषयक विचार प्रमुखत्वाने मांडले आहेत. तथापि हे सर्व सांगूनही एक गोष्ट मान्य करावयास हवी. आपल्याकडचा राष्ट्रवादी क्रांतिकारक सामाजिक क्षेत्रात प्रतिगामी तरी असतो किंवा पुरेसा पुरोगामी नसतो (चिपळूणकर, टिळक, परांजपे). याउलट आपला सामाजिक क्रांतिकारक राजकीय क्षेत्रात प्रतिगामी तरी असतो किंवा पुरेसा पुरोगामी तरी नसतो (फुले, आंबेडकर). सावरकरांनी हा साचा

नवकीच मोडला. चिपळूणकर, टिळक, परांजपे या तिघांशी राजकीय नाते जोडनही सामाजिक क्षेत्रात मात्र आगरकर परंपरेशी सावरकरांनी आपली नस जुळविली हा त्यांच्या व्यक्तित्वाचा एक सुंदर विशेष होय.

सावरकरांच्या जीवनातील देशभक्तीच्या काव्यात्म गौरवाचे मूळ त्यांच्या पूर्व वयातील मॅझिनी भक्तीत आहे. तथापि बऱ्याच बाबतीत त्यांची प्रवृत्ती विसाव्या शतकातील-पाश्चात्य राष्ट्रवादी प्रेरणांशी-विशेषत: त्यातील सडेतोड आणि सामर्थ्य-संपन्न अशा आधुनिक ज्यू आविष्कारांशी (फॅसिस्ट नव्हे) जुळती-मिळती आहे. असे असले, तरी पाश्चात्य देशांतील एकाच विशिष्ट सामाजिक तत्त्वप्रणालीचाही त्यांच्यावर प्रभाव दिसत नाही. उत्क्रांतीवाद, उदारमतवाद, व्यक्तिवाद किंवा कॉंत, स्पेन्सर, मिल आणि बेन्थॅम यासारख्या सामाजिक तत्त्वज्ञांची छाप रानडे-आगरकरांवर जशी उघड दिसते तशी या वादांचे व विचारांचे सुसंगत वाचन असूनही सावरकरांवर दिसत नाही. याला अपवाद म्हणजे कुठेकुठे उपयुक्ततावादा-वरचा त्यांचा भर. पण त्याबाबतसुद्धा 'जास्तीत जास्त लोकांचे हित' या सूत्रा-पेक्षाही एकप्रकारचा रोखठोक राष्ट्रीय व्यवहारवाद (Pragmatism) त्यांना अभिप्रेत होता. सारांश बुद्धिप्रामाण्याच्या समान परंपरेचा एक आगरकरी प्रवाह सोडला तर पूर्वसूरींपैकी खास कोणाच्याही एका विचारसरणीचा शिक्का त्यांच्यावर मारणे अशक्य आहे, इतका स्वतंत्र विकासमार्ग त्यांच्या विचारांचा दिसतो. (हा ठसा शैलीबाबत आणि परंपरा-गौरवाबाबत मात्र दिसतो. चिपळूणकर-परांजपे यांचे संस्कार त्यांच्या लेखणीवर निश्चितपणे आहेत.) ऐहिक अभ्युदयवाद, विज्ञाननिष्ठा आणि यांत्रिकीकरणाचा स्वीकार याबाबतीत काळामुळे,-विज्ञानाच्या आणि यंत्र-विद्येच्या वाढत्या वैभवाच्या काळात त्यांचे उत्तर आयुष्य गेल्यामुळे-ते इतरांच्या पुढे दिसतात.

याउलट, राष्ट्रवादाच्या प्रभावामुळे त्यांच्या विचारांतील आशयाला आणि अभि-व्यक्तीला मर्यादा पडल्या आणि त्यात काही महत्त्वाच्या उणीवाही निर्माण झाल्या. व्यक्तित्वातील ज्वलंत राष्ट्रवादी प्रेरणांमुळे त्यांच्या विचारांना सहसा कधी तत्त्व-रूप येत नाही, वा वस्तुनिष्ठ विचारवंताची शुद्ध शास्त्रीय बैठकही लाभत नाही. भारताची फक्त लढाऊ परंपरा ध्यानात घेतली आणि त्यातून धर्म, अध्यात्म, नीती आणि संतपरंपरा यांतून निर्माण झालेली सत्य, शांती, अहिंसा, सहिष्णुता यांसारखी उच्च मूल्ये वगळली तर मग हिंदुपरंपरेचा वेगळा सांस्कृतिक मोठेपणा आणि व्यक्तित्व नेमके कशात मानावयाचे, हा प्रश्न उरतो. आधुनिक तर व्हावयाचे आहे पण राष्ट्रीय व्यक्तित्वाचे जतनही करावयाचे आहे, या आज आपल्याला पडलेल्या सांस्कृतिक पेचाचे मर्म सापडणे हेही अगत्याचे आहे. रानडे-आगरकर घेतात तसा परंपरेचा याहूनही मोठा अर्थ आणि मोठी कक्षा घेतल्याशिवाय भारतीय समाजाच्या पुनर्रचनेबाबतच्या प्रश्नांची पूर्ण उत्तरे गवसत नाहीत आणि या उत्तराच्या शक्यता

सावरकरांच्या विचारांत शोधता येत नाहीत. 'मुसलमान किंवा ख्रिश्चन असे तर आम्ही हिंदूही तसेच' ही प्रतिक्रिया वास्तववादी राजकारणाच्या दृष्टीने एका मर्यादेपर्यंत ठीक समर्थनीय आणि समजण्याजोगी होती. पण प्रतिक्रियेच्या याच एका पवित्र्यामुळे या देशातील बहुसंख्यांक म्हणून भारतीय जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत विकसित आधुनिकीकरणाची आणि समावेशक राष्ट्रवादाच्या बांधणीची नैतिक जबाबदारी आणि नेतृत्व शेवटी हिंदूवरच पडते हा विधायक विचार कायमचा दुबळा राहतो हे सावरकरही विसरून गेले आणि आजही त्यांचे अनुयायी नेमका हाच मुद्दा विसरताना दिसतात. प्रतिवाद म्हणून सावरकरांच्या बाजूने याबाबतीत समर्थन देता येणार नाही असे नाही. लढाऊ राजकारण ही त्यांनी आपली अग्रनिष्ठा मानली होती. इतिहास आणि परंपरा ही शास्त्रीय अभ्यासापेक्षा असतोषाचा तो आग्नि चेतवण्याची साधने आहेत हे त्यांनी जाणूनबुजून स्वीकारले होते. उत्तर वयात पाकिस्तान निर्मितीच्या भयंकर शक्यतेमुळे प्रखर मुस्लीम विरोधावर आधारलेली कडवी हिंदुत्वनिष्ठा हेच एकमेव विधायक तत्त्व म्हणून त्यांनी पुरस्कारले. तथापि काळ व परिस्थिती या परिमाणांमुळे द्यावा लागणारा असा न्याय देऊनही सामाजिक विचारांच्या इतिहासाची आज समीक्षा करताना सावरकरांचे स्थान वर सूचित केलेल्या सामर्थ्य-मर्यादांच्या चौकटीतच ठरवावे लागेल असे वाटते.

## शैलीतील रंग

शेवटी सावरकरांच्या शैलीबद्दल. त्यांचे काव्य ओजस्वी आणि कल्पनासंपन्न असले तरी संस्कृतप्राचुर्य, लांब समास, विद्वज्जड शब्दकळा यांमुळे कधीकधी त्यात क्लिष्टता येते. भाषाशुद्धीच्या अतिरेकीपणामुळे येणारे अनोळखी शब्द सोडले तर त्यांच्या गद्यात असा क्लिष्टपणा क्वचितच जाणवतो. संस्कृतनिष्ठ असूनही ती कुठे अकारण बोजड आणि स्थूल वाटत नाही. वाक्यांचा पल्ला मोठा, पण त्यांची शैली ती सहज पेलते. त्यांच्या शैलीला त्यांच्या वक्तृत्वासारखीच एक स्पष्ट, प्रवाही, रंगभूमीच्या नटाच्या तोंडीच शोभावी अशी एक नाट्यमय लय आहे. जातिवंत कवीचे, आणि शाहीराचे कल्पनावैभव जसे त्यांत आहे, तसा तर्काचा आणि चिकित्सेचा पीळदार बौद्धिक धागाही आहे—'त्या पार्थसारथ्याच्या शब्दांतच ते अद्यावत् प्रवृत्तीचे समर्थक या कूपमंडुकतेच्या भंगड गुंगीत प्रज्ञाहत झालेल्या हिंदुराष्ट्रास सांगणार—' कुतस्त्वा कश्मलमिद विषमे समुपस्थितम। अनार्य जुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन।' सोडून दे ह्या स्पर्शबंदीच्या सिंधुबंदीच्या, रोटीबंदीच्या, पोथीजात जातीपातीच्या पाच हजार वर्षांपूर्वीच्या भाकड भावना! तोडून टाक त्या तुझ्या कर्तृत्वाच्या पायात पडलेल्या त्या शब्दनिष्ठ श्रुतिस्मृति-पुराणोक्त प्रवृत्तीच्या बेड्या! आणि जे जे हत्यार तुझ्यावर चढून आलेल्या आजच्या आपत्तीच्या उच्छेदास आज समर्थ होईल—उपस ते ते हत्यार! मग ते तुझ्या शस्त्रागारात सापडो वा या नवीनांच्या शस्त्रागारातून छिनता येवो!"

सावरकरांच्या शैलीला अशी धार आणि अग्र आहे. की नांगराच्या फाळाने तुकडा पडावा तसा त्यांच्या लेखणीने विचार जणू स्वच्छ कापला जातो. चटकन जाणवते–या माणसाजवळ तडजोड नाही. विचारांच्या अन् मूल्यांच्या क्षेत्रांत आग्रहाचा अभिनिवेशाचा आणि आक्रमणाचा द्योतक असा 'च' त्यांच्या लिखाणात वारंवार येतो. आपल्या स्वतःच्या शब्दाशब्दाबद्दल त्यांना निःशक आत्मविश्वास असतो. क्वचित द्रष्टेपणाची सुप्त व उघड जाणीवही असते–"बुद्धिभेद करू नये पण दुर्बुद्धिभेद अवश्य करावा. सद्भावना दुखवू नयेत पण असद्भावना अवश्य दुखवाव्यात. श्रीभगवत् गीतेतील या श्लोकाचा असाच अर्थ केला पाहिजे. नाहीतर तो श्लोक स्वयमेवच एक अनर्थ होऊन बसेल. न बुद्धिभेद जनमेत्–आम्ही आत्यंतिक अहिंसेला.. जो विरोध करतो तो तुमच्यापेक्षा आम्ही साधुत्वात कमी आहोत म्हणून नव्हे–तर आम्हाला तुमच्यापेक्षा जास्त कळते म्हणून!"

याबरोबरच प्रतिपक्षाने याद राखावी असा उपहास आणि उपरोध त्यांच्या लेखणीत असतो.क्वचित तो सूक्ष्म असतो पण क्वचितच," हिंदुलोकांनी आमच्या संस्कृतीचे ध्येयचिन्ह म्हणून याच्यापुढे गाईला पूज्य न मानता (भगवती) गोगलगाईलाच पूज्य मानावे. गाईची पूजा करिता करिता आपण हिंदु 'गाय' झालो. पण आता सात्त्विकतेची पुढची पायरी आपणास गाठलीच पाहिजे...प्रथम गाय ही बैलाचीच राज्ञी होती, पुढे काही गोशाळांतील गोठ्यांची राज्ञी झाली. आता तिचे हे साम्राज्य वाढता वाढता ती श्रीमती गोमाता विश्वाची अनभिषिक्त राज्ञी झाल्याची एक ताजी तार आली आहे. ती गोमाता अजून अनिभिषक्तच का राहिली आहे, एवढे काय ते कळले नाही!"

एकूण सुसंस्कृत कवी आणि रांगडा शाहीर, अस्खलित वक्ता आणि सूक्ष्म नट, अर्पणोत्सुक क्रांतिकारक आणि दीर्घायुषी झालेला चिवट वृद्ध, राष्ट्रवादी नेता आणि बुद्धिवादी विचारवंत, कर्मशूर सुधारक आणि झुंजार पण धूर्त प्रचारक, असे सावरकर या नावाचे जे एक अपूर्व व्यक्तित्व भारतात होऊन गेले त्याचे सर्व चित्रविचित्र भडक, पण लखलखते रंग या शैलीत तकाकत राहिले आहेत. ◻

[**'सावरकरांचे निवडक निबंध'** या मॅजेस्टिक बुक स्टॉलतर्फे प्रकाशित होत असलेल्या पुस्तकाची प्रस्तावना]



पृष्ठ १६ वरून

'तुमचा बेत अगदी पक्का झालाय ?'

'अगदी वज्रलेप !'

'ठीक आहे. मग तुम्हीच मला तारीख नि ठिकाण सांगा. मी हजर राहाते.'

'तुला एडिंबरोच्या कोर्टात यावं लागेल स्कॉटलंडमध्ये.'

'लंडन सोडून एडिंबरो कुठलं शोधलंय तुम्ही ?

'लंडनवाल्यांचे कायदे पक्के चांडाळ आहेत. शंभर खेंकटी काढतील. त्यापेक्षा एडिंबरो परवडलं. तिथले कायदे थोडेसे माणुसकीला शोभणारे आहेत. स्कॉटलंडची कोर्टं कीस काढत बसत नाहीत. तडकाफडकी निर्णय देऊन मोकळी होतात.'

तिच्या तळपायाची आग मस्तकाला झोंबली. पण सोडचिठ्ठी देऊन मोकळं होण्याकरता इलाजही नाही हेसुद्धा तिला पटलं. एडिंबरो गाठायचं तिनं पक्कं केलं. ज्या व्यक्तीला आपला सहवास नको असतो, त्याला आपणच आपल्या विश्वातून हद्दपार करणं अधिक शहाणपणाचं असतं. सोडचिठ्ठीच्या कागदपत्रांवर आपण होऊन सही करायला ती राजी झाली. एडिंबरोत ठरल्या ठिकाणी त्यांची भेट झाली.

'मी आले आहे.'

'ठीक आहे. आता वकिलामार्फत कागदपत्र तयार करून घेतो.'

'माझे पैसे संपलेत. मी चालत आले पावणे दोनशे मैल !'

'असो; मानसिक क्लेश हलके करण्याचा आत्मपीडन हा एक मार्ग सांगितलेला आहे. अंतःस्फुर्तीनं, पण अजाणता तू तो आत्मपीडनाचा मार्ग अनुसरलास !'

'तुमचं हे तत्त्वज्ञान ऐकायला आलेली नाही मी. माझ्याकडे सध्या पैसे नाहीत. इथे एडिंबरोत ओळखीपाळखीही नाहीत.'

'मग मी काय करू ?'

'मला पैसे द्या.'

'पण माझ्यापाशी तर अवघा एक पौंड आहे. वाटल्यास तोच तू घे. किंवा असं कर, इथे एडिंबरोत रिची नावाचा माझा एक संपादक मित्र आहे. त्याला मी तुला पन्नास पौंड देण्याबद्दल चिठी देतो. ती रक्कम रिची तुला आनंदाने देईल. मी त्याच्यासाठी दोन-चार लेख लिहून पाठवून पैशांची फिट्टंफाट करून टाकेन. शिवाय कोलबर्न नावाच्या दुसऱ्या एका संपादकाकडून दोन-तीन दिवसांत माझे मोबदल्याचे तीस पौंड यायचे आहेत. ते आले की त्यातले पाच पौंड तुला देतो. शिवाय माझी इथे जवळच व्याख्यानं ठरली आहेत. त्याचेही शंभर पौंड यायचे आहेत. शिवाय ते 'टेबल टॉक' लिहिलंय, त्याचेही ऐंशी पौंड मी मागवले आहेत.'

'ते येतील तेव्हा येतील. सध्या मला काय देता ते सांगा.'

'माझ्यापाशी फक्त एक पौंड आहे.'

'मग सध्या तो तुम्ही तुमच्याकडेच ठेवा. माझं मी पाहून घेईन.'

'कागदपत्रांवरल्या सह्यांचे तू काही पैसे आयत्या वेळी मागणार का? अगोदर सांग. तुला पैसे दिसले म्हणजे भुंगाळल्यासारखं होतं म्हणून विचारतो. माझ्याकडून मी इतकंच सांगतो, की सोडचिठ्ठी मंजूर झाली, की मी तुला वीस पौंडांची खुषी द्यायची ठरवली आहे!'

'खुषी गेली खड्डयात! तुमच्या लेकाच्यासाठी तुम्ही काही तरतूद करणार आहात काय ते बोला.'

'तशी वेगळी तरतूद करण्याचं काहीच कारण नाही. एकदा का सोडचिठ्ठी मिळाली, की माझं मन शांत होईल. डोकं ठिकाणावर येईल. चित्त एकाग्र करून मी सपाटून लिहायला लागेन. मग काय, पैसाच पैसा! मुलाने केव्हाही यावं नि पैसे घेऊन जावं. पैसे त्याचेच आहेत.'

कागदपत्रांवर सह्या झाल्या. सोडचिठ्ठी प्रकरण तडीला गेलं. तो धावत धावतच खानावळीत परतला.

'सॅली, अखेर मी लग्नाच्या जोखडातून सुटलो!' त्याने आनंदातिशयाने सांगितलं.

सॅलीने थंडपणे विचारलं,

'मग त्यात इतकं हर्षवायू झाल्यासारखं काय करतोस?'

'अस कसं बरं विचारतेस? अग आता आपण दोघंजण लग्न करायला मोकळे झालो!'

'म्हणजे? माझ्या लक्षात नाही आलं.'

'त्यात काय लक्षात यायचंय? मी माझ्या बायकोला सोडचिठ्ठी दिली. आता मी कायदेशीरपणे मोकळा झालो. आता आपण लग्न करून टाकायचं. आहे काय नि नाही काय!'

'My God! अहो, माझं लग्न केव्हाच ठरलेलं आहे. मी तुमच्याशी लग्न नाही करू शकत. Sorry'

तो मटकन खाली बसला!

'तू खरं बोलते आहेस की चेष्टा करते आहेस?'

'इश्श! त्यात खोटं ते काय बोलायचं?'

'पण आजपर्यंत तू त्याबद्दल अवाक्षरही कधी काढलं नाहीस!'

'तो विषयच कधी निघाला नाही.'

'पण जर तुझं लग्न ठरलंय म्हणून मारे सांगत्येस आता तर मग तू माझ्या मांडीवर कशी ग बसायचीस?'

'इतकासुद्धा चोरटेपणा करायचा नाही, तर मग जगण्यात मौज ती काय उरली?'

'काय ग, पण रोज सकाळी तू माझा मुका घ्यायचीस गुपचुपपणे, ते शोभलं का तुला ?'

'पण त्याच्या बदल्यात मी तुमच्याकडून प्रेझेन्टस्‌ही उपटली की वेळोवेळी !'

'अग पण माझे आई, तू इतका प्रेमाचा देखावा तरी का केलास म्हणतो मी ?'

'वा ! तसं केलं नाही तर आमच्या खानावळीचे मेंबर्स टिकतील काय ?'

लेखकमहाशयांनी शिप्याच्या खानावळीतला आपला बाडबिस्तारा गुंडाळला !

हिपुटलेल्या चित्ताला विसावा म्हणून त्याने नेपोलियनचं चरित्रलेखन सुरू केलं ! त्यात तो पुरता गुंतून गेला. मद्यपान त्याने पूर्णपणे वर्ज्य केलं. नुसत्या चहाचा तो तल्लफी झाला. एकीकडे घंगाळभर चहा ढोसायचा नि दुसरीकडे तावावर ताव खरडायचे असं त्याचं सरळसोट आयुष्य सुरू झालं. दर्जेदार लेखक म्हणून पुन्हा तो किर्तिशिखरावर चढू लागला. ब्रिजवॉटर नावाची एक सधन विधवा प्रौढा त्याच्या लेखनगणांवर लट्टू झाली होती. अचानकपणे एका प्रवासात त्यांची भेट झाली. इतर फालतू गप्पांत वेळ न दवडता त्याने तिला विचारलं,

'तुमचे मृत यजमान कोण होते ?'

'लष्करात बडे अंमलदार होते, साहेब.'

'तुम्ही मला साहेब बिहेब म्हणू नका.'

'असं कसं म्हणता साहेब ? तुमच्या लेखनामुळे मला खूप खूप आनंद मिळाला आहे.'

'असं म्हणता ? बरं, लष्कराकडून तुम्हाला पेन्शन वगैरे मिळतं का ?'

'हो नं. महिन्याला साडेबारा पौंड मिळतात, साहेब.'

'आता मी थोडं स्पष्टपणे बोलतो. राग मानू नका.'

'आवडत्या लेखकाचा कुणाला राग येतो साहेब ?'

'तर मी काय म्हणत होतो, की लग्नाच्या दृष्टीने मी सध्या मोकळा आहे. मी लेखक आहे वगैरे तुम्ही जाणताच. मला आता अशा स्त्रीशी लग्न करायचं आहे की जिच्या आगमनामुळे माझ्यावरचा पैसे मिळविण्याचा बोजा थोडा हलका होईल. मी मोकळा असलो तर माझ्या पहिल्या मुलाचं हवं-नको मलाच पहावं लागतं. माझा खर्च, त्याचा खर्च – आता हे झेपत नाही हो ! तशात मी पन्नाशीला आलो आहे. तेव्हा आता थोडीशी सधन स्त्री मला मिळेल तर मी मला जे वाङ्मयात फार मोठं काम करायचं आहे ते करायला मोकळा होईन. एरवी मी कामचलाऊ लिहिता लिहिता आटपणार !'

त्याला नेमकं काय म्हणायचं आहे ते तिने ओळखलं. त्याचीही त्यात सोय होती. तिला आधार तर होता. शिवाय, आपल्या आवडत्या लेखकावर मोहिनी टाकून त्यात यशस्वी झाल्याचा अहंकारही होता.

गाजावाजा न करता त्यांचं लग्न झालं. दिवस सुखात जाऊ लागले. खपेल ते

नव्हे, तर पटेल ते लिहिण्याइतका निवांतपणा त्याला लाभला. त्याने तिला सांगितलं,

‘ इथे इंग्लंडमध्ये किती दिवस काढायचे ? तूं असं कर. फ्रान्समध्ये जा. चित्र-कलेचे नमुने वगैरे बघ. तोपर्यंत हाती घेतलेलं पुस्तक मी पुरं करतो, नि नंतर माझ्या मुलाला घेऊन मी पॅरीसला येतो. त्यानंतर आपण तिघजण मस्तपैकी युरोपची सफर करू. तुला सृष्टिसौंदर्य आणि कलाकृतींचे उत्तमोत्तम नमुने बघायला मिळतील. माझ्या मुलाला बापाबरोबर सुटी घालवल्याचा आनंद मिळेल. मला लेखनाला विषय मिळेल ! ’

तिला पटलं. ती पॅरीसला पुढे गेली. नंतर ठरल्याप्रमाणे तो आपल्या लेकाला घेऊन पॅरीसला गेला. त्याच्यासाठी तिथे तिने बोटभर चिठ्ठी ठेवली होती,

‘ इतःपर तुम्ही माझे नाहीत नि मी तुमची नाही. कृपया कारण विचारू नका, की माझा शोध करू नका. मी परदेशात माझ्या नातेवाइकांकडे कायमच्या मुक्कामासाठी जात आहे. Good bay ! ’

नियतीसमोर त्याने हात जोडले !


लालमहाल

पन्हाळगड

राजगड

पुरंदर

आग्रा

ब. मो. पुरंदरे

राजहंस प्रकाशन

पुणे

मूल्य प्रत्येकी

तीन रुपये

पण त्याला हेही माहीत होतं की लेखकाने स्वागतासाठी हात जोडायचे असतात नव्या अनुभवांसमोर.

माणसांचे नवे अनुभव घ्यायला तो पुन्हा नव्याने मोकळा झाला. सर्व युरोपखंडात त्याने भ्रमंती केली. नेपोलियनचं चरित्र पुरं केलं. वीस खंड भरतील इतके निबंध लिहिले. चित्रकलेवर ग्रंथ लिहिला नि चित्रंही काढली. मुलाला मात्र तो म्हणाला, 'आपले जन्मदाते आई-बाप हीच खरी आपली माणसं, हे लक्षात ठेव. उरलेले सगळे उपरे.'

त्याचे म्हातारे आईबाप दूर खेड्यामध्ये राहात होते. यांच्या प्रेमाच्या आश्रयाला तो गेला! पण शुकशुकाट असलेलं ग्रामीण वातावरण त्याला मानवेना. म्हणून पुन्हा तो लेखन साहित्य घेऊन लंडनच्या गदारोळात परतला. लंडनलाच वयाच्या त्रपन्नाव्या वर्षी पोटाच्या विकाराने त्याला देवाज्ञा झाली. मृत्यू क्लेशविरहित होता. मरणाच्या अगोदर त्याने आपल्या आईला हाक मारली. पण पिकलं पान झालेली ती पंच्याऐंशी वर्षांची वृद्धा दूर खेड्यात होती. तिला आणता येणं शक्य नव्हतं. मग मुलाला तो म्हणाला, 'आपल्या वाट्याला आलेलं आयुष्य हेच सर्वांत दुःखाचं आयुष्य असतं. दुसऱ्याच्या आयुष्याशी आपल्याची आदलाबदल करण्यात मजा नाही. दुसऱ्यांचे सुखसोहाळे त्यांचे त्यांना लखलाभ असोत! देवाने मला एकंदरीत फार आनंदाचे दिवस दाखवले हेच खरं. माझं आता वैयक्तिक असं काहीही मागणं नाही. इच्छा एकच आहे. उन्मत्त सम्राटांचा नाश होवो. दलित जनतेचा विजय असो! माणसांना सुखशांती लाभो!'

त्याच्या अकाली निधनानंतर तमाम जनता खडबडून जागी झाली. उसनं अवसान आणून स्तुतिसुमनांचा रगड वर्षाव झाला. चार्लस् वेल्स नावाचा कुणी चाहता पुढे आला आणि कबरस्तानात त्याने एक भली शिळा उभी करून तिच्यावर मोजून एकेचाळीस ओळींचा स्तुतिमय स्मृतिलेख खोदून घेतला. त्या प्रदीर्घ स्मृतिलेखात एक वाक्य असं होतं की 'कृतज्ञ आणि कृतार्थ' हे तीन यथार्थ शब्द जरी याच्या कबरीवर खोदले तरी याला पूर्ण न्याय केल्यासारखा होईल. चाळीस वर्षे तो स्मृतिलेख येणारे जाणारे वाचत असत. मग नगरपालिकेने कबरस्तानाची सुधारणा हाती घेतली आणि फटक्यासरशी तो स्मृतिलेख भुईसपाट करून टाकला. त्या ऐवजी कबरस्तानावर पाटी लावली,

'On the northern side of this ground lie the remains of William Hazlitt, painter, critic, essayist. Born at Maidstone, April 10, 1778. Died in Soho, September 18, 1830.

□ ▷ □

२६ फेब्रुवारी १९७२

**शरद गोखले**



# पाकिज़ा

## कमाल अमरोही यांचे सुनहरी स्वप्न

कथा तशी जुनीच आहे. साकार करण्याची पद्धतीही नाविन्यपूर्ण नाही. तथापि प्रथम श्रेणीची निर्मिती आणि अमरोही यांचा व्यक्तिगत स्पर्श यांमुळे कृत्रिमतेची झालर असूनही पाकिजा हा दीर्घकाळ निर्मिती अवस्थेत असलेला चित्रपट वैशिष्टयपूर्ण झाला आहे.

कमाल साहेबांचे आणि मीनाकुमारीचे संबंध चांगले असताना म्हणजेच पती पत्नी म्हणून ते सुखेनैव नांदत असताना कवी मनाच्या अमरोही साहेबांना एक सुनहरी स्वप्न पडले आणि त्यातून पाकिजाच्या कथेने आकार घेतला. १९६१ साली चित्रपट सेटवर गेला. मुंगीच्या गतीने २ वर्षे काम झाले. पुढे कमाल साहेबांचे आणि मीनाकुमारीचे भांडण झाले. तलाक घेतला. आणि कमाल साहेबांचे हे अधुरे स्वप्न रॅमनॉल्ड लॅबोरेटरीमध्ये धुळ खात पडले. कमाल साहेबांनी जिद्दीने प्रयत्न केल्याने आणि अनेकांनी मिनाकुमारी जवळ शब्द टाकल्याने ६३ साली बंद झालेले डबे ६९ साली पुन्हा उघडले गेले, कॅमेऱ्यावरची धुळ झाडली गेली. आणि उत्साहाने चित्रीकरण सुरू झाले. कमाल साहेबांना काळाचे भान नसले, तरी निसर्गाने आपली कामगिरी बजावली होती. ६१ साली उतरणीकडे झुकलेल्या मीनाकुमारी मध्ये ७१ साली काही 'चार्म' राहणे कठीण होते. सदा सतेज अशोक कुमारही निसर्गापुढे नम्र झाले होते. तथापि या गोष्टी दुर्लक्षणे आवश्यक असल्याने त्या दुर्लक्षून पाकीजाचे चित्रीकरण पूर्ण करण्यात आले. आणि अखेरीस बहात्तर साली कवी मनाच्या निर्मात्याला पडलेले हे सुनहरी स्वप्न रुपेरी पडद्यावर झळकले.

चित्रपटाची कथा ही एक काव्यमय प्रेमकहाणी आहे. सामाजिक आशयाचे ठिगळ बळेच जोडण्याचे काहीही कारण नाही. उर्दू भाषेच्या काव्यमय सौंदर्याने नटलेले संवाद ऐकत आणि भव्य निर्मितीतील कृत्रिमतेकडे दुर्लक्ष करून भव्यतेचा अस्वाद घेत मुस्लीम जीवनातील नवाबी चोचल्यांचे दर्शन घडविणारी ही प्रेम कहाणी त्याच पद्धतीने पाहिली पाहिजे.

नवाबी थाटामध्ये आणि त्याच परंपरेमध्ये वाढलेला शहाबुद्दिन (अशोककुमार) व नरगिस (मीनाकुमारी) यांचे प्रेम असले, तरी विवाह होत नाही. साहेबजान

(पुन्हा मीनाकुमारी) हे त्यांचे अपत्य मावशीकडे (वीणा) वाढते. आणि त्यांच्या परंपरेप्रमाणे नर्तकीचा पेशा पत्करते. मुलीच्या शोधात अलेल्या शहाबुद्दीनला साहेबजानची मावशी परत पाठवते आणि त्याचा पिच्छा सोडवण्यासाठी नाव गाव, बदलून दुसरीकडे रहावयास जाते. शहाबुद्दिनच्याच घराण्यातील सलेम (राजकुमार) रेल्वे प्रवासामध्ये केवळ योगायोगाने साहेबजानच्या डब्यामध्ये प्रवेश करतो. 'तुझे सुंदर पाय जमिनीवर टेकवून मलीन करू नकोस' अशी चिठ्ठी ठेवून नाहिसा होतो. कथेची अखेर योगायोगानेच आणि कमाल साहेबांनी योजल्या बरहुकूम अनंत अडचणीचे वळसे घेत अखेरीस सलेमची वरात लग्नाचे स्वप्नही पाहू न शकणाऱ्या नर्तिकांच्या वस्तीमध्ये आणवून सलेम साहेबजान यांचे मीलन घडवून आणण्यात झाली आहे.

कथेला शून्य गुण देण्यात आले आणि काही कृत्रिम प्रसंगांचे ठिगळ त्रासदायक वाटत असले, तरीही कमाल साहेबांचा पाकिजा प्रेक्षणीय आहे. त्यांच्या व्यक्तिगत शैलीमध्ये साकार झालेली प्रेमकहाणी पाहण्याची तयारी प्रेक्षकांनी ठेवली पाहिजे

कोठीवर नाचणाऱ्या नर्तकींच्या वस्तीचा आणि साहेबजान पुढे गुलाब महालात रहावयास जाते त्या गुलाब महालाचा, असे दोन भव्य सेटस लावण्यात आले असून अतिशय सुंदर पद्धतीने चित्रपटाची गरज लक्षात घेऊन, सेटस्ची भव्यता लक्षात येईल, अशा पद्धतीने ते Exploit करण्यात आले आहेत. बाह्य चित्रणही सुंदर आहे. बॉम्बे टॉकीजचे जोसेफ वरशिंग आणि त्यांच्या नंतर आर. डी. माथूर यांनी ही जबाबदारी समर्थपणे पेलली आहे. चित्रपट दीर्घकाळ निर्मिती अवस्थेमध्ये असल्यावर ती गोष्ट सहजासहजी लपून रहात नाही. तथापि पाकिजाच्या बाबतीत हा दोष तितक्या प्रकर्षाने जाणवत नाही.

## प्रभावी संगीत

उडत्या चाली आणि प्रचंड ऑर्केस्ट्रा यांचा मारा हे सत्तर साल नंतरच्या हिंदी चित्रपटांचे वैशिष्ठ्य आहे. कै. गुलाम महमंद यांनी पंधरा वर्षांपूर्वी बांधलेल्या चाली विलक्षण मोहक तर वाटतातच, परंतु चित्रतटाच्या लयीशी त्यांचे सुंदर तादात्म्य साधले जाते.

इन्ही लोगोने लिया दुपट्टा मेरा, यूँही चलते चलते, आणि ढाडे रहियो, ही तिन्ही गिते छान जमून आली आहे. नौशाद मियांनी योजलेले पार्श्वसंगीत समाधानकारक असले, तरी काही वेळा ते अकारण कर्कश वाटते.

मीनाकुमारी, अशोककुमार, आणि राजकुमार, या तीन प्रमुख कलावंतांखेरीज वीणा व विजया लक्ष्मी (साहेबजानची सखी) यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. नवाबी मुस्लीम जीवनाचे दर्शन घडवत, कृत्रिम परंतु आकर्षक संवादाने नटलेली कमाल साहेबांची ही दर्दभरी प्रेमकहाणी सर्वसाधारण हिंदी चित्रपटांच्या संदर्भात प्रेक्षणीय आहे हे मान्य करावेच लागेल.

□ □ □

 पृष्ठ ७ वरून चालू

पण उपेक्षा संपत नाही. हालअपेष्टा आणि छळ थांबत नाहीत.

आता निवडणुका आलेल्या आहेत. हे सर्व संपल्याचे, थांबल्याचे वरवर, तात्पुरते दिसेल. पण मुळात काही बदल होणार नाहीत. कारण चार निवडणुका होऊन गेल्या, पक्ष आणि माणसे बदलली तरी असा मूळबदल काही झालेला नाही.

हा मूळबदल आदिवासींची, उपेक्षित जनतेची अस्मिता आणि सामुदायिक पुरुषार्थ जागृत होईल तेव्हाच घडून येणार आहे.

या आत्मपुरुषार्थाशिवाय सगळे बाहेरचे आहे, उसने आहे, कृत्रिम आहे.

बहिष्कार हो पुरुषार्थ जागृतीची एक प्रारंभिक अवस्था आहे.

छळाकडून बळाकडे जाण्याची ही एक पहिली पायरी आहे.

निवडणुका जवळ आल्यामुळे साहजिकच मतदानावर बहिष्कार टाकून आपल्या उपेक्षेकडे, हालअपेष्टांकडे, छळवादाकडे बाहेरच्या जगाचे लक्ष वेधावे असा विचार या भागातील—विशेषत: शहादे भागातील आदिवासी जनतेमध्ये मूळ धरू पहात आहे.

शहादे तालुक्यापुरती ही कृती मर्यादित आहे, फार लहान आहे, म्हणून ती दुर्लक्षणीय मात्र ठरू नये. कारण या लहानशा सामुदायिक कृतीने आदिवासी आपला गमावलेला आत्मविश्वास परत मिळवू पाहात आहे.

आजवर त्याने मते विकली. दोन–चार रुपयांसाठी. दारूच्या एका बाटलीसाठी.

आज तो या मोहांवर विजय मिळवून हे मत साभार परत करायला निघालेला आहे. या लोकशाहीचा, या तथाकथित कायद्याच्या राज्याचा आमच्या दैनंदिन जीवनाला कसलाही स्पर्श नाही, ही लोकशाही व तिचे कायदे आम्हा गोरगरीबांना कसलेही संरक्षण देऊ शकत नाही, हे तो आज प्रथमच संघटितपणे सांगत आहे.

एका शहादे मतदारसंघापुरतेच हे सांगणे आहे, फार तर दहा-वीस हजार मूक जनतेचा हा मौन प्रतिकार आहे म्हणून तो डावलला जाऊ नये.

कारण डावलला गेलेला फारफार डावीकडे झुकण्याचा धोका असतो आणि असा धोका लोकशाहीला परवडण्यासारखा नसतो.

**श्री. ग. मा.**

मुखपृष्ठ : कहाणीतील तिघेजण. तिघांनाही वीज लावण्यात आली. उजवीकडचा पहिला-अर्जदार-आवल्या पवल्या भिल. [ पृष्ठ क्रमांक ६ ]

**राजहंस प्रकाशन** संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**



" नाराज होऊ नका, समाजसेवेचे इतर मार्ग उपलब्ध आहेत' असं म्हणता; पण त्या मार्गांतही अशीच गटबाजी हाय न्हवं ? "